
॥ श्रीमंत ॥
॥ श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे ॥

ह्या सोनेरी क्षणात
आम्हाला सहभागी
केल्याबद्दल आम्ही
आपले ऋणी आहोत


वामन हरी पेठे ज्वेलर्स™
सोनेरी क्षणांचे सोबती!®

# भक्तिमय कृतज्ञता

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे खरे आधारस्तंभ म्हणजे संस्थापक अध्यक्ष स्व. तात्यासाहेब गोडसे, संस्थापक उपाध्यक्ष स्व. मामासाहेब रासने, संस्थापक कोषाध्यक्ष स्व. शंकरराव ऊर्फ आप्पासाहेब सूर्यवंशी आणि संस्थापक सरचिटणीस स्व. बुवासाहेब रासने. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून जीवनाची वाटचाल करत असताना देखील या चौघांच्या मनामध्ये गणपती बाप्पांवरील निस्सीम भक्ति रुजली होती. त्या भक्तिनेच त्यांना उभारी दिली आणि त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य - तब्बल साठ ते पासष्ट वर्षं, बाप्पाच्या चरणी समर्पित केले. त्यांच्या या अथक सेवेमुळे आणि निष्ठेमुळेच आज "श्रीमंत दगडूशेठ गणपती" हे नाव जगाच्या कानाकोपऱ्यांत पोहोचले आहे. त्यांच्या पुण्याईचा वारसा लाभल्यामुळेच आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना आज हा उत्सव इतक्या दिमाखात, अभिमानाने आणि भक्तिभावाने साजरा करता येत आहे. आमच्या आधीच्या पिढ्यांनी सचोटी, पारदर्शकता आणि समर्पणाचा जो मार्ग दाखवला, तोच मार्ग आम्हीही जपण्याचा प्रयत्न करत आहोत. स्व. अशोकभाऊ गोडसे व माणिकदादा चव्हाण यांनी जवळपास पंचावन्न वर्षे, सुनिलभाऊ रासने यांनी पंचेचाळीस ते पन्नास वर्षे, हेमंतभाऊ रासने व महेश सूर्यवंशी यांनीही सुमारे चाळीस वर्षे या गणपती बाप्पाच्या सेवेत स्वतःला अर्पण केले आहे. तसेच आजच्या पिढीतील अक्षय गोडसे, अमोल केदारी आणि सुवर्णयुग तरुण मंडळाचे प्रकाश चव्हाण व सर्व कार्यकर्त्यांची मोलाची साथ लाभत आहे. ही केवळ वर्षांची मोजदाद नाही, तर बाप्पावरील अखंड श्रद्धा, परंपरेचे जतन आणि सेवाभावाची अखंड साधना आहे.

सुनिलभाऊ रासने हे ट्रस्टचे विद्यमान अध्यक्ष आहेत. त्यांच्या कार्याची एक वेगळीच ओळख आहे. मंदिर आज इतके भव्य आणि प्रसिद्ध झाले असले तरी, जेंव्हा मंदिर छोटे होते त्या काळातही सुनिलभाऊ रात्री उशिरापर्यंत देखील स्वतः मंदिराची साफसफाई मनापासून करत असत. बाप्पाच्या सेवेत कोणतेही काम मोठे किंवा छोटे नसते, हीच भावना त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येते.

मंदिरातील आरतीची जी आजची परंपरा आहे - भक्तांना अक्षरशः मंत्रमुग्ध करणारी, भक्तिभावाने ओथंबलेली आणि ऐकताना प्रत्येकाला बाप्पाच्या चरणी गुंग करून टाकणारी ती रसाळ आरती - या आरतीची संपूर्ण रचना सुनिलभाऊंनीच केलेली आहे. आज हजारो भक्त ज्या आरतीत तल्लीन होतात, त्या आरतीमागे सुनिलभाऊंची भक्ति आणि भावना दडलेली आहे. मंदिराच्या व्यवस्थापनातही ते अत्यंत बारकाईने लक्ष घालतात. दररोज स्वतः मंदिरात हजर राहून प्रत्येक गोष्टीकडे जातीने लक्ष देणे, भक्तांची गैरसोय होऊ न देणे ही त्यांची खास कार्यपद्धती आहे. कितीही गर्दी असो, कितीही कामाचा ताण असो, तरीही मंदिर बंद होईपर्यंत सुनिलभाऊ भक्तांसाठी तिथेच उपस्थित असतात. संस्थापकांनी लावलेले भक्तिचे बीज आज भव्य परंपरेच्या वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. त्या परंपरेला जपत अनेक कार्यकर्ते आजही निःस्वार्थ भावनेने बाप्पाची सेवा करत आहेत. गणपती बाप्पांवरील ही अखंड श्रद्धा आणि सेवाभावाची परंपरा अशीच पुढील पिढ्यांपर्यंत फुलत राहो, हीच बाप्पाच्या चरणी प्रार्थना.

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे**

# ॥श्रीमंत॥

या ग्रंथपुष्पाच्या निर्मितीमध्ये जसा जसा मी अधिकाधिक तन्मयतेने सहभागी होत गेलो, तशी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवू लागली व ती म्हणजे या ग्रंथपुष्पाला जर कोणते नाव सर्वार्थाने शोभून दिसणार असेल, तर ते केवळ **"श्रीमंत"** हेच असू शकते. कारण "श्रीमंत" हा शब्द केवळ ऐश्वर्याचा द्योतक नसून, तो प्रगल्भता, परिपक्वता आणि अंतर्मुख समृद्धीचे प्रतीक आहे. हीच समृद्धी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर व मंडळाच्या अस्तित्वात पदोपदी अनुभवायला मिळते.

वास्तविक पाहता खरी श्रीमंती कधीही दाखवावी लागत नाही; ती आपसूकच दिसून येते, लोकांच्या नजरेत भरते आणि मनावर ठसा उमटवते. या ग्रंथातील प्रत्येक पान उलटताना आपल्याला हीच अनुभूती येते. मंडळाची वैचारिक समृद्धी, आध्यात्मिक उंची, कलात्मक संवेदनशीलता, सामाजिक जबाबदारीची जाण, नीतिमूल्यांशी असलेली निष्ठा, वागणुकीतील सुसंस्कार, भारतीय शास्त्रीय संगीताच्या संवर्धनासाठी सुरू केलेल्या 'स्वराभिषेका'सारख्या उपक्रमांची सांस्कृतिक जपणूक, ज्ञानप्रसाराची तळमळ, पर्यावरण रक्षणाची जागरूकता, समाज प्रबोधनाची व्यापकता तसेच क्रीडा क्षेत्रातील योगदान, या सर्व स्तरांवर मंडळाची उच्चकोटीची श्रीमंती प्रखरतेने जाणवते.

परंतु येथे एक महत्त्वाची बाब अधोरेखित करावीशी वाटते,



ही श्रीमंती अचानक लाभलेली किंवा गर्भश्रीमंती नव्हे. मागील आणि विद्यमान पिढीतील विश्वस्त, सेवेकरी व कार्यकर्त्यांनी अपार कष्ट, अखंड सेवा, निष्कलंक सचोटी आणि जीवनमूल्यांशी अढळ निष्ठा ठेवून, पारदर्शकतेच्या आधारे समाजाच्या तळागाळातील प्रत्येक घटकाचा विश्वास संपादन केला आहे. त्याच विश्वासाच्या भक्कम पायावर ही श्रीमंती उभी आहे.

म्हणूनच ही श्रीमंती क्षणिक नसून, ती शाश्वत आहे - सेवा, साधना आणि सद्भावनेतून साकारलेली आहे. या आध्यात्मिक व मानवी समृद्धीचा भाग होणे, हा प्रत्येकासाठीच अभिमानाचा विषय आहे आणि त्या अभिमानात अहंकार नसून, कृतज्ञतेचा निर्मळ भाव दडलेला आहे.

**मिलिंद घैसास**





# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| पाऊलखुणा | १ |
| श्रद्धेचा दीपस्तंभ | ५ |
| एक प्रेरणादायी प्रवास | ७ |
| शून्यातून विश्व निर्मितीकडे | १० |
| श्री गणेशाचा गौरवशाली वारसा | १२ |
| नेत्रांगण | १५ |
| गरुडझेप | १७ |
| आशेचा किरण | २० |
| सर्वसामान्यांची सुवर्णगाथा | २३ |
| परोपकाराची अखंड ज्योत | २५ |
| किरणोत्सव | २६ |
| अंगारकी चतुर्थी | २७ |
| प्रेरणेची पावले, आशेचे किरण | ३० |
| श्रीगणेश जयंती (माघ शुद्ध चतुर्थी) | ३३ |
| मायेचा ओलावा, माणुसकीचं मंदिर | ३५ |
| द्राक्ष महोत्सव | ३९ |
| करुणोपचार | ४१ |
| चैत्र शुद्ध प्रतिपदा - गुढीपाडवा (श्रींच्या मंदिराचा वर्धापन दिन) | ४४ |
| मंदिर व्यवस्थापन | ४६ |

| | |
|---|---|
| श्रद्धेचा आध्यात्मिक प्रवास | ४९ |
| चैत्र शुद्ध द्वितीया वल्लभेश मंगलम | ५१ |
| चैत्र वद्य चतुर्थी (मोगरा महोत्सव) | ५२ |
| नवसंजीवनी | ५५ |
| पुष्टीपती विनायक जयंती (शहाळे महोत्सव) | ५७ |
| इतिहासातील तो एक काळा दिवस | ५९ |
| शेषात्मज गणेश जयंती | ६३ |
| अक्षय्य तृतीया (आंबा महोत्सव) | ६५ |
| मानव सेवा उपक्रम | ६९ |
| गणेशोत्सव (भाद्रपद शुद्ध चतुर्थी – अनंत चतुर्दशी) | ७७ |
| मातीतून माणुसकीपर्यंत | ८९ |
| उत्सव व्यवस्थापन | ९१ |
| ज्ञानवर्धनाचा तेजोमय दीप | ९४ |
| संगीत महोत्सव | ९८ |
| गणेश जयंती - उमांगमलज (कार्तिक शुद्ध चतुर्थी) | १०३ |
| वारसा परंपरेचा | १०५ |
| ऊर्जेचे दिव्य प्रक्षेपण (अतिरुद्र महायज्ञ) | १०९ |
| तुळशी विवाह | १११ |

संकल्पना व रचना (Concept & Design)
आदिवेद अॅडव्हर्टायझिंग प्रा. लि.

सर्जनशील संचालक (Creative Director)
मिलिंद घैसास

कला संचालक (Art Director)
स्वाती घैसास

कलात्मक मांडणी (Artworks & Post-Production)
यश वाघरे

मुद्रितशोधन (Proofreading)
रवीन्द्र पिंपळकर

प्रक्रिया आणि छपाई (Processed & Printed At)
इमेज प्रॉडक्शन

© श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे

हे पुस्तक श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पांच्या पवित्र चरणी अर्पण केलेल्या श्रद्धाभावातून आणि दृढ विचारांतून साकारलेले एक नम्र समर्पण आहे. वाचकांनी या पुस्तकाचा सकारात्मक आणि व्यापक दृष्टिकोनातून स्वीकार करावा, ही विनम्र अपेक्षा.पुस्तक निर्मितीच्या प्रक्रियेत आवश्यक तेथे सर्जनशील स्वातंत्र्याचा अवलंब करण्यात आला आहे. कोणाच्याही भावना दुखावण्याचा कोणताही उद्देश नसून, केवळ भक्तिभाव आणि आदरभाव यांतून हे लेखन साकारले आहे.या पुस्तकातील कोणताही भाग छापील किंवा डिजिटल स्वरूपात, तसेच इतर कोणत्याही माध्यमातून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर न्यास यांच्या लेखी परवानगीशिवाय पुनर्मुद्रित किंवा प्रसारित करू नये, ही नम्र सूचना.

# पाऊलखुणा



आज श्रीमंत दगडूशेठ गणपती बाप्पांच्या पवित्र चरणी या संग्राह्य पुस्तकाची प्रत ग्रंथपुष्प म्हणून अर्पण करताना आमच्या सर्वांच्या मन:पटलावरून गेल्या अनेक दशकांचा तेजस्वी व भावस्पर्शी प्रवास डोळ्यांसमोरून झरकन सरकू लागला आणि नकळत आनंदाश्रू वाहू लागले. हे अश्रू होते अलौकिक समाधानाचे, आध्यात्मिक परिपूर्णतेचे आणि अपार आनंदाचे.

त्या काळात श्री सद्गुरू माधवनाथ महाराजांच्या कृपाशीर्वादाने श्रीमंत दगडूशेठ व पुण्यश्लोक लक्ष्मीबाई यांनी पेरलेल्या श्रद्धा व भक्तीच्या देव मंदिरातील बिजाचा आज मानवसेवेच्या महामंदिरात झालेला वटवृक्ष बघताना अंगावर रोमांच उभे राहत आहे. या दिव्य परिवर्तनाचा साक्षीदार होणे, हे नक्कीच आम्हा सर्वांचे कित्येक जन्मांचे पुण्यकर्म असावे, असे वाटते.

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या एका उत्सवी प्रारंभातून, समाजहिताच्या असंख्य उपक्रमांसह कायमस्वरूपी मंदिराच्या भव्य उभारणीपर्यंत पोहोचलेल्या या अद्वितीय यात्रेची यशोगाथा अभिमानाने उल्लेखावी अशी एकमेवाद्वितीय असेच म्हणावे लागेल.



**सन १८९३ ... केळीच्या खुंटांनी सजविलेल्या अश्वरथात निघालेली श्रींची मिरवणूक ज्यामध्ये लोकमान्य टिळक, श्रीमंत दगडूशेठ हलवाई, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी, 'काळ'कर्ते शिवराम महादेव परांजपे, गोविंद दाजी जोशी, बाबुराव गोडसे, सोमनाथशेठ गाडवे व इतर कार्यकर्ते**

१८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली तेव्हाच या गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. नंतर श्रीमंत दगडूशेठ यांच्या निधनानंतर, १९५२ साली या उत्सवाची धुरा सर्वार्थाने 'सुवर्णयुग तरुण मंडळा'ने स्वीकारली.

त्या वेळी तात्या गोडसे, मामा रासने, आप्पा सूर्यवंशी आणि बुवा रासने, रघुनाथ महाराज केदारी व त्यांचे सहकारी यांनी मिळून संपूर्ण कारभारात पारदर्शकतेची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या या दूरदृष्टीमुळेच "दगडूशेठ हलवाई गणपती" हे नाव मंदिर आणि श्रद्धेबरोबरच विश्वासार्हतेचे प्रतीक बनले.

याचा उत्तम पुरावा म्हणजेच नंतर 'श्रीमंत दगडूशेठ गणपती' उत्सवाचा दरवर्षी प्रकाशित होणारा जमाखर्च अहवाल. अवघा १ रुपया असो वा हजारोंची देणगी, प्रसादापासून ते नारळापर्यंत प्रत्येक जमा व खर्च नोंदवून ठेवण्याची ही पारदर्शकता पाहिली की मन भारावून जाते. इतकं तत्त्वनिष्ठ काम करणारे 'श्रीमंत दगडूशेठ' हे पहिले सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ असेल, यात शंकाच नाही. आपल्या परिसरातील कष्टकऱ्यांच्या श्रमांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी तसेच गरजू कुटुंबांना आधार देण्याच्या हेतूने 'सुवर्णयुग सहकारी बँके'ची स्थापना करण्यात आली.

जे या सामाजिक प्रवासातील पहिले मोठे पाऊल ठरले. आज ती राज्यातील अत्यंत विश्वासार्ह बँक म्हणून ओळखली जाते. हेच आमच्या प्रयत्नांचे सुवर्णफळ.

त्यानंतर कोंढव्यात उभारलेले अनाथ मुले आणि देवदासींच्या अपत्यांसाठी बालसंगोपन केंद्र. येथे वाढलेल्या अनेक मुलांपैकी एक आज इसरो मधील एका प्रकल्पासाठी शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहे, तर इतर विद्यार्थी नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये नोकरी करीत आहेत. आज त्यांपैकी कित्येकजण इतर विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी प्रयत्नशील आहेत आणि हाच आमच्या परंपरेचा खरा वारसा.

दुसऱ्यांच्या घरासाठी विटा बनवणाऱ्या वीटभट्टी कामगारांना स्वतःच्या हक्काचं घर नको का? या भावनेतून सिंहगड रस्त्यावर उभारलेले 'गणपती नगर गृहसंकुल' हा आमच्या कार्याचा भावनिक कळसाध्याय ठरला.

सन २००३ मध्ये कोंढव्यातच उभारलेला वृद्धाश्रम, आजी-आजोबा आणि नातवंडांच्या नात्याने उजळलेला हा परिवार पाहताना हृदय भरून येते. हाच तीन पिढ्यांचा स्नेहबंध.



रोज 'ससून रुग्णालया'तील ३,२०० रुग्णांना भोजन-नाश्ता, चहा, नातेवाइकांसाठी निवारा, तसेच अत्यवस्थ रुग्णांना वैद्यकीय साहाय्य या सर्वांसाठी न्यास दरवर्षी तीन कोटीं रुपयांचा खर्च करत आहे. हेच आमच्या समाजबंधुत्वाचे जिवंत प्रतीक. याचबरोबर पोलिओ निर्मूलन मोहिमा, वारकऱ्यांसाठी अन्नदान, फिरते दवाखाने, 'जय गणेश ज्ञानवर्धन' योजना, सैनिकांसाठी शौर्य पुरस्कार, आपत्तीग्रस्तांना मदत, वृक्षारोपण, जलसिंचन योजना अशा असंख्य कृतींनी न्यासाची कार्यसंस्कृती समृद्ध होत गेली. कबड्डी सारख्या दमदार मैदानी खेळात आमच्या 'सुवर्णयुग स्पोर्ट्स क्लब'च्या सुमती पुजारीने भारताच्या कर्णधारपदापर्यंतची शिखरयात्रा पार केली. तिच्या तेजस्वी वाटचालीच्या पाऊलखुणांवर मार्गक्रमण करत दीपिका जोसेफने तर थेट विश्वचषक जिंकण्याची सर्वोच्च कामगिरी आपल्या मेहनतीच्या बळावर साध्य केली. 'हिंदकेसरी' स्पर्धेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त, ट्रस्टने कुस्तीगीर महासंघाकडे विशेष विनंती करून जबलपूरऐवजी पुण्यात स्पर्धेचे आयोजन करण्यात यश मिळवले. आणि अपेक्षेप्रमाणे, या भव्य स्पर्धेचे अतिशय प्रशंसनीय, सुयोजित आणि वैभवशाली आयोजन संस्थेतर्फे पार पाडण्यात आले. समाजातून आलेला प्रत्येक रुपया पुन्हा समाजहितासाठीच वापरणे हीच आमची अढळ परंपरा. देवालयात भक्तांकडून अर्पण झालेलं दान असो किंवा मानवतेच्या महामंदिरासाठी मिळालेल्या देणग्या - हाच आमच्या सर्व उपक्रमांचा पवित्र श्वास. म्हणूनच अत्यंत निर्मळ, स्पष्ट आणि निर्दोष पारदर्शकता हीच आमची कणखर ओळख.

मंडळाने स्वतःवर घालून घेतलेली शिस्त, प्रामाणिकपणा आणि स्वनियंत्रणाची कठोर जबाबदारी ही कायमस्वरूपी तशीच राहावी म्हणून एक आचारसंहिता तयार करण्यात आली. इतकेच नव्हे, तर हाच मार्गदर्शक दीप पाहून महाराष्ट्रात अनेक गणेशोत्सव मंडळे मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न देखील करीत आहेत. ही बाब मंडळाचीच अग्रगण्य परंपरा सिद्ध करते.

तसेच मंदिरातील विविध उत्सव, श्रींच्या मूर्तीची वैशिष्ट्ये, अलंकार, भक्तांचे अनुभव, आणि काळाच्या तालावर सजलेली आधुनिक तंत्रज्ञानाची झलक - या सर्वांचा समावेश करून हे ग्रंथपुष्प म्हणजे श्रींच्या कृपेचा सुवर्णलेख आहे असंच म्हणावं लागेल.

आमच्या आधीच्या पिढ्यांनी जपलेल्या मानवतेच्या पाऊलखुणांवर अविरतपणे मार्गक्रमण करत राहणे हे खरोखरच शिवधनुष्य पेलण्यासारखे आव्हानात्मक कार्य आहे. पण हे सर्व श्री गणरायाच्या कृपेनेच शक्य होत आहे, असा दृढ विश्वास आमच्या सर्व कार्यकर्त्यांच्या अंतःकरणात आहे. हाच भाव आमच्यात अगदी खोलवर रुजलेला असल्याने कधीही वादविवाद, तंटे, भांडणे किंवा राजकारण



या गोष्टींना आमच्या या पवित्र कार्यात थाराच दिला जात नाही. यामुळेच लोकांनी आमच्यावर ठेवलेला निखळ विश्वास अधिकाधिक दृढ होत गेला आणि आम्हीही समाजात निष्कलंक प्रतिष्ठेने, ताठ मानेने वावरू शकलो. हे कालचक्र असंच अव्याहतपणे पुढे सरकत राहो, हीच श्री गणरायाच्या चरणी मनापासून केलेली प्रार्थना.

ही एक फक्त संग्राह्य पुस्तिका नसून लाखो भक्तांच्या श्रद्धेचा, कृतज्ञतेचा आणि समाजसेवेच्या अखंड प्रवाहाचा एक आदर्श प्रवास आहे!

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई**
**सार्वजनिक गणपती ट्रस्ट**

# श्रद्धेचा दीपस्तंभ

पुणे येथे त्या काळातील नामांकित व्यापारी म्हणून ओळखले जाणारे श्रीमंत दगडूशेठ हलवाई हे समाजातील एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व होतं. ते पुण्याचे पहिले शेरीफ (महापौर) होते.



कै. श्रीमंत दगडूशेठ हलवाई व पुण्यश्लोक कै. लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई

१८९६ च्या सुमारास प्लेगसारख्या महाभयंकर महामारीचे संकट कोसळले होते आणि सगळीकडे अक्षरशः हाहाकार माजला होता. हजारो कुटुंबांच्या संसाराचा दिवा मालवला... त्यातच दगडूशेठ यांचा मुलगाही या साथीत दगावला. या भीषण आघाताने दगडूशेठ आणि त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई अक्षरशः उन्मळून पडले होते.



॥ योगाभ्यानंद श्रीसद्गुरू माधवनाथ महाराज ॥

नंतर पुढील काहीच महिन्यांत श्रीमंत दगडूशेठ यांचेही निधन झाले. अशा अवस्थेत त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांना सावरण्यासाठी व धैर्य देण्यासाठी त्यांचे सद्गुरू श्री माधवनाथ महाराज पुढे सरसावले. त्यांनी लक्ष्मीबाईंना भक्तिमार्गाचा आश्रय घ्यावा, असा उपदेश केला - "श्री दत्तात्रेय आणि श्री गणेश यांची उपासना करा व त्यांच्या सेवेतच जीवनाची नवी दिशा शोधा. जशी लेकरं मोठी होऊन आपल्या आई-वडिलांचे नाव उंचावतात, तशीच ही दैवतंही तुमच्या घराण्याचा नावलौकिक वाढवतील".

सद्गुरूंच्या या आशीर्वादाप्रमाणे लक्ष्मीबाईंनी संगमरवराची श्री दत्तात्रेयांची मूर्ती तयार करून घेतली. श्रीगणेशाची प्रतिष्ठापना आधीच झाली होती. या दोन दैवतांच्या प्रतिष्ठापनेसह एका नव्या आध्यात्मिक प्रवासाची सुरुवात झाली - भक्तिभाव, निष्ठा आणि समर्पणाची दीपशिखा तेव्हाच प्रज्वलित झाली होती.



काळ पुढे सरकत गेला. श्रीमंत दगडूशेठ यांच्या पश्चातही हा उत्सव तितक्याच भक्तिभावाने चालू राहिला. एव्हाना हा उत्सव त्या परिसरातील सर्वांच्या जिव्हाळ्याचा बनला होता. व्यापारी समाज व परिसरातील बंधुभगिनींनी, उत्सवासाठी नि:स्वार्थ भावनेने हातभार लावण्यास सुरुवात केली होती. नंतर एक ऐतिहासिक क्षण आला...सन १९५२ मध्ये हा गौरवशाली उत्सव तात्या गोडसे, मामा रासने, आप्पा सूर्यवंशी, बुवा रासने आणि त्यांच्या 'सुवर्णयुग बालमंडळा'कडे सोपविण्यात आला. कारण अनेक वर्षे हे कार्यकर्ते समर्पितपणे व अत्यंत निष्ठेने उत्सवात हातभार लावत होते. हातात आलेल्या परंपरेची अमूल्य धुरा आणि श्रीशिल्लक होती तीनशे रुपये! पण तात्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा उत्साह, निश्चय आणि लोकांचा विश्वास - हेच त्यांचं खरं भांडवलं होतं. या श्रीगणेशाची कीर्ती जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचावी, यासाठी कार्यकर्त्यांनी दृढ संकल्प केला. हाच उत्साह पुढे १९६७ च्या अमृत महोत्सवातून आपल्या शिखराला पोहोचला. वर्गणी जमा करण्याचे उद्दिष्ट पंचवीस हजार रुपये होते, परंतु पुणेकरांच्या अनन्यसाधारण जिव्हाळ्यामुळे ती रक्कम थेट चाळीस हजार रुपयांपर्यंत पोहोचली. आता हा गणेशोत्सव मंदिरापुरता मर्यादित न राहता लोकांच्या मनामनांत दाटून राहू लागला. नंतर उजाडलं १९८४ साल - श्रीमंत दगडूशेठ गणपती सध्याच्या ठिकाणीच, पण अत्यंत छोट्या मंदिरात विराजमान झाले. त्या क्षणापासून परिसराचे भाग्यच उजळले - व्यापारात वृध्दी, सांस्कृतिक विकास, श्रद्धेचा उगम... सर्वकाही नव्याने फुलू लागलं. हळूहळू 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट' आणि सार्वजनिक गणपती ही नावं श्रद्धा, आस्था आणि नि:स्वार्थ सेवाभावाचे प्रतीक बनली. आणि यामागचं खरं कारण म्हणजे ट्रस्टची पारदर्शक व्यवस्था, शिस्तबद्ध कामकाज, विश्वासार्ह कार्यपद्धती आणि कार्यकर्त्यांची अथक मेहनत. आज या संपूर्ण प्रवासाकडे मागे वळून पाहिलं की - एका सद्गुरूने दाखवलेला सन्मार्ग, आणि लाखो भक्तांच्या हातांनी घडवलेली ही दिव्य परंपरा - खरंच अक्षय श्रद्धेचं, समर्पणाचं आणि पुण्यभूमीतील भक्तिभावाचं अद्वितीय उदाहरण ठरली आहे.

# एक प्रेरणादायी प्रवास

अतिशय सर्वसामान्य घरातून आलेले तात्या- फुलांच्या दुकानात फुले ओवण्यापासून पानाची टपरी चालवणे



आणि बँकेत शिपाई म्हणून काम करण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत वाढलेले, जेमतेम शिक्षण असलेले, तरी त्यांच्या अंगी उपजत कर्तृत्व आणि कार्याची ओढ होती. अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांनी 'सुवर्णयुग तरुण मंडळ' स्थापन केलं होतं आणि तेव्हाच त्यांच्या भोवती निष्ठावान कार्यकर्त्यांची जणू फळीच उभी राहिली होती. त्या काळी श्रीमंत दगडूशेठ हलवाईंचा गणपती बुधवार पेठेतील त्यांच्या आळीत स्थापला जात असे.



तात्या आणि 'सुवर्णयुग'चे कार्यकर्ते उत्सवात मनापासून त्यांना मदत करीत असत. १९५२ मध्ये गणपती उत्सवाची संपूर्ण जबाबदारी 'पंच मंडळा'कडून 'सुवर्णयुग तरुण मंडळा'कडे आली.



**स्व. प्रतापराव बाबुराव गोडसे (तात्या)**
संस्थापक अध्यक्ष



**स्व. दिगंबरराव केशवराव रासने**
संस्थापक उपाध्यक्ष



**स्व. शंकरराव शिवराम सूर्यवंशी**
संस्थापक कोषाध्यक्ष



**स्व. काशीनाथ दत्तात्रय रासने**
संस्थापक सरचिटणीस

तात्यांवर मोठी जबाबदारी आली होती. ती वाटून घ्यायला मित्रमंडळी ही होतीच. मामा रासने, आप्पा सूर्यवंशी आणि बुवा रासने ही त्यातील आघाडीची नावं.

आप्पा सूर्यवंशी आणि बुवा रासने हे साध्या सरकारी नोकरीतील माणसं. दिवसभराची कामं उरकल्यानंतर रोज रात्री आपल्या कार्यकर्त्यांसोबत भेटून उत्सवाच्या कामात स्वतःला झोकून देणं हा त्यांचा दिनक्रम होता.



आर्थिक परिस्थिती साधी, जेमतेम संसार करण्याइतकीच, पण स्वप्न मात्र प्रचंड मोठी! उत्सव जगभर पोहोचावा, कायमस्वरूपी गणेश मंदिर उभं राहावं आणि वर्षभर दर्शनाची सोय व्हावी. म्हणून किती ही मोठी स्वप्न! किती ही मोठी दांडगी इच्छाशक्ती! इतक्या सर्वसामान्य परिस्थितीतील ही माणसं हा विचारदेखील कसा करू शकतात? हीच तर खरी गणेशाची कृपा व त्यानेच दिलेली बुद्धी असंच म्हणावं लागेल.

बी.ए., एल.एल.बी. शिक्षण घेतलेल्या आप्पा सूर्यवंशींनी तात्यांच्या कल्पनांना सुस्पष्ट आकार दिला व बुवा रासनेंनी कार्यपद्धतीत शिस्त आणली.

या तिघांच्या प्रयत्नांतून उत्सवात शिस्त आणि पारदर्शकता रुजली. वर्गणीतील प्रत्येक पैशाचा काटेकोर वापर झाल्याने 'दगडूशेठ गणपती' हे नाव श्रद्धेसोबत विश्वासार्हतेचं प्रतीक बनलं.

लोकमान्य टिळकांचा जनजागृतीचा आणि देशाच्या स्वातंत्र्याचा उद्देश साध्य झाल्यानंतर उत्सवाला नवी दिशा देण्याची गरज निर्माण झाली होती.

तात्यांपुढील खरे आव्हान म्हणजे हा गणपती केवळ दहा दिवसांचा न राहता लोकांचा, गणपती बनवणं. वरवर साधा दिसणारा हा माणूस किती दूरदृष्टीचा आहे, हे याच काळात सर्वांसमोर स्पष्ट होऊ लागलं. गणेशपूजा, पहाटे सनईवादन, सौ. अलकाताई पेंडसे यांची भजने असे धार्मिक उपक्रम सुरू झाले.

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ हे वार्षिक जमाखर्चाचा अहवाल सार्वजनिकरीत्या सादर करण्याची परंपरा सुरू करणारे पहिले गणेश मंडळ ठरले आहे.**

**उत्सव मिरवणुकीत गुलाल उधळण्याची प्रथा बंद करून पर्यावरणपूरक, सुसंस्कृत व संयमित उत्सव साजरा करण्याचा संदेश देणारे हे पहिले मंडळ आहे. या निर्णयाने सामाजिक जबाबदारीची जाणीव अधोरेखित केली.**



१९६७ सालचा अमृत महोत्सव या वाटचालीतील निर्णायक वळण ठरला. २५ हजार रुपये वर्गणी गोळा करण्याचं उद्दिष्ट केवळ पूर्णच झालं नाही, तर तब्बल ४० हजार रुपये जमा झाले. हा आता उत्सवाच्या चौकटीपलीकडे जाऊन खऱ्या अर्थाने 'लोकांचा गणपती' झाला होता.

त्या सुमारास राज्याची स्थिती सामाजिक शैक्षणिक प्रश्न अशा अनेक विषयांवर समाज प्रबोधन व्हावे या दृष्टीने व्याख्यानमाला सुरू करण्यात आल्या होत्या.

मुलांसाठी परिसरातील मोफत क्लासेस अथवा प्रशिक्षणासाठी त्यांचे शिक्षण वर्ग सुरू केले जाऊ लागले. काळ बदलत होता त्याप्रमाणे उत्सवावरदेखील याचा परिणाम होत होता. १९८४ मध्ये मंडळाने संगीत महोत्सवास सुरुवात केली.

१९९२ मध्ये हा शताब्दी वर्षाचा उत्सव असल्यामुळे त्या साली हा उत्सव दहा दिवसांसाठी न ठेवता तब्बल ५७ दिवसांपर्यंत ठेवला गेला. या सुमारास देशातील उत्तमोत्तम कलाकार आपल्या गायन, वादनाची कला येथे येऊन सादर करून गेले.



# शून्यातून विश्व निर्मितीकडे

आज श्रीमंत दगडूशेठ गणपती उत्सव मंडळाकडे एक श्रीमंत, सुस्थितील संपन्न व भक्कम संस्थेच्या नजरेने पाहिले जाते. लोकही ते आवर्जून सांगतात.

परंतु या यशामागील खडतर प्रवास उलगडून पाहिला तर त्याची मुळं कुठे रुजलेली आहेत हे लक्षात येईल.

कार्यकर्त्यांची अखंड मेहनत, श्रद्धेने आणि सेवाभावनेने केलेला रात्रंदिवसाचा संघर्ष, व्यवहारातील निष्कलंक पारदर्शकता, जनसमुदायाचा निर्माण केलेला अढळ विश्वास आणि मानवसेवेचा दीप घेऊन मार्गक्रमण करणारी जीवनयात्रा हे आहेच परंतु या सर्व गुणांची परंपरा मागील पिढ्यांनी जशी रोवली, तशीच तिची जोपासना आजचे कार्यकर्ते करीत आहेत हे निर्विवाद सत्य आहे.







मंदिराच्या परिसराचा विचार करताच अनेक प्रश्न मनाला छेडून जातात. एका बाजूला पुण्यातील गजबजलेली मोठी मंडई - तिथून निर्माण होणारी वाहतुकीची प्रचंड कोंडी.



दुसऱ्या बाजूला वेश्या व्यवसायाची वस्ती. त्यात दारू, जुगार अशा व्यसनांच्या भटकंतीत अडकू पाहणारी तरुण पिढी... अशा कठीण वातावरणात स्वतःला सांभाळत, संघर्षाच्या वाटेवरून मार्ग काढत, आपल्या पायांवर उभे राहून आज सात्विक, आध्यात्मिक व मानवधर्मासाठी झटणारे कार्यकर्ते घडले - हे दृश्य पाहताना डोळे खरंच तृप्त होतात. बहुसंख्य कार्यकर्त्यांची सामाजिक परिस्थिती तर अत्यंत साधी. हातावर पोट असलेली कुटुंबे. आज काम मिळाले तरच घरात जेवणाची चूल पेटणार अशी अवस्था. कोणी फुलविक्रेते, कोणी गजरे करणारे, कोणी भाजीपाला विकणारे, तर कोणी घरकाम करून उदरनिर्वाह करणारे...

अशा खडतर आयुष्याचा सामना करत गणपती उत्सव मंडळाच्या कामात स्वतःला झोकून देणे ही सोपी गोष्ट नाही. उत्सवकाळात तर ३६ ते ४० तास तहान,भूक विसरून, आपल्या सुखदुःखांना बाजूला ठेवून, कोणालाही त्रास होणार नाही याची काळजी घेत निरंतर सेवा करत राहणे - यातच त्यांची धन्यता दडलेली आहे.

परिस्थितीने ढवळून काढले, मोहाचे क्षण आले, गैरव्यवहार करण्याची संधी जवळ आली... तरीही कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडणे - हे फक्त गणपती बाप्पाचे आशीर्वाद आणि मागील पिढ्यांचे संस्कार असेच म्हणावे लागेल.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाचा ध्यास म्हणजे 'पारदर्शकता' व 'विश्वास'. आमच्याकडे येणारा प्रत्येक रुपया - तो आमचा नसतोच - तो श्री गणेशाचा व मानव कल्याणासाठीच असतो. आम्ही तर त्या धनाचे फक्त रक्षणकर्तेच आहोत. त्यामुळे प्रत्येक रुपयाचा योग्य ठिकाणीच उपयोग व्हावा यासाठी कधीही तडजोड केली जात नाही. त्याचमुळे आज हे मंडळ 'निष्कलंक' म्हणून ओळखले जाते. सर्वांनीच अशा पारदर्शकतेने, सेवाभावाने, कठोर परिश्रमांनी व सुसंस्कृत संस्कारांनी आपली वाटचाल केली तर "शून्यातून विश्व निर्मिती" हा शब्द केवळ एक अलंकारिक वाक्य न राहता एक जिवंत अनुभव बनेल. आणि त्या क्षणी या ग्रंथपुष्पाचं उद्दिष्ट साध्य होईल.

# श्री गणेशाचा गौरवशाली वारसा

सन १८९३ पासून सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करणारा 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट' हा पुण्यातील प्राचीन व प्रतिष्ठित मंडळांपैकी एक आहे. नावात जशी परंपरेची छाप दिसते, तशी मूर्तींच्या प्रवासातही काळानुसार बदलांची रोचक कहाणी दडलेली आहे. सुरुवातीला नगरशेठ दगडूशेठ हलवाई यांनी १८९३ मध्ये कोतवाल चावडी येथे बाहुलीच्या हौदाजवळ गणेशोत्सवाची सुरुवात केली. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीने तीच मूर्ती आळीतील लोकांकडे सोपवली. पुढे अमृत महोत्सवानंतर मंडळ ट्रस्टमध्ये रूपांतरित झाले आणि संस्थापकांच्या स्मरणार्थ त्याला 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई' हे नाव देण्यात आले.

## १८९३ : पर्यावरणपूरक मूर्तीपासून सुरुवात

नानासाहेब खाजगीवाले यांनी ग्वाल्हेरमध्ये पाहिलेल्या गणेशोत्सवाने प्रेरित होऊन सार्वजनिक उत्सवाची संकल्पना लोकमान्य टिळकांना सांगितली. पुण्यातील मान्यवरांच्या बैठकीत १८९३ मध्ये शहरात पाच ठिकाणी उत्सव साजरा करण्याचा निर्णय झाला. या उपक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यानंतर टिळकांनी दै.केसरीमधून याला व्यापक स्वरूप देण्याचे आवाहन केले.

याच वर्षी दगडूशेठ हलवाईंनी कोतवाल चावडी येथे कागदाच्या लगद्याची पर्यावरणपूरक गणेशमूर्ती प्रस्थापित केली. श्री. नाईक यांनी तयार केलेली ही चतुर्भुज, सुखासनात असलेली मूर्ती भक्तरक्षणासाठी पाश-परशूसह अतिशय प्रसन्न स्वरूपात होती. पारतंत्र्याच्या काळात प्रचलित योद्धा-गणेश रूपांऐवजी आशीर्वादमूर्तीची निवड ही त्यांचीच विचारपूर्वक संकल्पना होती.

ही पहिली मूर्ती सलग तीन वर्षे प्रस्थापित झाली आणि आजही परांजपे यांच्या अकरा मारुती मंदिरात जतन करून ठेवली आहे.



## १८९६ मधील श्री गणेश मूर्ती

१८९६ मध्ये श्रीमंत दगडूशेठ यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीने पहिल्या मूर्तीप्रमाणेच दुसरी मूर्ती मूर्तिकार श्री. नाईक यांच्याकडून करून घेतली आणि ती आळीतील लोकांच्या ताब्यात देत उत्सवाची परंपरा सुरू ठेवली. त्यामुळे १८९७ पासून बाहुलीच्या हौदाचा गणेशोत्सव हा लोकवर्गणीतून साजरा होऊ लागला.

१९५२ मध्ये हा उत्सव आळीतील काही व्यापारी व तात्यासाहेब गोडसे, मामासाहेब रासने, शंकरराव सूर्यवंशी, काशिनाथराव रासने, लक्ष्मणराव जमदाडे, गजानन केदारी, निवृत्तीराव रायकर, बाळकृष्ण जमदाडे आणि दत्तोबा चव्हाण, यांच्या नेतृत्वाखाली पार पडू लागला. हीच दुसरी मूर्ती मंडळाच्या अमृत महोत्सवापर्यंत, म्हणजे १९६७ पर्यंत प्रस्थापित होत राहिली.

अमृत महोत्सवाच्या सुमारास मूर्तीचा एक हात तुटण्याइतका कमकुवत झाल्याने नव्या मूर्तीची गरज भासू लागली. जुन्या मूर्तीचे विसर्जन न करता ती दुरुस्त करून जतन करण्यात आली. आज ही ऐतिहासिक दुसरी मूर्ती ट्रस्टच्या कोंढव्यातील बाल संगोपन केंद्रातील गणेश मंदिरात मोठ्या दिमाखात विराजमान आहे.



१९६५ च्या भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवर युद्धावर आधारित हलणारा 'चलचित्र देखावा' साकार करणारे हे पहिले मंडळ ठरले. या अभिनव उपक्रमानंतर इतर उत्सव मंडळांनीही चलचित्र देखावे साकारण्यास सुरुवात केली.

## १९६८ ची 'लाडिवाळ' मूर्ती

अमृत महोत्सवानंतर नवी मूर्ती घडवण्याबाबत चर्चा सुरू झाली तेव्हा मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. बाळासाहेब परांजपे यांनी बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत असलेल्या, मूर्तीनिर्मितीचे कसब लाभलेल्या नागेश शिल्पी यांचे नाव सुचविले. नागेश शिल्पींनी ही कला त्यांचे वडील शंकराप्पा शिल्पी यांच्याकडून प्राप्त केली होती. नागेश शिल्पी यांनी महाविद्यालयासाठी घडवलेली नटराजाची मूर्ती पाहून त्यांच्यावर विश्वास ठेवण्यात आला.

जुन्या मूर्तीचा फोटो देत त्यांना प्रथम एक फूट उंचीची नमुना-मूर्ती तयार करण्यास सांगितले. तयार मूर्ती 'आर्यन टॉकीज'मध्ये आळीतील प्रतिष्ठित नागरिकांना दाखविण्यात आली आणि ती एकमताने मंजूर झाली. त्यानंतर त्याच स्वरूपात मोठी मूर्ती बनविण्याचे काम नागेश शिल्पींना सोपवण्यात आले.

नागेश शिल्पी हे दक्षिण भारतीय शैलीचे निपुण कलाकार होते. तिरुपती बालाजी, चामुंडेश्वरी इत्यादी मूर्ती त्यांनी तयार केल्या होत्या. त्यांनी गणेशमूर्तीच्या पोटात सिद्ध गणेशयंत्र बसविण्याचा प्रस्ताव ठेवला. त्यामुळे दक्षिण भारतात मूर्ती 'जागृत देवस्थान' म्हणून मान्यता पावते, अशी सूचना केली. ही सूचना मंडळाने त्वरित स्वीकारली.

त्यानुसार ताम्रपटावर तयार केलेले यंत्र मंत्रपठण व होमसंस्कारांनी सिद्ध करण्यात आले. सूर्यग्रहणाच्या दिवशी मुळा-मुठा संगमात उभे राहून नागेश शिल्पींनी हे यंत्र मूर्तीच्या पोटात प्रतिष्ठापित केले. पुढील बारा महिने मूर्तीवर



रुद्रपठण व धार्मिक विधी करण्यात आले. २७ ऑगस्ट १९६८ रोजी नव्या मूर्तीची प. पू. श्री गुळवणी महाराज यांच्या हस्ते शास्त्रोक्त पद्धतीने प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आणि दगडूशेठ गणपतींच्या इतिहासात एक नवा अध्याय सुरू झाला. देशात मातीच्या मूर्तीचे स्थायी मंदिर उभारण्याची परंपरा क्वचितच आढळते - दगडूशेठ हलवाई गणपतीचे मंदिर हा त्यातील उल्लेखनीय अपवाद आहे. पहिले मंदिर १९८४ साली बुधवार पेठेत, बुधवार चौकातील हौदाजवळ उभे राहिले. वाढत्या भाविकसंख्येमुळे त्याच्या शेजारच्या जागेत भव्य व विस्तारित मंदिर २००६ साली बांधण्यात आले.

# नेत्रांगण



श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या गाभाऱ्यात प्रवेश करताच प्रथम दर्शनातच ती लोभस, ऐश्वर्यपूर्ण आणि मनाला भुरळ घालणारी मूर्ती जशी सामोरी येते, तसे अंगावर अक्षरशः रोमांच उभे राहतात. जेव्हा आपण स्थिरस्थावर होऊन त्या गणरायाच्या चेहऱ्याकडे बघतो तेव्हा त्याच्या डोळ्यांतून झळकणारी प्रेममय, भावपूर्ण आणि दिव्य चमक आपल्या अंत: करणाला थेट स्पर्श करून जाते आणि नकळत आपल्याच डोळ्यांत पाणी दाटून येतं.

विचार करा - गाभाऱ्याच्या कोणत्याही कोपऱ्यात उभे राहा; उजवीकडे, डावीकडे किंवा मधोमध... त्या भावपूर्ण डोळ्यांची नजर नेहमीच जणू आपल्यावरच स्थिर असते. गर्दीतल्या एका क्षणिक दर्शनातही अनेक भक्तांना हा अनुभव येतो - गणराया आपल्याकडेच पाहतोय, प्रेमाने आणि आशीर्वादाच्या भावनेने. काही भक्त तर सांगतात की उत्सवातील मिरवणुकीत फक्त काही क्षण बाप्पाचा चेहरा दिसला तरीही त्या भावपूर्ण नजरेमुळे मन पूर्णपणे कृतार्थ झाल्यासारखे वाटते.

जणू त्या डोळ्यांतून गणराया प्रत्येकाला सांगत असतो - "तू कष्ट कर, सत्याच्या वाटेने जा, सर्वांच्या हिताचाच विचार कर, मग मी आहे तुझ्या पाठीशी. माझी नजर तुमच्यावर सदैव आहेच." तो फक्त देण्यासाठीच बसला आहे, कसलीही अपेक्षा न करता.पण मग प्रश्न असा पडतो की इतके अप्रतिम, भावपूर्ण डोळे कोणी घडवले असतील? कसं शक्य झालं असेल हे? या उत्सुकतेमुळे मी मंडळातील काही मान्यवरांशी चर्चा सुरू केली, आणि जी माहिती समोर आली ती ऐकून मी थक्कच झालो.

मूर्ती घडवताना सर्वानुमते असं ठरलं की बाप्पाचे डोळे सर्वस्वी परिपूर्ण, अत्यंत सुंदर आणि जिवंत वाटतील असेच असावेत. माती किंवा मार्बलमध्ये तेवढी प्रभावशाली चमक येणार नाही याची जाणीव असल्याने विशिष्ट काचेचे डोळे तयार करण्याचा निर्णय घेतला.

यासाठी कोण कलाकार योग्य असेल यावर अनेक दिवस शोध घेतला गेला. काही जणांनी नमुनेही तयार केले. अखेर सर्वांच्या एकमताने श्री. महामुनी नावाच्या एका ज्येष्ठ कारागिराकडे हे नाजूक आणि अत्यंत कौशल्यपूर्ण काम सोपविण्यात आले.



कामाला सुरुवात झाली - सुरुवातीला रेखाटनं, मग नमुने. पण हे काम अवघडच नव्हे तर अत्यंत सूक्ष्म होतं, कारण काचेच्या डोळ्यांना आतील बाजूने रंगकाम करावं लागतं, तेव्हाच त्यात नैसर्गिकता, खोली आणि दिव्य भाव उमटू शकतो.

पहिले २५-३० प्रकार तयार झाले, पण समाधान नाही. पुन्हा १०-१५ प्रकार तयार केले गेले अशा रीतीने एकामागून एक करत करत तब्बल ३५० वेगवेगळे नमुने बनवले गेले. अनेक दिवसांची मेहनत, जागरणं, सुधारणा... शेवटी एका विशिष्ट प्रकारचे डोळे सर्वांच्या पसंतीस पडले व त्याच क्षणी कलाकारांसह सर्वांच्या डोळ्यांतून समाधानाचे आणि आनंदाचे अश्रू आले. हीच खरी पोचपावती होती.

आज आपण पाहतो ते डोळे म्हणजे त्या काळातील रात्रंदिवस केलेल्या तपश्चर्येचं फलित. पण खरे तर, इतके सुंदर, इतके जिवंत, इतके भावनाशील डोळे घडण्यामागे एकच कारण म्हणजे स्वतः गणरायाचा आशीर्वाद.

"नेत्री दोन हिरे, प्रकाश पसरे, अत्यंत ते साजिरे" - या गोसावीसुत वासुदेवांच्या श्लोकातील दिव्य वर्णन जणू कारागिराच्या अंत:करणातच उतरले होते. म्हणूनच गणरायाच्या नेत्रांत जडलेलं ते हिऱ्यांसारखं तेज पाहताना असं जाणवतं की हा कारागीर डोळे घडवत नव्हता, तर या श्लोकातील उमटणाऱ्या प्रकाशालाच आकार देत होता. त्या दोन तेजस्वी डोळ्यांत दडलेला दैवी झोत इतका मंत्रमुग्ध करणारा आहे की मनात नकळतच येतं - कारागिराने हे नेत्र घडवताना जणू हाच श्लोक आपल्या श्वासात सामावला असावा.

# गरुडझेप



त्या काळात देशांतर्गत पर्यटनाला नुकतीच सुरुवात झाली होती. आपल्या राज्यातील लोक मंदिर दर्शन, तीर्थयात्रा आणि आध्यात्मिक स्थळांचे पुण्य संचित करण्यासाठी इतर राज्यांत जात असत. मात्र, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाच्या विश्वस्तांच्या मनात एक प्रश्न सतत डोकावत होता - आपल्या आसपासच्या अनेकांना आर्थिक कारणांमुळे अशी यात्रा करताच येत नाही. आणि म्हणूनच, "आपणच काहीतरी करायला हवं" या भावनेतून एक अनोखा उपक्रम आकाराला आला.

इथेच, लोकांना आपल्या शहरात राहूनही विविध तीर्थक्षेत्रांचे दर्शन मिळावे, समाधान लाभावे आणि तेही विनामूल्य - हा अत्यंत उदात्त विचार पुढे आला. या कल्पनेतून देशातील अनेक नामांकित देवस्थाने आणि तीर्थक्षेत्रांच्या अद्भुत, जिवंत भासणाऱ्या प्रतिकृती मंडळातर्फे गणेशोत्सवाच्या १० दिवसांत उभारल्या जाऊ लागल्या. एकापेक्षा एक सुंदर, वैभवशाली आणि देखण्या प्रतिकृतींची ही परंपरा वर्षानुवर्षे अविरत सुरू राहिली.

त्यामध्ये हवामहल (राजस्थान), सूर्यमंदिर (कोणार्क), पशुपतीनाथ मंदिर (नेपाळ), श्रीराम मंदिर (अयोध्या), मीनाक्षी मंदिर (मदुराई) अशा कितीतरी तीर्थक्षेत्रांच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या. आमच्या मंडळाच्या पावलांवर पाऊल ठेवत अनेक उत्सव मंडळांनीही अशा उपक्रमांची उभारणी केली आणि आज पुण्याचा गणेशोत्सव जगाच्या नकाशावर दिमाखात 'झळकतोय. विश्वस्तांच्या ह्या विचाराच्या गरुडझेपेने - पुण्यामधील गणेशोत्सवाचा चेहरामोहराच बदलून गेला आणि गणेशोत्सवाला एक नवी दिशा मिळाली.



उत्सवातील देखावे वास्तवदर्शी व्हावेत म्हणून तात्या शिल्पकार व कारागिरांना संबंधित स्थळी घेऊन जात असत.

जनमानसाचा विचार आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संधी - हे दोन घटक जिथे एकत्र आले, तिथे श्रद्धेच्या पलीकडेही समाजकारण आणि सर्जनशीलतेची नवी दालने खुली झाली. विचारांची ही प्रगल्भता, जिला आपण 'दिव्यदृष्टी' म्हणतो ती हीच का ? त्या विश्वस्तांना पुढची १०० वर्षे कशी घडतील याचा अंदाज असेल का? कोण जाणे. तेव्हाच्या एका विचाराने आज राज्यात गणेशोत्सवातील या दहा दिवसांत अब्जावधी रुपयांची उलाढाल केली जात आहे हे मात्र खर आहे व ही संख्या वाढतच आहे.

या प्रवासाचा कळस म्हणजे १९९२ साली झालेला शताब्दी महोत्सव आणि त्या निमित्ताने उभारलेली बिकानेरच्या राजप्रासादाची भव्य प्रतिकृती. ही उभारणी म्हणजे खरोखरच एक गरुडझेप होती. इतक्या विस्तीर्ण एकरांमध्ये पसरलेल्या जागेवर अशा प्रकाराची प्रतिकृती तयार करणे म्हणजे साक्षात शिवधनुष्य पेलवण्यासारखेच होते. कारण लाखो भक्त हे अनुभवण्यासाठी नक्कीच येतील असा आमचा अंदाज होता परंतु आमच्या अंदाजापेक्षा कित्येक--पटीने जास्त भक्तांनी ह्याचा लाभ घेतला.





गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या हस्ते राजवाड्यातील कारंज्याचे अनावरण करण्यात आले. तीन-चार महिने आधीपासूनच सुरू झालेल्या या भव्य निर्मितीत शेकडो कामगार आणि कलाकार रात्रंदिवस झटत होते. कित्येक लोकांना यातून रोजगाराच्या संधी मिळाल्या, कित्येक कलाकारांना त्यांची कला सादर करण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले. बदलत्या काळाप्रमाणे तंत्रज्ञानाचा वापर पुरेपूर करण्यात आला. त्यामुळे देखावा अधिकच वास्तववादी दिसू लागला.

उत्सवाच्या काळात आजूबाजूच्या परिसरातील व्यापाऱ्यांचा विक्रमी स्वरूपात व्यापार झाला.

इतक्या मोठ्या स्वरूपाची कामे ठरलेल्या वेळेत पूर्ण करणे हे अत्यंत कठीण काम होते. परंतु सर्व कार्यकर्त्यांची इच्छाशक्ती व गणरायाच्या कृपेने सर्व काही सुरळीत व निर्विघ्नपणे पार पडले आणि मंडळाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. लाखो भाविकांनी या अनोख्या कलाकृतीचे प्रत्यक्ष दर्शन घेतले आणि कितीतरी मान्यवर देश-विदेशातून खास येऊन या अद्वितीय उपक्रमाचे कौतुक करून गेले - एवढे सर्व त्या काळात न भूतो, न भविष्यती असेच होते!



काळ पुढे सरकत गेला, परिस्थिती बदलत गेली. देशातील काही दुर्दैवी घटनांनी 'सुरक्षा' हा गंभीर मुद्दा बनला. त्या पार्श्वभूमीवर, २०११ पासून उत्सवकाळात दर्शनासाठी येणारे सर्व भाविक, तसेच एक किलोमीटरच्या परिघातील रहिवासी व दुकानदार - अशा हजारो लोकांसाठी तब्बल ५० कोटी रुपयांचे विमा संरक्षण काढणारे श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती मंडळ हे देशातील पहिलेच उत्सव मंडळ ठरले.

किती मोठी जबाबदारी! किती आत्मीयता! किती लोकाभिमुख विचार! आणि हेच या मंडळाचे विलक्षणत्व ठरते - श्रद्धा, सेवा आणि संवेदना यांचा अनुपम संगम म्हणूनच याला आम्ही गरुडझेप असे संबोधतो.

शताब्दी महोत्सवानिमित्त ट्रस्टने हिंद केसरी स्पर्धेसह कबड्डी, खो-खो, मल्लखांब आदी क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या होत्या. नेत्रतपासणी, सोनोग्राफी व रक्तदान शिबिरे, ५७ दिवसांचा संगीत महोत्सव, प्रा. शिवाजीराव भोसले, ह.भ.प. बाबामहाराज सातारकर व द्वारकापीठाचे शंकराचार्य यांची प्रबोधनपर व्याख्याने तसेच अखंड धार्मिक यज्ञांचे आयोजन अत्यंत यशस्वीपणे पार पडले.



# आशेचा किरण

पुणे हे विद्वत्तेचं, शिक्षणाचं आणि सांस्कृतिक वारशाचं माहेरघर म्हणून सर्वत्र ओळखलं जातं. माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही हे शहर आज अग्रगण्य ठरलं आहे. पण या सर्वांपेक्षा पुण्याची खरी ओळख घडवणारे ज्येष्ठ समाजपुरुष - लोकमान्य टिळक, गोपाळकृष्ण गोखले, महात्मा ज्योतिबा व सावित्रीबाई फुले. संगीतविश्वातील दिग्गज पं. भीमसेन जोशी. साहित्यसम्राट पु. ल. देशपांडे व कवयित्री शांता शेळके. खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर, उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर व बाबा कल्याणी आणि इतिहासकार बाबासाहेब पुरंदरे - यांच्यासारख्या कितीतरी थोर व्यक्तिमत्त्वांमुळे पुण्याचा लौकिक खऱ्या अर्थाने उजळला आहे.

कला, शिक्षण, संशोधन, संगीत, साहित्य अशा असंख्य क्षेत्रातील या तज्ज्ञ व्यक्तिमत्त्वांमध्ये एक दुवा मात्र समान आहे - तो म्हणजे त्यांची श्रीमंत श्री दगडूशेठ हलवाई गणपती ह्या देवस्थानावर असलेली अपार श्रद्धा. या देवाचे आशीर्वाद लाभले तर पुण्याची प्रगती का होऊ नये? आज जगाच्या नकाशावर उठून दिसणारं आधुनिक पुणे आणि येथे असलेलं दगडूशेठ गणपती मंदिर - या दोन्हींचा आपल्या शहराच्या बदलत्या रूपावर अनन्यसाधारण प्रभाव पडला आहे.



गणेशोत्सवाच्या पवित्र परंपरेतूनच या भव्य मंदिराची निर्मिती झाली आहे. गणेशोत्सवाच्या दिवसांत भारताचे तत्कालीन राष्ट्रपती स्व. फखरुद्दीन अली अहमद यांनी स्वतः गणपती बाप्पांचे दर्शन घेऊन आरती केली होती - हा त्या काळातील भक्तिभावाचा आणि या उत्सवाच्या राष्ट्रीय गौरवाचा एक अत्यंत अभिमानास्पद क्षण होता. त्या वेळी मंडळाची आर्थिक किंवा भौतिक परिस्थिती फारशी मोठी नव्हती; मात्र गणरायावरील अढळ श्रद्धा आणि भक्तांच्या अंतःकरणात प्रज्वलित झालेला आशेचा दीपक अपार सामर्थ्यवान होता.हा आशेचा किरण हळूहळू व्यापक होत गेला, भक्तिचे रूपांतर विश्वासात झाले आणि विश्वासानेच या मंदिराला मूर्त स्वरूप दिले. गणरायावरील असीम श्रद्धेचे, भक्तांच्या अपार प्रेमाचे आणि अखंड सेवाभावाचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे आज उभे असलेले हे भव्य मंदिर होय. आज या मंदिरात दररोज हजारो भाविक श्रद्धेने नतमस्तक होतात, वर्षभरात कोट्यवधी भक्त दर्शनासाठी येत असतात आणि गणेशोत्सवाच्या काळात तर दोन-अडीच कोटी भाविकांच्या उपस्थितीने हा परिसर भक्तीरसाने भारून जातो. या प्रचंड भक्तिप्रवाहातून हजारो लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, ज्यामुळे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या अर्थव्यवस्थेला - जीडीपीला - देखील महत्त्वपूर्ण योगदान मिळते.भक्ती, विश्वास, सेवा आणि विकास यांचा हा अद्भुत संगम म्हणजेच हे मंदिर - जे केवळ उपासनेचे स्थान नसून समाजाच्या जडणघडणीचे प्रेरणास्थळ बनले आहे.

या परिसरात हजारो लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या; पर्यटकांची वाढती ये-जा सुरू झाली; फुलवाले,



मिठाईवाले, पूजेच्या साहित्याचे व्यापारी, विविध दुकानदार - सर्वांचे व्यवसाय फुलू लागले. एक विशाल बाजारपेठ आकाराला आली आणि असंख्य हातांना काम मिळालं. दररोज श्रींच्या चरणी अर्पण होणारे हजारो नारळ, टनावारी फुले आणि प्रसादाचे साहित्य या साऱ्यांमागे असंख्य शेतकरी, वाहतूकदार व संबंधित घटकांचा सहभाग आहे. विचार केला तर या भक्तीमुळे एक व्यापक व सशक्त आर्थिक साखळी उभी राहिलेली स्पष्टपणे दिसते.

गणेशोत्सवाच्या दिवसांमध्ये देश-विदेशातील भक्तांमुळे हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, प्रवासी गाड्या, सेवा-उद्योग यांना अपार मागणी निर्माण होते. एका मंदिराच्या माध्यमातून एवढ्या उद्योगांना चालना मिळणे ही एक अद्भुत गोष्ट आहे. स्वतः मंडळातील कर्मचाऱ्यांपासून ते दररोज माल पुरवणाऱ्या विक्रेत्यांपर्यंत - हजारो कुटुंबांच्या उपजीविकेला या मंदिराने हातभार लावला आहे. पुणेच नव्हे तर संपूर्ण राज्याच्या आर्थिक विकासात या मंदिराचा मोठा वाटा आहे हे स्पष्टपणे जाणवतं.



‘सबका साथ, सबका विकास’ हा नारा देणारे भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी स्वतः येथे येऊन यथाविधी पूजा करून मंदिराच्या उपक्रमांची माहिती घेतात, हेच दाखवते की श्रद्धा आणि भक्तीच्या पलीकडे येथे काहीतरी विलक्षण घडत असतं - एक सर्वांगीण, समतोल व सर्वसमावेशक विकास.

उदाहरणार्थ संगीत महोत्सवच पाहा - दहा दिवस चालणाऱ्या या दरवर्षीच्या कार्यक्रमात स्टेज, प्रकाशयोजना, ध्वनिव्यवस्था, नामांकित कलाकारांचे मानधन, सहकलाकारांची सोय - सर्व काही अत्यंत व्यावसायिकपणे आणि उदार मनाने केलं जातं. मंदिर परिसरात पहाटेपासून रात्रीपर्यंत असलेली भक्तांची प्रचंड वर्दळ बाजारपेठेला नेहमीच गजबजलेली ठेवते. असं प्रत्येक गोष्टीतच घडतं.

श्रद्धा, अध्यात्म व मानव धर्म याचबरोबर या व्यावहारिक जगात एक समतोल साधणारा अत्यंत कणखर असा दीपस्तंभ म्हणून आपण श्रीमंत श्री दगडूशेठ गणपती मंडळाकडे एक आशेचा किरण म्हणून बघू शकतो.



# सर्वसामान्यांची सुवर्णगाथा



१९७०च्या सुमारास गरीब, वंचित आणि तळागाळांतील लोकांना मदत किंवा कर्जासाठी बँकांच्या दारातसुद्धा स्थान मिळत नसे. ही सामाजिक विषमता तात्यांच्या मनात टोचत होती. एके दिवशी ते यशवंतराव चव्हाण यांच्या 'सहकारातून सर्वसामान्यांचा उद्धार' हे भाषण ऐकण्यासाठी गेले होते. त्या विचारधारेने त्यांना अक्षरशः झपाटून टाकले. त्यांनी मनाशी पक्का निर्धार केला की गरिबांच्या हाताला आर्थिक बळ देणारी मंडळाची एक सहकारी बँक उभारायची आणि या विचाराने तात्यांनी मामा रासने, आप्पा सूर्यवंशी, बुवा रासने व उल्हास शेडगे यांच्या बरोबर विचारविनिमय करून सर्वजण जोमाने कामास लागले.

परंतु बँक स्थापन करणे म्हणजे काही सोपी गोष्ट नव्हती. रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आवश्यक त्या सर्व गोष्टींची पूर्तता करण्यासाठी त्यांना प्रचंड मेहनत घ्यावी लागणार होती. लोकांच्या घरोघरी जाऊन त्यांना बँकेचे महत्त्व पटवून देणे व पाच रुपयांचे शेअर्स खरेदी करण्यास प्रवृत्त करणे, असे खडतर मार्ग स्वीकारावे लागणार होते. परंतु या सर्व प्रयत्नांच्या मागे स्वतःचा स्वार्थ कधीच नव्हता. उद्देश फक्त एकच होता व तो म्हणजे शेकडो गरजू कुटुंबांचा आधार-स्तंभ बनण्याचा. या सर्वांच्या अथक परिश्रमातून अखेर 'सुवर्णयुग सहकारी बँके'चा जन्म झाला. मंडईतील टपरीवाले, माथाडी कामगार, भाजीविक्रेते - अशा कित्येक सर्वसामान्यांना वेळोवेळी मदत करून त्यांच्या संसाराला स्थैर्य मिळवून देत ही बँक 'सर्वसामान्यांची स्वतःची बँक' म्हणून ओळखली जाऊ लागली.



सुवर्णयुग सहकारी बँकेची नियोजित प्रशासकीय इमारत
बाजीराव रोड, पुणे



स्थापनेच्या काळात कसंबसं गोळा केलेलं केवळ पंचेचाळीस लाख रुपयांचं भांडवल व फक्त १८ ते २० कर्मचारी, इतक्या साध्या स्तरातून सुरुवात झालेली ही बँक! आणि आज? जवळपास १७५ कर्मचारी, २३ पेक्षा अधिक शाखां, हायटेक व्यवस्थापन, आणि तब्बल १५०० कोटींची सतत वाढणारी उलाढाल! पुढील पाच वर्षांत महाराष्ट्रभर शाखांचे जाळे आणि ५,००० कोटींच्या उलाढालीचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे.

महत्त्वाचे म्हणजे - या सर्व विस्तारामागील केंद्रबिंदू तोच: अल्प उत्पन्न गट, महिला बचत गट, मध्यमवर्गीय कुटुंबे आणि छोटे व्यापारी यांना तातडीची आर्थिक मदत. हीच बँकेची खरी सामाजिक बांधीलकी.

या प्रवासात बँकेने अनेक चढउतार पाहिले, कठीण प्रसंगांवर मात केली. ज्या सर्वसामान्यांच्या मदतीसाठी ही बँक सुरू केली त्या लाखो लोकांचे आशीर्वाद व श्रीमंत दगडूशेठ गणपतीची कृपा. या दोन शक्तींनी ही बँक प्रत्येक वेळी अधिक सक्षमपणे उभी राहिली. बँकेचे विद्यमान अध्यक्ष व विद्यमान आमदार श्री. हेमंतभाऊ रासने यांच्या नेतृत्वात ही वाटचाल यशस्वी रित्या सुरु आहे.

'सुवर्णयुग सहकारी बँके'ची जमा पाहिली तर केवळ नफाच नव्हे, तर सदिच्छांचे भांडार दिसेल - शेकडो संसारांना मिळालेला आधार, अनेक मुला-मुलींचे घडलेले भविष्य, असंख्य लोकांची पूर्ण झालेली घराची स्वप्ने, उभे राहिलेले छोटे-छोटे व्यवसाय, महिला व बचतगटाच्या सक्षमीकरणाची कित्येक उदाहरणे. या सर्व गोष्टींचा अनमोल संचय दिसेल.

म्हणूनच या सुवर्णसंचयातून
जन्मलेली ही संस्था -
**'सुवर्णयुग सहकारी बँक'.**



# परोपकाराची अखंड ज्योत



प्रसिद्ध उद्योगपती जे.आर.डी. टाटा व रतन टाटा यांनी आपल्या आयुष्यात ज्या मूलभूत तत्त्वांचा आधार घेतला त्यातील अत्यंत महत्त्वाचं म्हणजे सामाजिक बांधिलकी. याच मूलभूत तत्त्वावर जे आयुष्यभर वाटचाल करीत आहेत ते म्हणजे 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट'. जमा होणाऱ्या उत्पन्नापैकी २५ टक्के देवधर्मासाठी व ७५ टक्के मानव सेवेसाठीच खर्च करावा असा अलिखित नियम पाळणारे गणपती मंडळ!

शिक्षणाची आस असलेल्या मुलांसाठी शाळा, आणि युवकांना आयुष्य उभारण्यासाठी कौशल्य देणार प्रशिक्षण केंद्र, लहान मुलांना सुरक्षित छत देणारी बालसंगोपन केंद्र, पालकत्वाची ऊब हरवलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी तयार केलेला अद्ययावत वृद्धाश्रम, हे सर्व उपक्रम मंडळाच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतिबिंब आहेत.



आरोग्यसेवेच्या क्षेत्रात लाखो लोकांना उपचार मिळावेत म्हणून मोफत तपासणी शिबिरे, गरजूंना औषधे, अगदी महागड्या शस्त्रक्रियांसाठीही दिला जाणारा हातभार-ही 'मानवतेची खरी सेवा'.

क्रीडा क्षेत्रात प्रतिभेला योग्य दिशा देत, खेळाडूंना घडवून त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्याचे स्वप्न पूर्ण करणारे उपक्रम-अगदी विश्वकप मिळवलेल्या यशस्वी खेळाडूंनीही या सेवांचा आधार घेतला आहे.

पृथ्वीचं रक्षण करण्यासाठी वृक्षारोपण, जलसिंचन, वनसंवर्धन अशी पर्यावरणप्रेमाची अखंड वाटचाल.

कला-संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी गणेशोत्सव स्पर्धा व संगीतकला महोत्सवांचे आयोजन.

अन्नदान सेवा, आपत्ती काळातील तातडीची मदत, जवानांसाठी शौर्यगौरव पुरस्कार-असा प्रत्येक अध्याय 'मानवता हाच सेवा धर्म' हेच अधोरेखित करतो.

आजही नवीन उपक्रम, नवीन क्षितिजे, नवीन संकल्पना मंडळाला खुणावत आहेत... आणि ती स्वीकारण्याची ऊर्जा, सामर्थ्य व व्यापक दृष्टी आजच्या मंडळात दिसून येते.

# किरणोत्सव



काही गोष्टी आपल्या बुद्धीच्या आकलनापलीकडच्या असतात - म्हणूनच त्या चमत्कार भासतात. कोणाचा यावर ठाम विश्वास असो वा नसो, कोणाला यात दैवी शक्तीचे दर्शन घडत असेल किंवा नसेल; पण एक सत्य आपण नजरेसमोर पाहू शकतो आणि प्रत्यक्ष अनुभवू शकतो. ते म्हणजे - जगभरातील भक्तांचे आराध्य दैवत, श्रीमंत दगडूशेठ गणपतीरायाला स्वतः सूर्यनारायण जेव्हा भेटायला येतात आणि आपल्या तेजस्वी, सुवर्णकिरणांनी श्रींच्यावर नितांत पवित्र असा अभिषेक करतात, तो अद्‌भुत किरणोत्सव.

हा अद्‌भुत किरणोत्सव सोहळा दरवर्षी माघ गणेश जन्माच्या सुमारास उत्तरायणामध्ये पाहावयास मिळतो. श्रींच्या उत्सव मूर्ती समोर असलेल्या चांदीच्या मूर्तीवर सूर्यकिरणे येतात व नंतर देवी सिद्धी व देवी बुद्धी यांच्या चांदीच्या मूर्तींवरदेखील सूर्यकिरणांचा अभिषेक होताना आपणास पाहावयास मिळतो. विचार करा १९८४मध्ये बांधलेले हे मंदिर, त्यानंतर इतक्या वर्षांत पुण्याची झालेली अफाट वाढ, इतक्या टोलेजंग बांधण्यात आलेल्या इमारती, यांचा कुठेही अडथळा निर्माण न होता इतक्या गजबजलेल्या भागातील मंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत आज सूर्याची किरणे पोहोचणे म्हणजे किती आश्चर्यकारक गोष्ट आहे. वर्षातील साधारण त्याच सुमारास कित्येक वर्षे हे घडताना दिसत आहे. याला आपण दैवी चमत्कार नाही म्हणायचं तर काय? भारतामध्ये आजदेखील अशी काही जागरूक देवस्थाने आहेत ज्यामध्ये वर्षाच्या ठरावीक वेळेस असाच किरणोत्सव साजरा केला जातो त्यातीलच एक जागरूक असलेले श्रीमंत दगडूशेठ गणेश मंदिर असंच म्हटलं पाहिजे. हा किरणोत्सव सलग दोन ते तीन दिवस सुरू असतो व अंदाजे प्रत्येक दिवशी दहा ते पंधरा मिनिटे ह्या किरणोत्सवाचा सोहळा आपणास पाहावयास मिळतो.


अंगारकी चतुर्थी



संकष्टी चतुर्थी जेव्हा मंगळवारी येते, तेव्हा तिला अंगारकी चतुर्थी असे संबोधले जाते. यामागे एक पौराणिक संदर्भ आहे. अंगारक म्हणजेच मंगळ ग्रह. अंगारकाने भगवान श्री गणेशांची हजारो वर्षे कठोर तपश्चर्या केली. त्याच्या अखंड भक्तीने प्रसन्न होऊन बाप्पांनी त्याला वरदान दिले की, ज्या दिवशी तुझा वार म्हणजे मंगळवार आणि चतुर्थी एकत्र येईल, त्या दिवशीची संकष्टी तुझ्या नावाने अंगारकी म्हणून ओळखली जाईल.

या दिवसाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. शास्त्रांनुसार वर्षभरातील सर्व संकष्टी चतुर्थी व्रतांचे पुण्य एकाच अंगारकी चतुर्थीच्या व्रताने प्राप्त होते, असे मानले जाते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात अंगारकी चतुर्थीचा अनुभव अलौकिक असतो. मध्यरात्रीपासूनच भाविक प्रभातदर्शनासाठी रांगेत उभे राहतात. मंदिरात फुलांची दिव्य, सुगंधी आणि तेजस्वी आरास केली जाते, जी भक्तीच्या भावनांना आकार देत असते. कलाकारांनी साकारलेल्या मोरांच्या प्रतिकृती इतक्या आकर्षक दिसतात की साक्षात राजस्थानातून श्रींच्या दर्शनासाठी ते आले असावेत असाच भास होतो.

पहाटे स्वराभिषेक या कार्यक्रमा अंतर्गत शास्त्रीय संगीताचे पवित्र नाद श्रींच्या चरणी अर्पण होतात. मंत्रोच्चार, ब्रह्मणस्पती सूक्त व गणेशाय याग, महाभिषेक यांच्या माध्यमातून संपूर्ण वातावरण मंत्रमुग्ध व आध्यात्मिक ऊर्जेने परिपूर्ण होते. फुलांची आरास आणि दीपमय रोषणाईने उजळलेले मंदिर पाहताना हा केवळ उत्सव न राहता, अंतःकरण जागृत करणारा भक्तीमय अनुभव ठरतो- जिथे श्रद्धा, साधना आणि बाप्पांची कृपा यांचा दिव्य संगम घडतो.

“माझ्या पदरातलं बाळ त्यांनी सांभाळलं, म्हणून मी अख्खं जग मायेने कवेत घेतलं”

- पद्मश्री सिंधुताई सपकाळ



मी वैदर्भीय. मला मुलगी झाली होती आणि तीही गाईच्या गोठ्यात. घरोघरी भीक मागता मागता विचार करत होते की अशी रडत जगण्यापेक्षा दुसऱ्याच्या दुःखांपर्यंत पोहोचायला काय हरकत आहे? ठरलं, दुसऱ्याच्या दुःखापर्यंत पोहोचायचं. दुसऱ्या दिवशी मनात पाल चुकचुकली, ठीक आहे दुसऱ्यांपर्यंत पोचशील; परंतु स्वतःच्या मुलीचं काय करशील? हा विचार मनात आला तेव्हा खाडकन डोळ्यांसमोर श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच आला. त्या काळात ऐकून होते पुण्यातलं मोठं नाव. मला तात्या भेटले आईच्या काळजाचे. माझी चौकशी केली. मी त्यांना सांगितलं की मी चौथी पास आहे. मला आता कोणी नाही. माझी मुलगी पुण्यात शिकावी असं मला वाटतं. ती माझी मुलगी तुमच्या ताब्यात घ्या. फक्त कुठल्यातरी अनाथाश्रमात ठेवू नका. तुम्हीच तिचे मायबाप बनून चांगल्या ठिकाणी तिची व्यवस्था करा, तिच्यावर संस्कार करा. 'सेवासदना'त तात्यांनी माझी मुलगी दाखल केली. ॲडमिशन त्यांनीच मिळवून दिली. तिचा दर महिन्याचा खर्चही तेच करायचे. दर आठ दिवसांनी एक माणूस जायचा. 'तुला काही हवं आहे का? तुला काही अडचण आहे का?' अशी विचारपूस करायचा. संस्थेने स्वतःचा पैसा खर्च करून तिला शिकवलं म्हणून सिंधुताई सपकाळ जगाला कळली. माझी एक मुलगी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टने सांभाळली. तात्यांनी तिला मायबापांचं प्रेम दिल म्हणून मला जगाची आई होता आलं. अनाथ माय होता आलं. आज जी सिंधुताई सपकाळ ओळखली जाते त्याची खरी सुरुवात 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट'ची आहे. त्यांनी माझं बाळ घेतलं नसतं तर मी माझ्या बाळामध्येच अडकून पडले असते. इतरांपर्यंत पोहोचू शकले नसते म्हणून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचं योगदान माझ्यासाठी फार मोठे आहे. बापाची ती परंपरा अशोकने देखील खांद्यावर घेतली, हे तेवढेच खरं. अगदी धडपडत व्यक्तिमत्त्व आहे ते. बापाचा वसा पोरगा चालवतो याचा आनंद आहे आणि तो दुसरा शंकरराव सूर्यवंशींचा मुलगा महेश. दोघांनी आपापल्या बापांची परंपरा खांद्यावर घेऊन चालायला सुरुवात केली आहे. त्यामुळे ही पताका खाली जाणार नाही हे नक्कीच, उंच फडकतच राहणार.

# प्रेरणेची पावले, आशेचे किरण

समाजाने ज्याचं अस्तित्वच नाकारलं व ज्यांना उपेक्षित ठेवलं - अशा देवदासींच्या अनाथ व पीडित मुलांसाठी, कचरा गोळा करणाऱ्यांच्या मुलांसाठी, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील मुलांसाठी कोंढव्यातील बालसंगोपन केंद्र २० ऑक्टोबर १९८५ रोजी उभारण्यात आले. पहिल्या अकरा वर्षांपर्यंत या केंद्राची जबाबदारी विश्वस्त काकासाहेब गावडे यांनी व्यवस्थापक म्हणून सांभाळली.

येथे मुले व मुली निवासी शिक्षण घेतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर योग्य संस्कार घडवण्यात विशेष भर दिला



जातो. ज्यामुळे ते समाजात सन्मानाने उभे राहू शकतील. आज अभिमानाने सांगावंसं वाटतं की याच केंद्रातील एका विद्यार्थ्याने बारावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. तो सध्या बालसंगोपन केंद्रा मधील इतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहे. आणखी एक सुनील शेरेकर नावाचा विद्यार्थी हिंजवडी येथील कोर्टयार्ड मॅरीयट या पंचतारांकित हॉटेलमध्ये 'चीफ शेफ' (मुख्य स्वयंपाकी) म्हणून कार्यरत आहे. काही विद्यार्थ्यांनी



'एम.बी.ए.' करून बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये 'मुख्य कार्यकारी पदाधिकारी' (C.E.O.) सारख्या महत्त्वाच्या पदांवरही काम करीत आहेत तसेच कित्येक जण स्वतःचा खाजगी व्यवसाय सुरू करून आत्मनिर्भर झाले आहेत. अशा प्रकारे समाजाच्या तळागाळातून आलेले हे विद्यार्थी आज या बालसंगोपन केंद्रामुळे समाजाच्या मुख्य प्रवाहात यशस्वीपणे सामील झाले आहेत.

खरं तर, इतक्या संवेदनशील घटकांमधील मुलांना सशक्त करून आत्मनिर्भर करण्याचं जे पुण्यकार्य हे केंद्र करत आहे, ते अमूल्य आहे. पुढील पिढीतील मुले इतकी सक्षम, कर्तृत्ववान आणि स्वावलंबी होत असतील तर आपल्या देशाचं भविष्य निश्चितच उज्ज्वल आहे. म्हणूनच हे केंद्र थोड्याच कालावधीत मुलांच्या आशेचा किरण बनले.

केंद्रातील मुलांच्या सर्व गरजांची काळजीपूर्वक व्यवस्था केली जाते. दोन वेळचे पौष्टिक जेवण, अभ्यासासाठी वह्या-पुस्तके, कपडे, व्यायामाचे मार्गदर्शन व स्वतंत्र वाचनालय अशा सुविधा येथे उपलब्ध आहेत. स्वयंपाकगृहापासून निवासस्थानापर्यंत स्वच्छता राखली जाते आणि मुलांच्या आरोग्याचीही नियमित तपासणी व योग्य उपचार केले जातात.



या केंद्राच्या कुशीत वाढलेली अनेक मुले आज स्वतःच्या मेहनतीवर ठामपणे उभी आहेत - या मधेच संस्थेच्या यशाची खरी गुरुकिल्ली दडलेली आहे, आणि पुढील पिढीसाठी हीच एक अनमोल प्रेरणागाथा ठरत आहे.

इथे दिसणारे मुलांमधले निरागस बंध, एकमेकांना आधार देण्याची ओढ, आणि नि:स्वार्थ मैत्रीची ऊब पाहिली की डोळे आपोआप पाणावतात. कोण कुठून आलं, त्याची पार्श्वभूमी काय, जात-धर्म काय-याचं कुणालाच सोयरसुतक नसतं. 'मानवधर्म हाच खरा धर्म' हे मूल्य इथल्या प्रत्येक मुलाच्या मनामनांत खोलवर रुजवले जाते.



"आज या केंद्रातून संस्कारित होऊन बाहेर पडलेली अनेक मुलं कृतज्ञतेने सांगतात की, 'आम्हाला इथे येण्याची संधी मिळाली, हेच आमचं खरं भाग्य. नाहीतर कदाचित आमचं आयुष्य कोणत्या वळणावर भटकत राहिलं असतं.'



त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा समाधानाचा तेजस्वी भाव आणि अंगी बळकट झालेला आत्मविश्वास हेच या केंद्राच्या कार्याचं खऱ्या अर्थानं मिळालेलं सर्वोच्च फळ आहे."







या मुलांच्या उज्ज्वल यशाचा आलेख बघताना कार्यकारी मंडळाची छाती अभिमानाने भरून येते. कारण या यशाच्या मागे आहे त्यांच्या वर्षानुवर्षांची मेहनत, त्याग, आणि असंख्य तडजोडी-कधी स्वतःच्या वेळेशी, कधी कुटुंबासोबत, तर कधी वैयक्तिक सुखसोयींसोबत. पण मुलांची प्रगती, त्यांचे उंच भरारी घेतलेले आयुष्य पाहिलं की त्या सगळ्या खस्ता क्षणात विसरून जातात.



इथे घडत आहे उज्ज्वल भविष्य... आणि
उमलत आहेत कोमेजलेली असंख्य फुले.....
नव्हे नव्हे... असंख्य मुले.







## श्रीगणेश जयंती (माघ शुद्ध चतुर्थी)

माघ महिन्यातील विनायकी चतुर्थी या दिवशी भगवान श्रीगणेशांचा जन्म झाला. म्हणूनच गणरायांच्या या दिव्य रूपाला 'विनायक' असे संबोधले जाते. भाद्रपदातील गणेश चतुर्थीप्रमाणेच माघ महिन्यात साजरी होणारी गणेश जयंती ही सर्व गणेशक्षेत्रांत अपार भक्तिभावाने, उत्साहाने आणि श्रद्धेने साजरी केली जाते.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात साजरा होणारा श्रीगणेश जन्मोत्सव अत्यंत पवित्र आणि भक्तिरसपूर्ण वातावरणात पार पडतो. या मंगल सोहळ्यात सुवासिनी पारंपरिक वेशभूषेत नटून-थटून बाल गणरायाला पाळण्यात विराजमान करतात- हा क्षण भक्तांच्या अंतःकरणाला स्पर्शून जाणारा असतो. यानिमित्ताने गणेश यागाचे आयोजन करण्यात येते तसेच श्रीगणेशांच्या मूर्तीवर ब्रह्मणस्पती सूक्तानुसार विधियुक्त अभिषेक केला जातो.



ब्रह्मणस्पती सूक्तानुसार विधिवत अभिषेक



गणेश जन्म सोहळा



गणेश याग



श्रींची नगरप्रदक्षिणा मिरवणूक



रंगीबेरंगी व सुगंधी फुलांनी सजवलेल्या गर्भगृहात सालंकृत केलेली श्रीगणरायांची मूर्ती अत्यंत मोहक, कोमल आणि तेजस्वी भासते. या पावन दिनाचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे मंदिर परिसरातून वाजत-गाजत निघणारी श्रीगणेशांची नगरपरिक्रमा. या परिक्रमेत हजारो भक्त मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात.

पारंपरिक पोशाखात सजलेले भक्तगण, भक्तिगीते, घोषणांचा निनाद आणि आनंदी वातावरण यामुळे संपूर्ण परिसर भक्ती, आनंद आणि उत्सवभावनेने भारून जातो. श्रीगणेश जयंतीचा हा सोहळा भक्तांना एक विलक्षण, अविस्मरणीय आणि आध्यात्मिक अनुभूती देऊन जातो.



# मायेचा ओलावा, माणुसकीचं मंदिर



सन २००० च्या सुमारास माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचा झपाट्याने विस्तार झाला आणि पुण्यासारख्या शहरातून अनेक युवक-युवती परदेशात स्थायिक होऊ लागले. या बदलामागे दडलेला एक वेदनादायी सामाजिक प्रश्न हळूहळू पुढे आला-ज्येष्ठ नागरिकांचे एकटेपण!

घरात एकटे राहणारे किंवा गर्दीत असूनही एकटे पडलेले ज्येष्ठ नागरिक. यांच्या आयुष्यात आधार निर्माण करण्याची गरज निर्माण झाली. म्हणूनच वृद्धाश्रमाची वाट पाहणाऱ्या या ज्येष्ठांचा आधार होण्यासाठी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टने जबाबदारी स्वीकारली.

महेश सूर्यवंशी यांच्या कल्पक नियोजनातून २००१ मध्ये वृद्धाश्रमाच्या इमारतीचे भूमिपूजन झाले आणि अवघ्या दोन वर्षांत 'पिताश्री' या वृद्धाश्रमाचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते पार पडले.

तात्यांनी ही जबाबदारी महेश सूर्यवंशी यांच्यावर सोपविण्यामागे कारण स्पष्ट होते. एक तर ते व्यवसायाने अभियंता आहेत आणि काही वर्षांपूर्वी त्यांनी गणपती मंदिराभोवती क्लस्टर डेव्हलपमेंटचा एक उत्कृष्ट आराखडा तयार केला होता.

मध्यभागी भव्य मंदिर आणि बाजूला सात मजली गृहसंकुल, तीन बाजूने रस्ते, सभागृह, व्यायामशाळा अशा सर्व सोयींनी सज्ज असा हा आराखडा होता. चाणाक्ष तात्यांनी ही गोष्ट लक्षात ठेवली होती. आणि योग्य वेळ आल्यावर, ही जबाबदारी त्यांच्या खांद्यावर सोपवली.



दिवस-रात्र मेहनत घेऊन त्यांनी ही संपूर्ण संकल्पना यशस्वीरीत्या प्रत्यक्षात उतरवली. त्यांच्या मते, "ही घरे गणरायाची आहेत, म्हणून ती अत्यंत सुंदर राजवाड्या सारखी असावीत. या साठी ह्या आराखड्यात कलात्मक कमानींची रचना करण्यात आली. यातून ज्येष्ठांना स्वतःच्या प्रगतीचे आत्मिक समाधान मिळेल. किती हा मनाचा मोठेपणा आणि त्यात सामावलेला जिव्हाळ्याचा स्पर्श. महेशजींच्या द्वारे श्री गणेशाने आपल्या ज्येष्ठ भक्तांसाठी राजमहालासारखे भव्य निवासस्थान निर्माण करून घेतले.

प्रत्येक मजल्यावर शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय आहे, २४ तास गरम पाण्यासाठी सौर ऊर्जेवर चालणारी व्यवस्था उपलब्ध आहे. ज्येष्ठांच्या विरंगुळ्यासाठी प्रत्येक मजल्यावर दूरदर्शनची सुविधा देण्यात आली आहे. येथे स्वतंत्र ग्रंथालय असून बाहेर सुंदर बागही विकसित करण्यात आली आहे. आठवड्यातून एकदा मोठ्या पडद्यावर चित्रपटांचे आयोजन केले जाते. वर्षातून दोन वेळा धार्मिक स्थळांच्या दर्शनासाठी सहली आयोजित केल्या जातात. तसेच रोज सकाळ-संध्याकाळ स्पीकर्सद्वारे भक्तिगीते प्रसारित केली जातात, त्यामुळे संपूर्ण परिसरात प्रसन्न वातावरण निर्माण होते.



कोंढव्यातील बालसंगोपन केंद्राच्या आवारातच वृद्धाश्रम उभारण्यामागेही एक भावनिक व दूरदृष्टीपूर्ण विचार होता. आजी-आजोबांना नातवंडांचे प्रेम मिळावे आणि मुलांना आजी-आजोबांचा सहवास लाभावा. हा सारा उपक्रम स्वतःच्या फायद्यासाठी नव्हे, तर समाजाच्या भल्यासाठी उभा केलेला एक माणुसकीचा स्तंभ आहे.





आज या ठिकाणचं वातावरण पाहिलं, की इथे एक वृद्धाश्रम नव्हे तर एक मोठं, एकत्रित कुटुंब नजरेसमोर उभं राहतं. इथल्या एका ज्येष्ठ दांपत्याने मनापासून सांगितलं, "इथे राहणं म्हणजे चालतं-बोलतं नंदनवनच आहे." या शब्दांमागे किती जिव्हाळा आणि समाधान दडलेलं आहे!



प्रत्येक संध्याकाळी नातवंडं पाहण्यासाठी डोळे वाट पाहत असतात. त्यांना 'शुभंकरोती' आणि विविध स्तोत्र शिकवताना जणू स्वतःचं बालपण परत जगण्याचा आनंद मिळतो. इथे प्रेम आहे, आपुलकी आहे, आणि ममत्वाने भरलेलं वातावरण आहे-मग अशा गणरायाच्या घरात आपलं उर्वरित आयुष्य जगण्यास का कोणाला आवडणार नाही?

इथे वेळच्या वेळी घरचं, चविष्ट अन्न, गरम चहा आणि नाश्ता आग्रहाने दिला जातो. कर्मचारी वर्गसुद्धा घरच्यासारख्या प्रेमाने आणि मायेने वागतात.

एका आजींनी मनापासून प्रेमाने हसत-हसत सांगितलं, कि "तुमच्या कुटुंबात कदाचित सहाच जण असतील, पण माझ्या कुटुंबात मात्र ६६ जण आहेत. हीच माझी खरी श्रीमंती आणि हाच खरा गणरायाचा आशीर्वाद."





अनेक नातवंडं रोज सकाळी आजी-आजोबांना नमस्कार करून शाळेत जातात. हेच संस्कार व हीच खरी शिकवण. येथील मंदिरात श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती उत्सवातील दुसरी श्रीगणेश मूर्ती विराजमान आहे, ज्याच्या दर्शनासाठी आजूबाजूचे नागरिकही आवर्जून येत असतात. आज येथे शेकडो ज्येष्ठ नागरिक वास्तव्य करत आहेत.

यामागचं खरं कारण एकच - येथे कोणीही परकं नाही. सुख-दुःखाच्या प्रत्येक क्षणी मंडळाचे कार्यकर्ते त्यांच्या मुलांसारखेच त्यांच्या सोबतच असतात.

**आमच्या कार्यकर्त्यांच्या मते ज्येष्ठांची काळजी घेणं ही जबाबदारी नाही, ती एक संस्कृती आहे.**





## द्राक्ष महोत्सव

फाल्गुन पौर्णिमा अर्थात होळी पौर्णिमेचे औचित्य साधून मंदिर परिसरात तसेच गणरायाच्या पवित्र गर्भगृहात द्राक्षांची अतिशय मनोहारी आणि वैशिष्ट्यपूर्ण आरास साकारली जाते. या अद्भुत सजावटीसाठी सुमारे अडीच हजार ते तीन हजार किलो इतक्या प्रचंड प्रमाणात ताज्या द्राक्षांचा वापर करण्यात येतो.

ही आरास इतकी नैसर्गिक आणि कलात्मक असते की दर्शन घेणाऱ्याला क्षणभर असे भासते - जणू हिरव्यागार द्राक्षांच्या अथांग मळ्यात शांत, तेजस्वी आणि कृपाळू रूपात बाप्पा विराजमान झाले आहेत. हिरव्या द्राक्षांच्या सघन पार्श्वभूमीवर पिवळ्या व लाल फुलांची केलेली नाजूक, संतुलित रचना ही कलाकाराच्या सूक्ष्म जाणिवेची आणि रंगसौंदर्याच्या उत्तम समतोलाची साक्ष देते.

या हिरव्यागार रंगांच्या उधळणीमुळे मनाला विलक्षण शांती आणि समाधान लाभते. या नैसर्गिक पार्श्वभूमीवर बाप्पांचे तेज अधिक खुलून दिसते. दर्शनाचा प्रत्येक क्षण मनात साठवून ठेवावा, अशी अनुभूती निर्माण होते.

या नंतर सर्व द्राक्षे भक्तांना प्रसाद म्हणून वाटण्यात येतात. अशा प्रकारे सौंदर्य, भक्ती आणि प्रसाद यांचा संगम साधणारा हा द्राक्ष महोत्सव भक्तांच्या मनावर अविस्मरणीय ठसा उमटवतो.







# करुणोपचार

'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट'चं स्वतःचं रुग्णालय असावं, ही तात्यांची दीर्घकाळची मनापासूनची इच्छा होती. मात्र रुग्णालय उभारणी व त्याची सातत्यपूर्ण देखभाल ही अत्यंत जबाबदारीची आणि कठीण बाब असल्याने, रुग्णसेवेसाठी पर्यायी व परिणामकारक मार्गांचा शोध सुरू झाला. त्याच काळात 'ससून रुग्णालया'तील डॉ. अजय चंदनवाले यांची अशोक गोडसे आणि महेश सूर्यवंशी यांच्याशी झालेली भेट निर्णायक ठरली. त्या भेटीनंतर लगेचच ट्रस्टतर्फे रुग्णांच्या आहारासाठी किराणा सामग्री पुरवणे, स्वयंपाकगृहाचे अत्याधुनिक पद्धतीने नूतनीकरण करणे आणि रुग्णांच्या नातेवाइकांसाठी निम्म्या दरात भोजन देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.







यासोबतच एका तासात १,००० पोळ्या तयार करणारे एक यंत्र 'ससून रुग्णालया'ला देण्यात आले. त्यामुळे पावाऐवजी पोळ्यांचा समावेश होऊन रुग्णांच्या आहाराचा दर्जा उंचावला. जेवण वितरणासाठी ३६ नवीन ट्रॉली उपलब्ध करून देण्यात आल्या, ज्यामुळे स्वच्छ, सुंदर स्वयंपाकगृह आणि उत्तम भोजनव्यवस्था साकारली.

ट्रस्टतर्फे 'ससून रुग्णालया'च्या सुमारे ५,००० चौरस फूट क्षेत्रफळाच्या स्वयंपाकगृहाचे संपूर्ण नूतनीकरण करण्यात आले. २०१३ पासून आजपर्यंत दररोज सुमारे ३,२०० रुग्णांना अन्नदान दिले जात असून, त्यामध्ये दोन वेळचे सकस शाकाहारी भोजन, अल्पोपाहार, चहा-बिस्किटांचा समावेश आहे. स्वयंपाकगृहासाठी पोळ्या बनवण्याची व भाजी चिरण्याची अद्ययावत यंत्रसामग्री देणगी स्वरूपात पुरवण्यात आली. बाहेरगावाहून आलेल्या रुग्णांच्या नातेवाइकांसाठी विश्रांतीगृह उभारण्यात आले.

**ट्रस्टतर्फे दरवर्षी साधारण ३ कोटी रुपये ह्यासाठी खर्च करण्यात येतात.**







मे २०१७ मध्ये 'दगडूशेठ गणपती ट्रस्ट' व 'मुकुल माधव फाउंडेशन' (फिनोलेक्स) यांच्या सहयोगाने ५९ बेड्सचा अद्ययावत एन.आय.सी.यू. (नवजात शिशू अतिदक्षता विभाग) वॉर्ड उभारण्यात आला.

माइल्ड, मॉडरेट, क्रिटिकल व मोस्ट क्रिटिकल अशा सर्व स्तरांवरील उपचार सुविधांसह मातांसाठी स्वतंत्र प्रतीक्षा कक्ष व मदर मिल्क बँक असलेला हा महाराष्ट्रातील पहिला एन.आय.सी.यू. वॉर्ड ठरला. अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सज्ज असलेला हा वॉर्ड महाराष्ट्रातील सर्वोत्तम एन.आय.सी.यू. वॉर्ड म्हणून गौरवला गेला आहे.



नवजात शिशूंसाठी अतिदक्षता विभाग, ६६ बेड्सचा नूतनीकरण केलेले पाच प्रसूती विभाग, तसेच रुग्णांसाठी ३०० बेड्स उपलब्ध करून देण्यात आले. प्रसूतीनंतर मातांना शेंगदाण्याचे लाडू व आवश्यक औषधे मोफत दिली जातात.

या सर्व उपक्रमांमधून एकच गोष्ट ठळकपणे अधोरेखित होते - 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट'साठी सेवा म्हणजे केवळ उपक्रम नाही, ती एक मूल्यनिष्ठ प्रतिज्ञा आहे. नैतिकता, संवेदनशीलता आणि शिस्तबद्ध कार्यपद्धती यांवर ठाम उभे राहूनच प्रत्येक कार्य राबवले जाते; कुठल्याही परिस्थितीत तडजोडीला येथे स्थान नाही. म्हणूनच ही सेवा लोकांच्या मनापर्यंत पोहोचते, त्यांच्या हृदयात विश्वास निर्माण करते. आणि हाच विश्वास आज लाखो हातांच्या आशीर्वादांतून ट्रस्टच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या व विश्वस्तांच्या पाठीशी अभेद्य बळ बनून उभा आहे.





**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य

रुग्णांच्या नातेवाइकांकरता विश्रामगृह, अद्ययावत एन.आय.सी.यू. वॉर्ड उभारण्यासाठी मदत, महिलांच्या वॉर्डचे अत्याधुनिकीकरण किंवा एक अतिशय चांगला किचन सेटअप उभारणं अशा प्रकल्पांच्या माध्यमातून सामान्य रुग्णांना त्याचा फायदाच होईल, अशा प्रकारचे उत्तम सामाजिक कार्य या ट्रस्टने केले आहे. जनतेकडून आलेले पैसे ईश्वराच्या प्रसादाच्या रूपाने जनतेच्याच कार्याकरिता परत करण्याचं काम 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट'ने केलं आहे. असं अतिशय अनुकरणीय काम केल्याबद्दल मी 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट'चे अध्यक्ष आणि विश्वस्त मंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.



ससून सर्वोपचार रुग्णालयातील "जय गणेश रुग्णसेवा अभियान" अंतर्गत पाकशाळा नूतनीकरणाच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी तत्कालीन आरोग्य मंत्री विजयकुमार गावित व तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित दादा पवार



**डॉ. अजय चंदनवाले**
माजी अधिष्ठाता, ससून रुग्णालय, पुणे

डॉ. अजय चंदनवाले हे 'ससून रुग्णालया'ची प्रतिमा उज्ज्वल व्हावी, जनतेचा विश्वास अधिक दृढ व्हावा आणि रुग्णांना उत्तम उपचार मिळावेत, यासाठी अहोरात्र झटत होते. अशा वेळी 'दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट'ने या कार्यात पुढाकार घेणे हे त्यांच्या दृष्टीने केवळ सहकार्य नव्हते तर त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांची समाजाने दिलेली भावनिक पावती होती. त्यांच्या ध्येयाला मिळालेला हा महत्त्वाचा प्रतिसाद त्यांना अधिक बळ देणारा, प्रेरणादायी आणि आश्वासक ठरला.




चैत्र शुद्ध प्रतिपदा - गुढीपाडवा -
श्रींच्या मंदिराचा वर्धापन दिन



हिंदू नववर्षाचा पहिला दिवस व साडेतीन मुहूर्तांपैकी एक म्हणून साजरा करण्यात येणारा हा गुढीपाडवा. तसेच श्रीमंत दगडूशेठ गणेश मंदिराचा वर्धापन दिन म्हणून देखील याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालं आहे.

पहाटेपासूनच मंदिर परिसर भक्तिरसाने ओतप्रोत भरून जातो. सुमधुर मंगलसूरांच्या नादात नववर्षाचे स्वागत केले जाते आणि वातावरणात पावित्र्याची, आशेची व सकारात्मकतेची अनुभूती दाटून येते. ब्रह्मध्वज म्हणजेच गुढी उभारून तिची विधिवत पूजा केली जाते. नवीन वस्त्र-आभूषणे परिधान केलेले भक्तगण अपार श्रद्धा व आनंदाने बाप्पांच्या चरणी नतमस्तक होतात.

जणू नववर्षाच्या शुभेच्छा स्वतः श्रीगणेशच भक्तांना प्रदान करीत आहेत, असा भाव प्रत्येकाच्या मनात उमटतो. दर्शनासाठी जमलेली प्रचंड गर्दी ही केवळ उपस्थिती नसून, ती लाखो मनांच्या विश्वासाची, आशेची आणि प्रेमाची साक्ष असते. एकमेकांना दिल्या जाणाऱ्या नववर्षाच्या शुभेच्छांमधून मंदिर परिसरात आपुलकीचा, सौहार्दाचा आणि मंगल ऊर्जेचा प्रवाह अखंड वाहत राहतो.

या पवित्र दिनी मंदिरावर साकारलेली फुलांची भव्य, सुगंधी आणि रंगीबेरंगी आरास पाहताच मन भारावून जाते. गर्भगृहात श्रींच्या सान्निध्यात केलेले विविध फुलांचे कलात्मक नक्षीकाम हे केवळ सौंदर्यदर्शन नसून, भक्तिभावातून उमललेले एक अद्‌भुत शिल्पच वाटते. विविध ताज्या व स्वादिष्ट फळांची रचलेली समृद्ध रास ही निसर्गाच्या भरभराटीचे आणि कृतज्ञतेचे प्रतीक ठरते.

संपूर्ण वातावरणात भक्ती, परंपरा, सौंदर्य आणि आनंद यांचा विलक्षण संगम अनुभवता येतो. गुढीपाडव्याच्या या पावन दिवशी श्रीमंत दगडूशेठ गणेश मंदिरात साजरा होणारा हा उत्सव केवळ नववर्षाची सुरुवात ठरत नाही, तर श्रद्धा, परंपरा आणि अखंड विश्वास यांचा भावस्पर्शी सोहळा बनून भक्तांच्या अंतःकरणात कायमस्वरूपी घर करून राहतो.

# मंदिर व्यवस्थापन



लाखो भाविकांच्या अढळ श्रद्धेचं केंद्र असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराचं व्यवस्थापन हे केवळ एक प्रशासकीय काम नाही, तर ती एक अत्यंत संवेदनशील, जबाबदारीपूर्ण आणि श्रद्धेने ओथंबलेली साधना आहे. हे व्यवस्थापन ना एखाद्या खाजगी संस्थेच्या चौकटीत बसतं, ना शासकीय यंत्रणेच्या कडक साच्यात. कारण हे स्थान केवळ मंदिर नाही-ते लाखो भक्तांच्या भावनांचं, विश्वासाचं आणि आशेचं पवित्र अधिष्ठान आहे.

मंदिरात शेकडो कर्मचारी विविध जबाबदाऱ्या सांभाळत कार्यरत आहेत-लेखा विभागापासून सुरक्षेपर्यंत, स्वच्छतेपासून ते धार्मिक विधी पार पाडणाऱ्या सुसंस्कृत व सुशिक्षित ब्राह्मणांपर्यंत प्रत्येकजण आपल्या कामातून भक्तीची अनुभूती देत असतो. पहाटेच्या काकडआरतीपासून ते रात्री उशिरापर्यंत अखंड सुरू असलेला भक्तांचा प्रवाह, त्यातून येणाऱ्या देणग्या, रोकड, आधीच आरक्षित केलेल्या पूजा, अभिषेक, यज्ञ यांसारखे धार्मिक विधी-हे सर्व अत्यंत काटेकोर नियोजनाने, ठरलेल्या दिवशी आणि ठरलेल्या वेळेत पार पाडले जातात. कारण त्या प्रत्येक विधीमागे एखाद्या भक्ताची आस्था, श्रद्धा आणि मनोभाव दडलेले असतात.

धार्मिक विधीनंतर भक्तांच्या पत्त्यावर प्रसाद व अंगारा पाठविणे, देणगी स्वरूपात प्राप्त झालेल्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांची अचूक नोंद ठेवणे-हे सारे अत्यंत पारदर्शकतेने केले जाते. विशेष म्हणजे या मंदिरात भक्तांनी अर्पण केलेल्या दागिन्यांचा कधीही लिलाव केला जात नाही. कारण त्या दागिन्यांमध्ये आर्थिक किमतीपेक्षा कितीतरी पटींनी मौल्यवान अशा भक्तभावनांचा ठेवा असतो. म्हणूनच ते दागिने वितळवून पुन्हा गणरायासाठी नवीन अलंकार घडविले जातात-२४ कॅरेट शुद्ध सोन्यासारखा निर्मळ आणि पवित्र विचार!

गणरायाच्या दैनंदिन पोशाखांसाठीही भक्तांकडून पूर्वनियोजित बुकिंग केलेले असते.

कुणाचा वाढदिवस, कुणाचा विवाहदिन, तर कुणाच्या आयुष्यातील एखाद्या मंगल प्रसंगानिमित्त अर्पण केलेले हे पोशाख ठरलेल्या दिवशी अचूकपणे चढविले जातात. देवावर चढवलेले हे पोशाख नंतर त्या-त्या भक्तांच्या पत्त्यावर घरपोच पाठविले जातात. ही केवळ एक वस्तू नसून, भक्तांसाठी ती मंदिराकडून मिळालेली अमूल्य आठवण असते-जी ते आयुष्यभर जपून ठेवतात. किती ही रेशमासारखी मृदू आणि हळवी विचारसरणी!

मंदिरात श्रींच्या चरणी लग्नपत्रिका अर्पण करण्यासाठी जेव्हा भक्त भाविकतेने येतात, तेव्हा गुरुजींच्या माध्यमातून ती पत्रिका श्रद्धेने श्री गणेशाच्या चरणी ठेवली जाते. त्यानंतर ती मंदिराच्या कार्यालयात जमा होते आणि कार्यालयाकडून त्या वधू-वरांच्या पत्त्यावर 'गणेशाचं आशीर्वचन' नावाचं अत्यंत सुंदर, भावस्पर्शी पत्र पाठविलं जातं.

**सुमंगल शुभाशीष**

**अपार भावभक्तीत भिजलेलं, काळजातल्या श्रद्धेने सजलेलं, आयोजित शुभकार्याचं आपलं अगत्याचं आमंत्रण प्राप्त झालं.**

**मी, शिव-गौरीनंदन, पाशांकुशधर श्रीमंत दगडूशेठ गणपती, ऋद्धी, सिद्धी आणि माझ्या समस्त प्रिय गणांसह कार्यस्थळी असणार आहे, वधू-वराच्या उमलत्या सहजीवनावर मांगल्याचा वर्षाव करण्यासाठी! घेऊन येणार आहे आनंदाचं आकाश, धन्यतेची धरती, समृद्धीचा सागर,... सौख्य समाधानाचा दरवळता जीवनसुगंध. प्रदान करणार आहे मानव सेवेची उदंड कार्यक्षमता आणि दहा दिशांच्या कलशातून देणार आहे अक्षय साफल्याचं अमृतमय शुभवरदान!**

**शुभकार्यम् निर्विघ्नम् भवतु!! कल्याणमस्तु!!!**



हे पत्र मंदिर न्यासाच्या वतीने प्राप्त होताच अक्षरशः त्या वधू-वरांच्या डोळ्यांत आनंदाश्रू नाही आले तरच नवल. कारण या पत्रामागे दडलेला विचारच इतका अलौकिक आहे - जणू साक्षात श्री गणेश, रिद्धी-सिद्धींसह आणि आपल्या सर्व गणांसोबत, त्या मंगल लग्नसोहळ्यास उपस्थित राहून नवदांपत्याला आशीर्वाद देणार आहेत. केवळ हे ऐकूनसुद्धा मन कृतार्थतेने भरून येतं.

म्हणूनच या पत्राची प्रत जवळजवळ प्रत्येक वधू-वर आयुष्यभर आपल्या घरात अमूल्य ठेवा म्हणून जतन करून ठेवतात. या उपक्रमातून मंदिरातील विश्वस्तांची अपार सद्भावना, संवेदनशीलता आणि समाजासाठी सतत काहीतरी मंगल घडवत राहण्याची तळमळ स्पष्टपणे दिसून येते. कित्येक लोकांचे आशीर्वाद, कित्येक मनांत आनंदाची लहर निर्माण करणारा हा विचार खरंच अचंबित करणारा आणि प्रेरणादायी आहे.

या सर्व प्रक्रियांची शिस्तबद्ध नोंद, दस्तऐवजीकरण आणि त्यासोबतच मंदिरातर्फे मानवसेवेकरिता दिल्या जाणाऱ्या देणग्यांचा योग्य व प्रामाणिक वापर होतो आहे ना, याचीही सतत दक्षता घेतली जाते. कोणतीही तडजोड न करता पारदर्शकता आणि विश्वास हीच या व्यवस्थेची खरी ओळख आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण मंदिर परिसर सीसीटीव्हीच्या जाळ्याने संरक्षित असून, संशयित हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जाते. अत्याधुनिक यंत्रसामग्री, नवीन तंत्रज्ञान याबाबत कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देऊन सज्ज केले जाते. विशेष बाब म्हणजे मंदिरातील सुरक्षा रक्षक हे केवळ तालमीतीलच असावेत, ही परंपरा आजही जपली जाते. कारण स्वतः श्रीमंत दगडूशेठ हलवाई तालमीत जाऊन कुस्ती खेळत असत-त्या परंपरेला आदरांजली वाहत ही प्रथा आजही जिवंत ठेवली आहे.

या सर्व गोष्टींतून विश्वस्त, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची सखोल दूरदृष्टी आणि मूल्याधिष्ठित विचारसरणी पदोपदी जाणवते. म्हणूनच श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिराचं व्यवस्थापन केवळ यशस्वी नाही, तर श्रद्धा, शिस्त आणि संवेदनशीलतेचा एक प्रेरणादायी आदर्श ठरतो.



# श्रद्धेचा आध्यात्मिक प्रवास



महाराष्ट्रातील 'अष्टविनायक' ही गणेशाची आठ पवित्र स्थाने असून त्यांच्या दर्शनाला विशेष आध्यात्मिक महत्त्व आहे. आपल्यातील - काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर-तसेच 'ममत्व' आणि अहंकार या अष्टविकारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी गणरायाच्या शरणागतीची भावना या यात्रेमागे दडलेली आहे. या विकारांवर नियंत्रण मिळवल्यानंतरच गणेशचरणी स्थान प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे. परंपरेनुसार यात्रेची सुरुवात मोरेश्वर गणपती मंदिर, मोरगाव येथून करून सर्व दर्शनांनंतर पुन्हा तेथेच सांगता केली जाते. मंदिरात गाभाऱ्याकडे जाताना प्रथम श्री महालक्ष्मी माता व श्री नग्न भैरव यांचे अत्यंत मनोहारी दर्शन घडते.



नंतर श्री गणेश परिवारातील देवी सिद्धी - बुद्धी व श्री लक्ष - लाभ यांचे दर्शन होते. मंदिराच्या गाभाऱ्यात महान गाणपत्य श्री मुदगल आणि श्री भृशुंडी ऋषी, मोद-प्रमोदांच्या मूर्ती, मयुर, श्री, ओम, स्वस्तिक, सूर्य, चंद्र, पंचेश्वर अशी सर्व चिन्हं आणि देवतांच्या मूर्ती आहेत.





अष्टविनायकांची चांदीमध्ये कलात्मकतेने रचना केलेली पहायला मिळते. नित्योपचारासाठी चांदीची सालंकृत मूर्ती असून तिच्या मागे सोन्याच्या आसनावर १३४ वर्षांची परंपरा जपणारी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पांची वरदहस्त मूर्ती विराजमान आहे.

सभामंडप चांदीच्या नाजूक सजावटीने सुशोभित असून छतावरील आठ नक्षीदार पाकळ्यांमधून अष्टविनायक दर्शनाची प्रतीकात्मक मांडणी दिसते. भक्तांच्या सहकार्याने मंदिर वातानुकूलित केले असून छत गणेशचिन्हांनी अलंकृत आहे.



## गाणपत्य शैलीतील वैशिष्ट्यपूर्ण मंदिर

मंदिराची अष्टकोनी रचना अष्टविकारांवर नियंत्रणाचे प्रतीक मानली जाते. सुमारे ८१ फूट उंचीचे मंदिर मंगल कलशाकार कळसाने शोभून दिसते. राजस्थानी कलाकारांच्या कुशल हस्तकौशल्यातून साकारलेली गाणपत्य शैली मंदिराला भव्यतेसोबत आध्यात्मिक सौंदर्य प्रदान करते. गणेशचिन्हांचा कल्पक वापर मंदिराच्या प्रत्येक घटकात जाणवतो.





## शंकराचार्यांचा मंगल स्पर्श

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सन १९८४ मध्ये शृंगेरी पिठाचे जगद्गुरू भारतीतीर्थ यांनी गणेशपूजन करून मंदिर भाविकांसाठी खुले केले. त्या दिवसापासून अनेक शंकराचार्य व संतांनी येथे येऊन दर्शन घेतले, ज्यामुळे मंदिराची आध्यात्मिक परंपरा अधिक दृढ झाली.





## बाह्यदर्शनातील प्रतीकात्मकता

प्रवेशद्वारावरील चांदीचे मोद-प्रमोद आणि मूषक शिल्प भक्तांचे स्वागत करतात. लाल ग्रॅनाइटची फरशी पृथ्वी तत्त्वाचे तर पिवळा दगड हा सूर्य-आत्मतत्त्वाचे प्रतीक मानले गेले आहे. मंगल कलशाकार कळसावरील भगवा ध्वज "त्वमेव केवलं तत्वमसि" या भावनेप्रमाणे सर्वत्र व्यापलेल्या गणेशतत्त्वाची जाणीव करून देतो. सीमाभिंतीवरील कोरीव काम मंदिराच्या सौंदर्यात भर घालते.

## भक्तनावाने प्रकटलेले गणेशतत्त्व

अष्टविनायकातील पाली येथे श्री बल्लाळेश्वर मंदिर, हे भक्त बल्लाळच्या नावाने गणेश अवतरले, अशी श्रद्धा आहे. त्याचप्रमाणे महान गणेशभक्त दगडूशेठ हलवाई यांच्या भक्तीच्या स्मरणार्थ येथे गणपती "श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती" या नावाने पूजले जातात - भक्ती आणि दैवत यांचा अद्वैत संबंध अधोरेखित करणारी ही परंपरा आहे.आज देश-विदेशातून असंख्य भाविक येथे दर्शनासाठी येतात.



# चैत्र शुद्ध द्वितीया
# वल्लभेश मंगलम

स्वानंदनाथांना जेव्हा बहुरूपात प्रकट होण्याची इच्छा झाली, तेव्हा त्या इच्छेच्या पूर्ततेसाठी त्यांनी आपल्या योगमायेचे आवाहन केले. हीच दिव्य योगमाया 'देवी वल्लभा' या नावाने ओळखली जाते. मोरयाची अत्यंत प्रिय असल्याने तिला 'वल्लभा' असे संबोधले जाते. देवी वल्लभेच्या पवित्र प्रकटीकरणाची आणि मोरयाने तिच्यासह अलंकारधारण करून साकार झालेल्या दिव्य ऐक्याची तिथी म्हणून चैत्र शुद्ध द्वितीया विशेष मानली जाते.

या मंगलदिनी श्री गणेश आणि देवी वल्लभा यांचा विवाह सोहळा अत्यंत राजेशाही ऐश्वर्यात, भक्तिभावाने आणि अपार उत्साहात साजरा केला जातो. हिंदू संस्कृतीत विवाहातील सर्वात पवित्र व महत्त्वाचा विधी मानली जाणारी सप्तपदी पाहण्यासाठी भक्तगण आतुरतेने प्रतीक्षा करीत असतात. श्री गणेश आणि देवी श्रीवल्लभा यांच्या सप्तपदीचे साक्षीदार होणे, ही भक्तांसाठी एक अविस्मरणीय आध्यात्मिक अनुभूती ठरते. या दिवशी विविध सुगंधी व रंगीबेरंगी फुलांनी सजवलेला भव्य आणि



देखणा विवाह मंडप उभारला जातो. चहूबाजूंनी केलेली नयनरम्य फुलांची आरास मन मोहून टाकते. सनई-चौघड्यांच्या मंगल सुरावटींनी संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारून जातो. असा हा अद्वितीय, दिव्य आणि भावपूर्ण विवाह सोहळा पाहणे ही भक्तांसाठी खऱ्या अर्थाने पर्वणी ठरते.



## ॥ चैत्र वद्य पंचमी ॥ (मोगरा महोत्सव)



नवसंवत्सरात येणारी पहिली वद्य पंचमी. या अत्यंत पावन आणि मंगल दिनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात साजरा होणारा 'मोगरा महोत्सव' हा भक्ती, सौंदर्य आणि कलात्मकतेचा एक अनुपम सोहळा ठरतो. 'वासंतिक उटी' या नावानेही ओळखला जाणारा हा उत्सव म्हणजे वसंतऋतूच्या प्रसन्नतेचे आणि पावित्र्याचे साक्षात दर्शनच म्हणावे लागेल. या महोत्सवाची तयारी तीन ते चार दिवस आधीपासून सुरू होते. सुमारे १०० ते १५० महिला आणि ८० ते १०० पुरुष कारागीर, जे आपल्या कलेत पारंगत असतात, हे सर्वजण अत्यंत श्रद्धेने आणि एकाग्रतेने फुलांची भव्य आरास साकारत असतात. या सजावटीसाठी वापरण्यात येणाऱ्या फुलांची संख्या आणि वैविध्य पाहिले, तर तो सोहळा किती विराट, भव्य व अद्‌भुत असेल याची कल्पना येते.

यासाठी जवळजवळ ५० लाख मोगऱ्याच्या फुलांचा वापर करण्यात येतो. त्यासोबतच तीन ते साडेतीन हजार गुलाबांच्या जुड्या, दीड ते दोन हजार लिलीच्या जुड्या, सुमारे दोन हजार किलो झेंडू, दोन हजार किलो शेवंती, वीस हजार चाफ्याची फुले, शंभर किलो गुलाबाच्या पाकळ्या, तसेच कमळ, जाई, जुई, जास्वंद आणि सुमारे एक हजार गुलछडीची फुलं अशा विविध फुलांचा अत्यंत कलात्मक व संतुलित पद्धतीने वापर केला जातो.



या सर्व फुलांच्या सान्निध्यात मोरयाच्या चांदीच्या मूर्तीवर उटीचे लेपन करण्यात येते.

यावेळी मंदिरात उटीचे भजन सादर केले जाते, ज्याच्या स्वरांमध्ये भक्तिभाव अधिकच गहिरा होत जातो.



फुलांची नक्षी, त्यांची रंगसंगती आणि सूक्ष्म रचना पाहता, ही आरास म्हणजे कारागिरांच्या कलात्मकतेची खरी परीक्षा असते. प्रत्येक कोनातून ही सजावट पाहणाऱ्याला थक्क करून सोडते.

मोगऱ्याच्या फुलांचा दरवळणारा सुगंध आसमंतात चहूबाजूंना दरवळत राहतो. वातावरण इतके आल्हाददायक आणि मनोहारी होते की जणू आपण एखाद्या दिव्य, सुगंधी फुलबागेत विहार करीत आहोत असा भास निर्माण होतो. भक्तांचे मन आपसूकच शांत, प्रसन्न आणि भक्तिरसाने ओथंबून जाते.

श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरातील 'मोगरा महोत्सव' हा केवळ एक उत्सव नसून, तो नवेपण, वेगळेपण आणि कलात्मकतेचा त्रिवेणी संगम आहे. प्रत्येक उत्सवातून भक्तांना काहीतरी नवीन, काहीतरी विलक्षण आणि काहीतरी अत्यंत भावस्पर्शी अनुभव देणारी ही परंपरा मंदिराच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे तेजस्वी दर्शन घडवते.







# नवसंजीवनी

पुरंदर तालुक्यावर सलग दोन वर्षे पावसाने पाठ फिरवली होती. संपूर्ण परिसर दुष्काळाच्या छायेत गेला होता. पिण्याच्या पाण्याची टंचाई तीव्र झाली होती, शेतजमिनी सुकून खोल भेगा पडल्या होत्या. गुरेढोरे पाणी व चाऱ्याअभावी तडफडत होती. निराशा, असहायता आणि नकारात्मकतेचे मळभ लोकांच्या मनावर दाटून आले होते.

पिंगोरी गावातील धरणातही परिस्थिती वेगळी नव्हती. वर्षानुवर्षे साचलेल्या गाळामुळे पाणी साठत नव्हते, जमिनीत मुरण्याचा तर प्रश्नच नव्हता. याच काळात या भागातील बाबा शिंदे यांनी ही भयावह स्थिती महेश सूर्यवंशी यांच्या निदर्शनास आणून दिली. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी हा विषय थेट ट्रस्टसमोर मांडला. ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे व इतर पदाधिकाऱ्यांनी तातडीने गाव आणि धरणाची प्रत्यक्ष पाहणी केली.

यानंतर 'श्रीमंत दगडूशेठ ट्रस्ट'चे पदाधिकारी तत्कालीन विभागीय आयुक्त प्रभाकर देशमुख यांची भेट घेण्यासाठी गेले. सविस्तर चर्चा झाली. प्रत्येक दोन-तीन वर्षांनी पुन्हा उद्भवणाऱ्या या संकटावर तात्पुरत्या उपायांनी भागणार नाही, तर कायमस्वरूपी तोडगा काढलाच पाहिजे, असा ठाम निर्णय यावेळी झाला. या दीर्घकालीन उपाययोजनेची जबाबदारी ट्रस्टने स्वतःवर घेतली.

या दृष्टीने पिंगोरी गावाची निवड करण्यात आली. डोंगराळ भागात वसलेले हे गाव आणि येथील धरण पाणीसाठा वाढविण्याच्या दृष्टीने मोठी संधी होती. गेली तब्बल चाळीस वर्षे धरणातील गाळ काढण्याचे कोणतेही काम झाले नव्हते. हे काम करण्यासाठी लाखो रुपयांची आवश्यकता होती. ट्रस्टने ही जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली.

या कामातून गावकऱ्यांनाच रोजगार मिळावा, त्यांना नव्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने स्थानिक लोकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात आला. अजस्र यंत्रसामुग्री मागवण्यात आली.





या उपक्रमास तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी भेट देऊन जलयुक्त शिवार योजनेतील सर्वोत्तम कार्य म्हणून ट्रस्टचा गौरव केला.

गावातील शेतकरी, शेतमजूर दिवस-रात्र अथक परिश्रम करू लागले. बाबा शिंदे यांनी लोकांना एकत्र आणून कामाचे योग्य नियोजन करण्यात मोलाची भूमिका बजावली. पुरंदरच्या तत्कालीन तहसीलदार सीमा होळकर यांचेही या उपक्रमाला मोठे सहकार्य लाभले.

या सामूहिक प्रयत्नांमुळे हळूहळू नकारात्मकतेचे रूपांतर सकारात्मक ऊर्जेत झाले. राजकारण, मतभेद विसरून गावात एकीचे चित्र दिसू लागले. गावकरी, शेतकरी आणि मजुरांनी हे कार्य 'गणपती बाप्पाचा प्रसाद' मानून अहोरात्र मेहनत घेतली. परिणामी ज्या धरणात पूर्वी जास्तीत जास्त २९ कोटी लिटर पाणी साठू शकत होते, तिथे आता ५१ कोटी लिटर पाणीसाठ्याची क्षमता निर्माण झाली.



या पाण्याच्या शाश्वतीमुळे शेतकऱ्यांना वर्षातून दोन वेळा पिकं घेणे शक्य झाले. पाणी जमिनीत जिरल्याने परिसर हिरवागार झाला, वनराई पुन्हा डोलू लागली. इतका मुबलक पाणीसाठा तयार झाला की पुढील दोन वर्षांसाठी तो पुरेसा ठरणार होता. त्यामुळे आता या भागातील ग्रामस्थांनी दुग्धव्यवसाय, वनौषधी लागवड आणि इतर पूरक व्यवसाय करण्यास सुरुवात केली आहे.

पिंगोरीच्या तत्कालीन सरपंच पल्लवी भोसले यांनी या उपक्रमाबद्दल ट्रस्टचे मनापासून आभार मानले आणि इतर गावांनीही अशाच प्रकारे एकत्र येऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले. त्यानंतर आजूबाजूच्या गावांमध्ये 'पाणी साठवा, पाणी जिरवा', नाले खोदणे, ठिबक सिंचन यांसारख्या उपक्रमांना चालना मिळाली.

ट्रस्टने ही जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली, त्या क्षणापासूनच गावकऱ्यांच्या मनात एक नवा विश्वास रुजला-आता हा पाण्याचा प्रश्न कायमचा मिटणार आहे. कारण ट्रस्टने एकदा हाती घेतलेले कार्य कधीही अपूर्ण राहत नाही, ही खात्रीच त्यांची खरी ओळख होती. हे कार्य गावासाठी केवळ योजना नव्हे, तर अंधारलेल्या जीवनात मिळालेली नवसंजीवनी ठरली. त्यातून संपूर्ण गावात सामाजिक परिवर्तनाची नवी पहाट उमलली आणि निराशेच्या जागी आशा, उत्साह व नवचैतन्याने भरलेले वातावरण फुलून आले.

या उपक्रमाने गावाला पाणी दिलेच, पण त्याहून अधिक मौल्यवान गोष्ट दिली-जगण्यावरचा विश्वास. म्हणूनच हा उपक्रम केवळ जलसंधारणाचा नव्हता, तर तो संपूर्ण समाजाला नव्याने उभे करणारा, आशा आणि नवचैतन्याची मशाल पेटवणारा ऐतिहासिक टप्पा ठरला.

# ॥ पुष्टिपती विनायक जयंती ॥ (शहाळे महोत्सव)



शिव-पार्वतीच्या पावन गृहातून वैशाख शुद्ध पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर अवतरलेला हा विनायक अवतार अधर्माच्या अंधाराला छेद देणारा दिव्य प्रकाश ठरला. पृथ्वी, पाताळ आणि स्वर्गलोकावर दहशत माजवणाऱ्या दुर्मती राक्षसाचा संहार करण्यासाठी, पार्वती मातेला दिलेल्या वराप्रमाणे श्री गणेशांनी विनायक रूप धारण केले आणि अधर्माचा अंत केला. म्हणूनच हा मंगल दिवस 'पुष्टिपती विनायक जयंती' म्हणून श्रद्धेने साजरा केला जातो. उत्तर भारतात याच दिवशी 'वैशाखी'चा उत्सव साजरा होतो, तर येथे भक्तिभावाने नटलेला 'शहाळे महोत्सव' साकारतो. शेतकऱ्यांच्या वतीने पर्जन्यराजासाठी बाप्पांच्या चरणी अर्पण होणारा ५,००० शहाळ्यांचा महानैवेद्य म्हणजे निसर्गाशी संवाद साधणारी प्रार्थनाच. हिरव्या शहाळ्यांच्या राशी, पानांची सोज्वळ आरास आणि झावळ्यांसह उभे असलेले नारळवृक्ष - या साऱ्या नैसर्गिक सौंदर्यात विराजमान असलेली गणरायाची शांत, प्रसन्न मूर्ती पाहिली की क्षणभर वास्तव विसरून मन एखाद्या दिव्य अनुभूतीत हरवून जातं.



नैसर्गिक घटकांतून साकारलेली ही सजावट हे श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिराचे खास वैशिष्ट्य आहे. येथे प्रत्येक आरास केवळ डोळ्यांना नव्हे, तर अंतःकरणालाही स्पर्श करते. या सौंदर्यामागे कलादिग्दर्शकांपासून कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांची अखंड साधना दडलेली आहे - जी शब्दांत मोजता येत नाही. इतक्या वैविध्यपूर्ण कल्पना, वेगवेगळे उत्सव आणि त्यांचे आशयघन सादरीकरण हे मंदिराच्या विश्वस्त व कार्यकर्त्यांच्या सर्जनशीलतेचे जिवंत उदाहरण आहे. या पावन निमित्ताने श्री गणेश याग, ब्रह्मणस्पती सूक्त अभिषेक आणि पहाटेचा स्वराभिषेक मंदिरात निनादतो. भक्तांच्या भक्तिरसात संपूर्ण परिसर न्हाऊन निघतो. दुसऱ्या दिवशी या शहाळ्यांचा प्रसाद ससून रुग्णालयातील रुग्णांना वितरित केला जातो - जिथे भक्ती सेवेत रूपांतरित होते आणि गणरायाचे करुणाशील स्वरूप अधिक उजळून निघते.



# इतिहासातील तो एक काळा दिवस

करोडो भाविकांच्या श्रद्धेचं केंद्र असलेलं, प्रत्येकाच्या मनात अढळ स्थान असलेलं दैवत, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पावर इ.स. १९८८ मध्ये काही समाजविघातक, दुष्ट प्रवृत्तींकडून असे कृत्य घडवून आणले गेले की, जे कोणाच्याही कल्पनेपलीकडचे होते.

ही घटना लोकांच्या लक्षात येताच तिचे तीव्र पडसाद पुणे शहरात उमटू लागले. क्षणार्धातच हे लोण संपूर्ण महाराष्ट्रात पसरलं आणि उभा महाराष्ट्र संतप्त झाला. रस्त्या-रस्त्यावर आगीचे डोंब उसळू लागले. हा वणवा कसा शांत करायचा, असा मोठा प्रश्न तत्कालीन सरकारसमोर उभा राहिला. "हे पुण्यासारख्या सुसंस्कृत शहरात घडूच कसं शकतं?" हा एकच प्रश्न प्रत्येकाच्या मनात होता - आणि ते स्वाभाविकही होतं, कारण या घटनेने प्रत्येकाचं काळीज हादरून गेलं होतं.

अशा अत्यंत तणावपूर्ण आणि कठीण परिस्थितीतही श्रीमंत दगडूशेठ गणेश मंडळाचे विश्वस्त व कार्यकर्ते मात्र विचलित न होता, खंबीरपणे परिस्थितीला सामोरे जात होते. सर्वप्रथम संपूर्ण मंदिराची साफसफाई करण्यात आली. गणपतीच्या मूर्तीचे विधिवत शुद्धीकरण करण्यात आले आणि मंदिर भक्तांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले. मात्र दुसरीकडे राज्यभरातील दंगली काही केल्या थांबत नव्हत्या. पोलिसांना राज्य राखीव दल तसेच केंद्रातून अतिरिक्त पोलीस दल पाचारण करावं लागलं होतं.

याच पार्श्वभूमीवर तात्या, मामा रासने, आप्पा सूर्यवंशी आणि बुवा रासने यांनी एक ठाम निर्णय घेतला - त्याचबरोबर हिंदूंचे आणि गणेशोत्सव कार्यकर्त्यांचे एक संघटन केले गेले कारण या संकटावर केवळ तात्पुरता नव्हे, तर कायमस्वरूपी तोडगा काढायलाच हवा होता. म्हणूनच ज्योतिर्भास्कर साळगावकर यांच्या उपस्थितीत पुण्यात एक महत्त्वाची सभा घेण्यात आली आणि त्याच दिवशी 'राष्ट्रीय गणेशोत्सव महामंडळा'ची स्थापना झाली. आप्पा सूर्यवंशींनी गणेशोत्सव कसा साजरा करावा, यासाठी एक स्पष्ट व विचारपूर्वक ४० कलमी आचारसंहिता तयार केली.



## ४० कलमी आचारसंहिता

१. महाराष्ट्रात एकाच मुहूर्तावर सर्व ठिकाणी श्रीगणेशाची स्थापना करा.

२. गणपती बाप्पाची आरती सकाळी व सायंकाळी आठ वाजता अशी एकाच वेळी करा.

३. हा उत्सव हिंदू धर्माचा आहे.

४. आपल्या धर्माचा अभिमान बाळगा.

५. अभिमानाने सांगा आम्ही हिंदू आहोत.

६. सिने संगीत, पाश्चात्त्य संगीत, रंभासोंबा, ब्रेक डान्स वगैरे सारखे ओंगळ स्वरूप बदला.

७. भक्ती गीते, भारतीय कर्णमधुर संगीत लावा.

८. कर्णकर्कश आवाजावर नियंत्रण ठेवा, मिरवणुकीत मर्यादित प्रमाणात स्पीकरऐवजी पारंपरिक वाद्यांचा वापर करावा.

९. उत्सव काळात कृपा करून मद्यपान वर्ज करा.

१०. उत्सव काळात जुगारासारखे प्रकार कृपया बंद ठेवा.

११. आपल्या उत्सवास राष्ट्रीय स्वरूप द्या.

१२. उत्सव संपूर्ण धार्मिक स्वरूपात साजरा करा.

१३. सबंध महाराष्ट्रात गणेशोत्सव समाजाभिमुख करा.

१४. सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करा.

१५. गणेशोत्सव लोकशिक्षणाचे व जनजागरणाचे प्रभावी माध्यम आहे त्यासाठी प्रयत्न करा.

१६. मानवसेवेचे व्रत अंगीकारा, माणसापेक्षा देव मोठा आहे याची जाणीव राहू द्या.

१७. दीनदुबळे, दुःखी, अपंग, आर्थिकदृष्ट्या कमकुवत, विधवा, परित्यक्ता यांना मदत करा.

१८. समाज हिताचे प्रकल्प हाती घ्या.

१९. महाराष्ट्रातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा व पुरातन मंदिरांचा जीर्णोद्धार करा.

२०. आपल्या भागातील मंदिरांचे पावित्र्य राखा व प्रसन्नता ठेवा.

२१. उत्सव काळात समाज प्रबोधनाचे देखावे उभारा.

२२. उत्सव काळात कुणाचीही मने दुखवू नका.

२३. गणेशोत्सवाच्या लोकवर्गणीतून अतिवृष्टी, पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त बांधवांना मदत करा.

२४. पीडित रुग्णांकरिता मदत करा.

२५. सर्व समाजाला बरोबर घेऊन उत्सव साजरा करा.

२६. विसर्जन शांततेने, शिस्तीने करा. गणेशोत्सवाबरोबर सर्वच उत्सव डॉल्बीमुक्त साजरे करूया.

२७. विसर्जनातील हिडीस व विडंबनात्मक प्रकार बंद करा.

२८. पवित्र वातावरणात मिरवणुकीची शान वाढवा.

२९. सर्वांना आनंद देणारा उत्सव साजरा करा.

३०. मिरवणुकीत वर्गणीदार, माता-भगिनी, प्रतिष्ठित नागरिक यांना सहभागी करा सर्वांना आदराची वागणूक द्या.

३१. विद्यार्थ्यांकडून अथर्वशीर्षाची आवर्तने रोज पहाटे करून घ्या.

३२. राष्ट्रगुरू लोकमान्य टिळक व छत्रपती शिवराय यांचे फोटो उत्सवाच्या मंडपात लावा.

३३. श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकोबाराया यांची भगवी पताका मंडपावर लावा.

३४. उत्सवकाळात अशोभनीय प्रथा बंद करा.

३५. श्रीगणेश या आपल्या आराध्य दैवतेचे पावित्र्य राखा.

३६. आपले मंडळ मानवसेवेचे कायमस्वरूपी मंदिर करा.

३७. आपल्या भागात व्यायामशाळा सुरू करा.

३८. गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका सुरू करा.

३९. व्यक्तीपेक्षा समाज, समाजापेक्षा राष्ट्र मोठे आहे याचे भान ठेवा.

४०. प्रतिकूल परिस्थिती असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारा.



इतक्या भयावह, नकारात्मक आणि अस्थिर काळातही विश्वस्तांनी तात्यांच्या नेतृत्वाखाली महामंडळाची स्थापना केली, ही बाब खरोखरच थक्क करणारी आहे. कारण ही आचारसंहिता भक्तांच्या दुखावलेल्या भावना, सामाजिक अस्वस्थता आणि राजकीय दबाव अशा सगळ्या पार्श्वभूमीवर तयार झाली होती. अशा परिस्थितीतही नकारात्मकतेचं रूपांतर सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण कार्यात करणं, हे विश्वस्त मंडळाच्या प्रगल्भतेचं आणि धैर्याचं द्योतक होतं.

आचारसंहिते मध्ये पुढील काळातील गणेशोत्सवाचं स्वरूप आमूलाग्र बदलण्याची क्षमता होती. समाजात एक सुसंस्कृत, शिस्तबद्ध आणि आदर्श उत्सवसंस्कृती निर्माण करण्यासाठी आज ही आचारसंहिता मार्गदर्शक ठरत आहे. हीच आचारसंहिता जर सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी अमलात आणली, तर गणेशोत्सव हा येणाऱ्या पिढ्यांसाठी एक आदर्श उत्सव ठरू शकेल.



# ॥ शेषात्मज गणेश जयंती ॥



गाणपत्य संप्रदायात जसे भाद्रपद व माघ महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे, तसेच ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीला साजरा होणारा श्री शेषात्मज गणेश जन्मोत्सव अत्यंत पावन आणि महत्त्वपूर्ण मानला जातो. हा दिवस केवळ एक तिथी नसून, धर्मसंस्थापनेसाठी अवतरलेल्या बाप्पांच्या दिव्य लीलांचे स्मरण करून देणारा आहे.

सृष्टीरचनेच्या महान कार्यात मग्न असताना भगवान ब्रह्मदेव आपल्या स्वतःच्या सृष्टीवर मोहित झाले. त्या मायामय अवस्थेत त्यांच्या नासिकेतून एका बालकाचा जन्म झाला. त्या बालकाकडे पाहताच ब्रह्मदेव अधिकच मायायुक्त झाले आणि आपल्या नव्या अपत्याला 'मायाकर' असे नाव दिले. त्यांनी त्याच्यावर अपार कृपा करून असंख्य वरदानांनी त्याला परिपूर्ण केले. काळाच्या ओघात विप्रचिती नामक राक्षसाने मायाकराला राक्षसांचा राजा घोषित केले. प्राप्त झालेल्या अतुलनीय वरदानांच्या बळावर मायाकराने पृथ्वी आणि स्वर्गलोक जिंकून घेतले. त्याच्या अहंकाराची आणि सामर्थ्याची परिसीमा गाठताच त्याने पाताळलोकावरही आक्रमण केले. त्याच्या प्रचंड वरदानांसमोर सर्व देवता असहाय झाल्या. अखेरीस भगवान शेष यांनी पूर्ण शरणागतीने भगवान गणेशांचे स्मरण केले.



भगवान शेष ध्यानमग्न असताना, त्यांच्या तपःसाधनेतूनच भगवान श्रीगणेश 'श्री शेषात्मज' या दिव्य रूपात ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीच्या मध्यान्हकाळी प्रकट झाले. हा अवतार म्हणजे अधर्माच्या विनाशासाठी आणि धर्माच्या संरक्षणासाठी अवतरलेले साक्षात चैतन्यस्वरूप होते.

याच अवतारात पुढे गजासुर नामक राक्षसाचा संहार करण्यासाठी भगवान श्रीगणेशांनी ब्रह्मदेव, विष्णू, महेश, देवी आणि सूर्य - या पंचेश्वरांच्या शक्तींनी युक्त असलेल्या मूषकाला आपले वाहन बनवण्याची आज्ञा दिली. त्या दिव्य मूषकावर आरूढ होऊन श्रीगणेशांनी गजासुराचा वध केला. त्यामुळेच या अवताराला 'श्रीमूषकग' हे पावन नाव प्राप्त झाले.

अशा प्रकारे श्री शेषात्मज गणेश जन्मोत्सव हा केवळ एक पौराणिक प्रसंग नसून, तो भक्ती, शरणागती आणि दैवी कृपेचे अद्‌भुत प्रतीक आहे. हा उत्सव भक्तांना अधर्मावर धर्माच्या विजयाचा, अहंकारावर भक्तीच्या सामर्थ्याचा आणि संकटसमयी गणरायाच्या कृपेवर अखंड विश्वास ठेवण्याचा अमूल्य संदेश देतो. या दिवशी श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात विधिपूर्वक गणेशयाग तसेच सहस्रावर्तनांचे आयोजन करण्यात येते. या सोहळ्यानिमित्त बाप्पांना विविध प्रकारच्या फळांच्या भव्य राशींमध्ये विराजमान केले जाते. भरजरी वस्त्रांनी त्यांची अलंकृत पूजा केली जाते. विशेषतः या दिवशी साकारला जाणारा पगडीच्या आकाराचा कलात्मक मुकुट आणि त्यावर शोभणारे सुवर्ण अलंकार बाप्पांच्या दिव्य सौंदर्यात अधिकच भर घालतात. हा उत्सव केवळ दर्शनापुरता मर्यादित न राहता, भक्तांना अनेक धार्मिक परंपरांची ओळख करून देतो. त्या दिवसाचे आध्यात्मिक महत्त्व समजून घेताना ज्ञानात भर पडते आणि समाधानाची एक वेगळीच अनुभूती मिळते. खरं तर इतक्या विविध प्रकारचे, शास्त्रशुद्ध आणि कलात्मक उत्सव एकाच मंदिरात साजरे होणे हे दुर्मिळच म्हणावे लागेल. यामागे विश्वस्तांची दूरदृष्टी, कार्यकर्त्यांची कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभावाची परंपरा प्रकर्षाने जाणवते. म्हणूनच 'शेषात्मज गणेश जयंती' हा केवळ एक उत्सव न राहता, श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिराच्या समृद्ध परंपरेचा, भक्तीचा आणि व्यवस्थापन कौशल्याचा गौरवशाली उत्सव ठरतो.

**मंदिरातील सहस्त्रावर्तन पाठ**



## ॥ अक्षय्य तृतीया ॥ (आंबा महोत्सव)



साडेतीन मुहूर्तांपैकी एक अत्यंत शुभ व महत्त्वाचा असा मुहूर्त म्हणजे अक्षय्य तृतीया. या पावन दिनी गणरायाला ११,००० आंब्यांचा महानैवेद्य श्रीमंत दगडूशेठ गणेश मंदिरात श्री गणरायाला अर्पण करण्यात येतो. या केशरी आंब्यांच्या राशींमध्ये विराजमान झालेले बाप्पा अधिकच तेजस्वी, प्रसन्न आणि दिव्य स्वरूपात प्रकट झालेले दिसतात. मागील बाजूस असलेल्या चांदी-सोन्याच्या महिरपीवर उमटणारे आंब्यांच्या केशरी रंगांचे प्रतिबिंब संपूर्ण सजावटीला सौम्य, फिकट केशरी साज चढवते.

पिवळसर-केशरी आंब्यांच्या छटांमध्ये साकारलेली हिरव्या पानांचे मखर, त्यावर लाल गुलाबांची कड - ही रंगसंगती इतकी मोहक असते की मन क्षणातच त्या सौंदर्यात हरवून जाते.





देवळातील दृश्य पाहताना जणू हिरव्यागार, बहरलेल्या आमराईत बाप्पा विहाराला निघाले आहेत, असाच भास होतो. हे दिव्य दर्शन घेण्यासाठी लाखो भक्त उत्सुक असतात. परंपरेनुसार नंतर हे सर्व आंबे भक्तांना प्रसादरूपाने वाटले जातात. यानिमित्ताने स्वराभिषेक, भजन व कीर्तनाचे कार्यक्रमही आयोजित केले जातात. ही संपूर्ण भव्य उभारणी आणि त्यानंतरची आवराआवर - ही कला दिग्दर्शक, सहकारी कलाकार व कार्यकर्त्यांच्या अहोरात्र केलेल्या मेहनतीचे प्रतीक असते.

दुसऱ्या दिवशी हे आंबे प्रसाद म्हणून भक्तांना, रुग्णांना, वृद्धाश्रमातील वृद्धांना, तसेच अपंग लोकांना वाटण्यात येतात.



# श्री शारदेश मंगलम



गाणपत्य संप्रदायात श्रीगणेशाच्या दोन कार्यकारी शक्तींना देवी सिद्धी आणि देवी बुद्धी म्हणून पूजले जाते. भगवंताची क्रियाशक्ती म्हणजे देवी सिद्धी, तर अश्विन महिन्यात, शरद ऋतू मध्ये प्रकट झालेल्या देवी बुद्धीला तिच्या चंद्रासारख्या अल्हाददायक तेजामुळे 'शारदा' असे संबोधले जाते. शरदऋतूसारखीच प्रसन्नता देणारी ही देवी व भगवान श्री गणेश यांच्या दिव्य महामीलनाचा मंगल सोहळा म्हणजेच "श्री शारदेश मंगलम". अक्षय्य तृतीयेच्या पावन दिवशी भगवान श्री गणेश व देवी शारदा यांच्या शाही विवाहाचा मंगलोत्सव श्रीमंत दगडूशेठ गणेश मंदिरात अत्यंत भक्तिभावाने साजरा केला जातो. त्या दिवशी सनईच्या मंगल सूरावटीत आणि मंगलाष्टकांच्या गजरात संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झालेला असतो. विवाहवेदीवर श्री गणेश व देवी शारदा यांच्या मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात येतात. विविध प्रकारच्या स्वादिष्ट मिठाया तसेच पंचपक्वान्नांचा भक्तिभावाने नैवेद्य अर्पण करण्यात येतो. भगवान श्री गणेश व देवी शारदेला भरजरी वस्त्रांनी व मौल्यवान दागिन्यांनी अलंकृत केले जाते.











फुलांच्या मोहक माळा, तोरणे आणि प्रवेशद्वारी उभारलेले केळीचे खांब यांमुळे संपूर्ण आरास अत्यंत देखणी व आकर्षक दिसते. या प्रसंगी नवविवाहित वधू-वर देवी शारदा व भगवान श्री गणेश यांच्या मूर्ती हातात घेऊन आशीर्वचनाचा सोहळा साजरा करतात. 'शुभमंगल सावधान' या मंगलाष्टकांसह विवाह विधी विधिवत संपन्न होतो. ही परंपरा इतकी सुंदर व वैशिष्ट्यपूर्ण आहे की तिचे दर्शन घेण्यासाठी परदेशी नागरिकही आवर्जून उपस्थित राहतात. कारण अशा प्रकारचे अद्‌भुत विधी, सोहळे व सजावट इतरत्र पहावयास मिळत नाहीत.

गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण विवाह सोहळा अत्यंत शाही आणि विधिवत पद्धतीने पार पडतो. हा दिव्य सोहळा अनुभवण्यासाठी असंख्य भक्त उत्सुकतेने उपस्थित राहतात. नंतर श्री गणेश व देवी शारदेची भक्तिभावाने आरती केली जाते. या शाही विवाहानिमित्त केलेली फुलांची आकर्षक सजावट हीदेखील तितकीच वाखाणण्याजोगी असते.



# मानव सेवा उपक्रम

### वृक्षारोपण



वारीचा मार्ग, अष्टविनायकाची यात्रा वाट आणि महाराष्ट्रातील प्रमुख महामार्ग हिरव्या समृद्धीने नटावेत, या उद्देशाने 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट'तर्फे ५० लाख झाडांचे विक्रमी 'वृक्षारोपण अभियान' राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत अनेक ठिकाणी रोपांच्या संरक्षणासाठी जाळ्यांचीही व्यवस्था करण्यात आली.

वड, पिंपळ, चिंच, आंबा यांसारख्या दीर्घायुषी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली असून, राज्यातील रस्ते व महामार्गांच्या दुतर्फा हरित आवरण निर्माण करणे हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे.



विशेषतः पालखी मार्गावर तब्बल ५० हजार रोपांची लागवड करून या पवित्र वाटेला हिरवाईची भेट देण्यात आली आहे.

### जय गणेश आपत्ती निवारण अभियान



**चारा वाटप**

दुष्काळी परिस्थितीत केवळ तात्कालिक मदतीपुरते मर्यादित न राहता, दीर्घकालीन उपायांची गरज ओळखून 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट'तर्फे पुरंदर तालुक्यातील दहा गावांना दर्जेदार चाऱ्याचा पुरवठा करण्यात आला. गावकऱ्यांनीही या उपक्रमाकडे देवकार्य म्हणून पाहात, मनापासून साथ देत अभियान यशस्वी केले.

या अंतर्गत ऊस, हिरवी हुंडी आणि मका यांचा चारा जनावरांसाठी उपलब्ध करून देण्यात आला. त्याचबरोबर वनीकरण, ठिबक सिंचन यांसारख्या शाश्वत उपाययोजनांचीही आखणी करण्यात आली.

दुष्काळग्रस्त भागातील जनावरांसाठी ट्रस्टतर्फे दिला जाणारा मोफत चारा ही केवळ मदत नव्हे, तर त्यांच्या जगण्याचा एक महत्त्वाचा आधार ठरला आहे.



## निमगाव केतकी - गारपीटग्रस्त शेतमजुरांसाठी निवारा



इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी येथे गारपिटीने उद्ध्वस्त झालेल्या शेतमजुरांना 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट'तर्फे ३०० चौरस फुटांची पक्की घरे बांधून देण्यात आली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतमजूर बांधवांना केवळ चार भिंतींचा आधार मिळाला नाही, तर बाप्पांच्या कृपेने सुरक्षिततेचा आणि सन्मानाचा नवा आश्रय लाभला.

ही मदत केवळ घरांपुरती मर्यादित न राहता, त्यांच्या आयुष्यात जगण्याची नवी उमेद, आत्मविश्वास आणि स्थैर्य घेऊन आली. बाप्पांच्या कृपाकटाक्षाची साक्ष देत ट्रस्टने संकटाच्या गर्तेत सापडलेल्या कुटुंबांच्या आयुष्यात आशेचा तेजस्वी दीप प्रज्वलित केला आहे.



## मोफत रुग्णवाहिका सेवा



सन १९८९ मध्ये 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट'तर्फे पुणे महानगरपालिका हद्दीतील रुग्णांसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली. गरजूंना तातडीच्या वेळी वेळेवर वैद्यकीय मदत मिळावी, हा या सेवेमागील मुख्य उद्देश आहे.

पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांसाठी ही रुग्णवाहिका सेवा २४ तास पूर्णतः मोफत उपलब्ध आहे. तर या हद्दीबाहेरील नागरिकांना केवळ डिझेलचा खर्च करून या सेवेचा लाभ घेता येतो.

संपूर्ण वर्षभर १२ सुसज्ज रुग्णवाहिका या सेवेसाठी कार्यरत असून, हजारो रुग्णांसाठी ही सेवा जीव वाचवणारा आधार ठरली आहे. मानवतेच्या भावनेतून सुरू झालेली ही रुग्णवाहिका सेवा आजही निरंतरपणे समाजसेवेचे एक महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणून कार्यरत आहे.

## दुष्काळग्रस्त भागांसाठी जीवनदायी उपक्रम



### वॉटर टँकर सुविधा

दुष्काळग्रस्त भागांतील दैनंदिन पाण्याची तीव्र गरज लक्षात घेऊन 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट'तर्फे पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील वाड्या–वस्त्यांना दररोज सुमारे एक लाख लिटर मोफत पाणीपुरवठा करण्यात येतो. या उपक्रमामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असलेल्या कुटुंबांना दिलासा मिळतो.

याच टँकर सुविधेअंतर्गत वारी मार्ग, प्रमुख रस्ते व महामार्ग तसेच पालखी तळावर लावलेल्या झाडांना नियमितपणे पाणी दिले जाते, ज्यामुळे हरित उपक्रमही सातत्याने जपला जातो. या सेवेमुळे पुरंदर तालुक्यातील दुष्काळी भागात दररोज एक लाख लिटर मोफत पाणीपुरवठा करून ट्रस्टने माणूस, निसर्ग आणि श्रद्धेच्या मार्गाला समान न्याय देणारा आदर्श समाजोपयोगी उपक्रम उभा केला आहे.

दररोज १ लाख लिटर पाण्याचे वितरण ट्रस्टतर्फे करण्यात येते.

## जय गणेश जलसंवर्धन अभियान



### पथदर्शी उपक्रम

सन २०१५ मध्ये पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणातील गाळ काढण्याच्या कामाचा आरंभ 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट'ने ३५० गणेश मंडळांच्या सहकार्याने, ग्रीन थीमच्या कर्नल श्री. सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केला.

या उपक्रमात गाळनिर्मूलनासोबतच वृक्षारोपण, श्रमदान आणि जनजागृती अशी विविध कामे राबविण्यात आली. या प्रयत्नांमुळे धरणाची साठवण क्षमता वाढून पुणे शहराला सुमारे एक महिना पुरेल इतका अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध झाला. या अभिनव उपक्रमाची दखल घेत केंद्र शासनाने त्याला पथदर्शी उपक्रम म्हणून मान्यता दिली, ज्यामुळे देशभरातील अनेक धरणांमध्ये गाळ काढण्याचे उपक्रम सुरू झाले.

पुण्याला १ महिन्याचा अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध झाला.



## कौशल्यातून स्वयंपूर्णतेकडे



### औद्योगिक प्रशिक्षण केंद्र

ट्रस्टतर्फे ऑगस्ट २००४ मध्ये पुण्यातील कोंढवा येथे आयएसओ प्रमाणित औद्योगिक प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले. केंद्र व राज्य शासनाच्या मान्यतेने सुरू असलेले हे केंद्र ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांसाठी कौशल्याधारित शिक्षणाची संधी उपलब्ध करून देते.

या केंद्रात लघुउद्योगांसाठी आवश्यक असलेले सैद्धान्तिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाते. एका वेळी सुमारे १०० विद्यार्थ्यांची प्रशिक्षण व्यवस्था करण्यात आली असून, आजपर्यंत सुमारे २,००० विद्यार्थी स्वयंपूर्ण झाले आहेत.

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव, आधुनिक प्रशिक्षण पद्धती आणि उद्योगाभिमुख कौशल्ये मिळावीत, या उद्देशाने हे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सातत्याने कार्यरत असून रोजगारनिर्मितीचा एक प्रभावी आधार ठरले आहे.

## स्वप्नांना पंख देणारे



### यूपीएससी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा केंद्रीय प्रशासकीय सेवांमधील (UPSC) सहभाग वाढावा या उद्देशाने 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट' व 'ज्ञानदीप अकॅडमी' यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य यूपीएससी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

या उपक्रमाअंतर्गत प्रवेश परीक्षा व मुलाखतीद्वारे योग्य, होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांची निवड केली जाते. मराठी विद्यार्थ्यांना 'आयएएस', 'आयपीएस'सारख्या उच्च प्रशासकीय पदांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळावी आणि भविष्यात अनेक अधिकारी देशसेवेसाठी घडावेत, या उद्देशाने हा मार्गदर्शक उपक्रम राबविला जात आहे.



## श्रद्धेच्या वारीला आरोग्याची अखंड साथ



### आषाढी वारी वैद्यकीय सेवा

सन १९८९ पासून 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट'तर्फे आषाढी वारीच्या काळात वारकऱ्यांसाठी फिरते दवाखाने, तज्ज्ञ डॉक्टर, औषधे आणि रुग्णवाहिका सेवा सातत्याने उपलब्ध करून दिली जात आहे. डॉ. बाळासाहेब परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येतो.

आज संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि संत सोपानदेव महाराज यांच्या पालखी मार्गांवर ही सर्व वैद्यकीय सेवा पूर्णतः मोफत पुरवली जाते. यासोबतच वारकऱ्यांसाठी मोफत नेत्रतपासणी व चष्मेवाटपही करण्यात येते.

श्रद्धेच्या या पवित्र यात्रेला आरोग्याची भक्कम साथ देत, ट्रस्टची ही सेवा वारीतील लाखो वारकऱ्यांसाठी आधार आणि दिलासा ठरत आहे.



## वारीतील अन्नदानाची निःस्वार्थ सेवा



### जय गणेश अन्नदान सेवा

आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे पुण्यात मंदिराजवळ फुलांची उधळण करत आत्मीय स्वागत करण्यात येते. या भक्तिमय क्षणी वारकऱ्यांना प्रेमपूर्वक बुंदीचा प्रसाद वाटप केला जातो.

याशिवाय पुण्यातील मुक्कामाच्या दिवशी सकाळी सुमारे २०,००० वारकऱ्यांना नाश्ता वाटप करण्यात येते. तसेच वाल्दे येथे थांबलेल्या २५,००० वारकऱ्यांसाठी 'सुवर्णयुग तरुण मंडळा'ने अपार श्रद्धेने बाप्पांचा महाप्रसाद अर्पण करून त्यांच्या वारीला आत्मिक बळ दिले. ही अन्नदान सेवा ट्रस्टचे समाजाप्रती असलेले निःस्वार्थ प्रेम आणि भक्तिभावपूर्ण योगदान अधोरेखित करते.



## मानवतेची ओळख



### जय गणेश आपत्ती निवारण अभियान

पूर, भूकंप, दुष्काळ अशा विविध आपत्तींच्या काळात मानवतेची कास धरत 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट'ने मदतीचा हात सदैव पुढे केला आहे. कोयना व पानशेत भूकंप, लातूर-किल्लारी भूकंप, मोवाड पूर, तसेच कोकण, विदर्भ आणि आंबेगाव येथील संकटग्रस्त भागांमध्ये ट्रस्टने वेळेवर अन्न, पाणी, निवारा छावण्या व आर्थिक सहाय्य पोहोचवले.

आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री साहाय्यता निधीस ५१ लाख रुपयांचे योगदान देण्यात आले असून, कुपोषित आदिवासी बांधवांसाठीही विशेष मदत करण्यात आली. संकट कोणतेही असो, योग्य वेळी, योग्य ठिकाणी संवेदनशीलतेने मदत पोहोचवणे हीच ट्रस्टची ठाम ओळख ठरली आहे - आपत्तीग्रस्तांसाठी अन्न, वस्त्र आणि दिलासा देणारी मानवतावादी सेवा.

## शौर्य गौरव पुरस्कार



### शौर्याचा गौरव, कृतज्ञतेचा उत्सव

देश व समाजाच्या सुरक्षिततेसाठी अविरत झटणे हेच खरे शौर्य असल्याची जाणीव ठेवून श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टने देशासाठी बलिदान देणाऱ्या जवानांना सदैव आपले मानले आहे. २०१० साली ट्रस्टच्या उपक्रमातील मुलांनी जवानांना राख्या पाठवून कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

'मराठा बटालियन'च्या २०० हुतात्मा जवानांच्या वीरमाता व वीरपत्नींना प्रत्येकी २५,००० रुपये, साडी-चोळी आणि 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या उपक्रमातून सैनिक आणि ट्रस्ट यांच्यात स्नेह, आदर आणि कृतज्ञतेचा सेतू निर्माण झाला असून तो आजही तितकाच दृढ आहे.

हा उपक्रम केवळ सन्मानाचा नव्हे, तर एक सुसंवेदनशील आणि कृतज्ञ समाज घडवण्याच्या प्रेरणादायी प्रवासाचा साक्षीदार ठरला आहे.



हुतात्मा जवानांच्या वीरमाता व वीरपत्नींना प्रत्येकी २५,००० रुपये व साडी-चोळी देऊन सन्मानित करण्यात येते.

## पोलिओ निर्मूलन अभियान



### लस देई जीवनाचा आधार

सन १९८९–९० मधील रोगराईनंतर ग्रामीण भागातील पोलिओ निर्मूलनासाठी 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट' पुढाकार घेऊन उभा राहिला. पुणे जिल्ह्यात सुमारे १८ वर्षे ट्रस्टतर्फे या पोलिओ निर्मूलन अभियानात सातत्याने मोलाचे योगदान दिले गेले आहे. शासनाची वाहने पोहोचू न शकणाऱ्या दुर्गम व डोंगराळ भागांमध्ये लसीकरण पोहोचावे यासाठी ट्रस्टतर्फे 'टाटा ६०८' वाहन उपलब्ध करून देण्यात आले.

भीमाशंकर, जुन्नर, खेड, पानशेत अशा अतिदुर्गम भागांपर्यंत ही सेवा प्रभावीपणे पोहोचली. ट्रस्टच्या या सक्रिय सहकार्यामुळे पोलिओ निर्मूलन मोहिमेचे यश ५० टक्क्यांवरून ९५ टक्क्यांपर्यंत वाढले. हजारो आदिवासी व शेतमजुरांच्या बालकांसाठी ही मोहीम जीवनदायी ठरली.



## कुष्ठरोगी आत्मनिर्भर केंद्र



### कौशल्यातून आत्मनिर्भरता

पुण्यातील येवलेवाडी येथील 'डॉ. जाल मेहता मेमोरियल अपंग द्वार औद्योगिक सहकारी संस्थे'ला 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट'ने सुमारे ६० लाख रुपयांची देणगी दिली. या केंद्रात टाटा ट्रकचे पार्ट्स तयार करणे तसेच 'ससून' व 'येरवडा मेंटल हॉस्पिटल'साठी बँडेज बनवण्याचे काम सुरू होते.

ट्रस्टच्या मदतीमुळे फॅक्टरी पुन्हा सुरु झाली आणि सुमारे ३०० कुटुंबे आत्मनिर्भर बनली आहेत. या उपक्रमामुळे सामाजिक व आर्थिक स्वावलंबनाला मोठा आधार मिळाला आहे.





## भक्तीचा सुवर्णस्पर्श

**- दाजीकाका गाडगीळ**

दाजीकाका गाडगीळ आणि पु. ना. गाडगीळ यांनी या गणपतीच्या दागिन्यांना केवळ घडवले नाही, तर भक्तीने साकारले; गणपती व तात्यांविषयीचं दाजीकाकांच प्रेम त्यांच्या प्रत्येक शब्दातून उमटत होतं.



'दगडूशेठ हलवाई गणपतीचे दागिने आपण बनवून द्या', असा निरोप घेऊन त्या वेळचे खासदार विठ्ठलराव गाडगीळ आमच्याकडे आले होते. तेव्हापासून या गणपतीचे कान, शुंड हारापासून पितांबरापर्यंतचे सगळे दागिने आम्हीच करून दिले आहेत. तोच तर आम्हाला देणारा आहे. सेवा म्हणूनच आम्ही ही कामं केली. त्या गणपतीच्या कृपेने आमचं सगळं व्यवस्थित चालू आहे. तात्या गोडसे म्हणजे फार मोठे गणपती भक्त. त्यांची कीर्ती फार मोठी होती. वैयक्तिक त्यांच्याविषयी मला फार आदर होता. मी त्यांना गमतीने म्हणायचो - तात्या, तुम्ही काही कारणानं आजारी पडलात आणि डॉक्टरांनी तुमचा एक्स-रे काढला तर त्यात त्यांना फक्त गणपतीच दिसेल! भक्तांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या सोन्या चांदीतूनच बाप्पांना हे अलंकार केले जातात, भक्तांच्या भावनेचा हा सर्वोच्च गौरव आहे असे यातून दिसते.

# ॥ गणेशोत्सव ॥
## (भाद्रपद शुद्ध चतुर्थी – अनंत चतुर्दशी)



महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक जीवनात गणेशोत्सव हा केवळ एक उत्सव नाही, तर श्रद्धेचे, समर्पणाचे आणि सामूहिक चेतनेचे जिवंत प्रतीक आहे. पुण्यासारख्या पुण्यनगरीत तर या उत्सवाची अनुभूती अधिकच गहिऱ्या भावविश्वात घेऊन जाते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचा गणेशोत्सव हा फक्त शहरापुरता मर्यादित न राहता, देश-विदेशात श्रद्धा, शिस्त, सेवाभाव आणि व्यवस्थापनाचा आदर्श म्हणून ओळखला जातो. या दिव्य उत्सवाची तयारी प्रत्यक्ष मूर्ती येण्याच्या कित्येक दिवस आधीच सुरू होते. प्रत्येक क्षणात एक तपश्चर्या असते, प्रत्येक निर्णयात दूरदृष्टी आणि प्रत्येक कृतीत भक्तिभाव दडलेला असतो.



ज्या मंडपात पुढील दहा दिवस कोटी कोटी भक्तांचे मन, मनोभाव आणि प्रार्थना एकवटणार असतात, त्या मंडपाचे विधिवत भूमिपूजन होताच वातावरण पावित्र्याने भारून जाते.

पूजेच्या मंगलमूर्तीचे सजावट केलेल्या रथामधून वाजत-गाजत, मंगलवाद्यांच्या निनादात आगमन होते, आणि त्या क्षणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारा आनंद हा शब्दांच्या पलीकडचा अनुभव ठरतो.

भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या शुभप्रभाती श्री गणरायांची प्रतिष्ठापना होते. दरवर्षी परंपरेनुसार एखाद्या आध्यात्मिक अधिकारी व्यक्तीच्या हस्ते हा मंगल विधी पार पडतो. त्या क्षणी उपस्थित असलेल्या प्रत्येक भक्ताच्या अंतःकरणात बाप्पा स्वतः विराजमान झाल्याची भावना असते. समाजात शांतता, सुव्यवस्था, एकात्मता आणि सद्भावना नांदावी, या उदात्त संकल्पाने प्रार्थना केली जाते आणि गणरायांचे दर्शन भक्तांसाठी खुले होते.





## ॥ अथर्वशीर्ष पठण ॥ (उत्सवाचा दुसरा दिवस – ऋषिपंचमी)

स्त्रियांचा उत्सावातील सहभाग जास्तीत जास्त वाढावा या संकल्पनेतून इ.स. १९८७ पासून स्त्रियांसाठी आयोजित करण्यात येणारं "सामूहिक अथर्वशीर्ष पठण" म्हणजे श्रद्धेचा महासागरच जणू. हजारो स्त्रियांनी एकत्र म्हंटलेली आवर्तने वातावरण मंत्रमुग्ध करतात. २०२५ मध्ये तब्बल ३५ हजार स्त्रियांनी या पवित्र सोहळ्यात सहभाग घेतला होता, ही बाबच या उपक्रमाच्या आध्यात्मिक प्रभावाची साक्ष देते. हा एक अद्भुत सोहळा म्हणून संबोधला जातो.

ऋषिपंचमीची पहाट उजाडण्याआधीच पुण्यनगरीत एक अदृश्य परंतु विलक्षण शक्ती जागी होते. मध्यरात्री दोन पासूनच पारंपरिक वेषात सजलेल्या महिला शांत पावलांनी, पण ठाम श्रद्धेने या पवित्र साधनेसाठी एकत्र येऊ लागतात. हा जमाव नसतो-ती एक अखंड साधना असते, ज्यात हजारो अंतःकरणे एकाच लयीत धडकू लागतात. "ॐ गं गणपतये नमः"चा गजर जेव्हा अथर्वशीर्षाच्या मंत्रोच्चारांत विलीन होतो, तेव्हा आसमंत भारून जाते. त्या क्षणी स्त्री केवळ भक्त न राहता, साधिका बनते-शब्द, श्वास आणि श्रद्धा यांचे एकरूप होत चाललेले ध्यान साकार होते. सामूहिक "अथर्वशीर्ष पठणा"चा नाद वातावरणात घुमू लागतो आणि त्या दिव्य कंपनात स्त्रीशक्तीचा जागर आपोआप घडून येतो.

प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावर एक विलक्षण तेज झळकलेले असते. ते सौंदर्य बाह्य नसून अंतःकरणातून प्रकटलेले असते. गणेश नामाच्या अखंड जपात डोळ्यांत भक्ती, ओठांवर मंत्र आणि मनात निःस्वार्थ प्रार्थना असते. हा उत्साह क्षणिक नसून, तो आत्मिक समाधान देणारा असतो.





या अनुपम साधनेची दखल "इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्ड"ने घेतली आणि डॉक्टर दीपक हरके यांच्या हस्ते या पवित्र उपक्रमाला प्रमाणपत्र प्राप्त झाले. मात्र या साधनेचे खरे प्रमाणपत्र प्रत्येक स्त्रीच्या अंतःकरणात उमटलेले शांतीचे भाव असतात.

दगडूशेठ गणपतीच्या उत्सव मंडपापासून नाना वाड्यापर्यंतचा परिसर जणू एक विशाल यज्ञकुंड बनतो- ज्यात हजारो स्त्रिया आपल्या श्रद्धेची आहुती अर्पण करतात. भक्तिरसात न्हालेल्या वातावरणात जेव्हा आरतीने सांगता होते, तेव्हा काळ जणू थांबून जातो; अंगावर शहारे येतात आणि डोळे आपसूकच पाणावतात.

पुण्यासह मुंबई, लातूर, कोल्हापूर, नाशिक, कोकण तसेच महाराष्ट्राच्या विविध भागांतून सहभागी झालेल्या महिलांची लक्षणीय उपस्थिती या साधनेचा व्यापक आध्यात्मिक विस्तार अधोरेखित करते. स्त्रीशक्तीच्या अखंड उपासनेचा हा उपक्रम गेली अनेक वर्षे अविरत सुरू असून, दरवर्षी हा जागर अधिक सखोल, अधिक तेजस्वी आणि अधिक दिव्य होत जात असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

प्रत्येक कृतीमागे बुद्धी आणि विचारशक्ती असते. आपण करीत असलेले प्रत्येक कार्य बुद्धिपूर्वक व सजगतेने व्हावे, हीच या साधनेची शिकवण आहे. बदलत्या बाह्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महिलांनी आपली आंतरिक शक्ती जागृत करणे अत्यावश्यक झाले आहे. म्हणूनच हा उपक्रम देश-विदेशात प्रशंसनीय मानला जातो.



**गणेशयाग**

या दहा दिवसांत गणेशयागासह अनेक धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. उत्सव मंडपात श्रींच्या प्रतिष्ठापनेनंतर गणेशयागाला सुरुवात होते. आपल्या पारंपरिक पद्धतीने आणि दाक्षिणात्य पद्धतीने गणेशयाग केले जातात.



**ब्रह्मणस्पती सूक्त अभिषेक**

भगवान गणेशांना अत्यंत प्रिय असलेल्या ब्रह्मणस्पती सूक्ताने बाप्पाचा अभिषेक करण्याची परंपरा आहे. उत्सव काळात दहा दिवस दररोज पहाटे, पूजेच्या मूर्तीसमोर वेदमूर्ती धनंजय घाटगे गुरुजी व त्यांच्या सहकाऱ्यांकडून हा अभिषेक विधी भक्तिभावाने संपन्न होतो.



**अभिषेक**

उत्सव मंडपात दहा दिवस दररोज पहाटेपासून संध्याकाळपर्यंत बाप्पांसाठी अभिषेक केले जातात.

या दहा दिवसांत गणेशयागासह अनेक धार्मिक व आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. लहान मुलांसाठी सूर्यनमस्कार व अथर्वशीर्ष पठण, ज्येष्ठांसाठी अग्निहोत्राचे प्रात्यक्षिक व त्याचे महत्त्व, तसेच विविध धार्मिक व आध्यात्मिक विषयांवरील कार्यक्रमांतून समाजप्रबोधनाचा दीप प्रज्वलित केला जातो. भक्ती ही केवळ पूजा नसून ती जीवनपद्धती व्हावी, हाच या सर्व उपक्रमांचा मूळ उद्देश असतो.

## अथर्वशीर्ष पठण

लहानपणापासून अथर्वशीर्ष पठणाची सवय रुजावी, या उद्देशाने गणेशोत्सवात दहा दिवस शालेय विद्यार्थी भक्तिभावाने अथर्वशीर्षाचे पठण करतात. या मंत्रोच्चारांमुळे एकाग्रता, स्मरणशक्ती आणि बुद्धीचा विकास होतो. गणेशभक्त राजेशजी सावला यांच्या सहकार्याने मनोभावे विद्यार्थ्यांना दहाही दिवस प्रसादाचे वितरण केले जाते.





## सूर्यनमस्कार

सूर्यनमस्कार हा आपल्या सांस्कृतिक वारशातील सर्वांगपूर्ण आणि शास्त्रशुद्ध व्यायाम आहे. या साधनेतून शरीर, श्वास आणि मन यांचा सुंदर समन्वय साधला जातो. सूर्यनमस्काराची ही गौरवशाली परंपरा टिकून राहावी आणि तिचे आरोग्यदायी महत्त्व नव्या पिढीला उमगावे यासाठी शेकडो शालेय विद्यार्थ्यांकडून भक्तिभावाने सूर्यनमस्कार घालून घेतले जातात.





## अग्निहोत्र



आपल्या वैदिक व सांस्कृतिक परंपरेत सकाळ आणि संध्याकाळ अग्निहोत्र करण्याला अत्यंत पवित्र व महत्त्वाचे स्थान आहे. अग्नीला नारायणाचे प्रतीक मानून त्यात दिल्या जाणाऱ्या आहुती केवळ धार्मिक विधी नसून, त्या पर्यावरणशुद्धी, मानसिक प्रसन्नता आणि आत्मिक उन्नतीचे साधन आहेत. मंत्रोच्चारांसह केलेल्या अग्निहोत्रामुळे वातावरणातील नकारात्मकता दूर होते आणि परिसर सात्विक, शुद्ध व ऊर्जायुक्त बनतो, अशी श्रद्धा आणि अनुभव आहे.या महान परंपरेचे महत्त्व आजच्या पिढीपर्यंत पोहोचावे आणि तिचा आध्यात्मिक व सांस्कृतिक आशय लोकांना समजावा, यासाठी उत्सवाच्या काळात अग्निहोत्राचे सजीव प्रात्यक्षिक सादर केले जाते. या प्रात्यक्षिकातून प्राचीन ऋषीपरंपरेची वैज्ञानिक दृष्टी, निसर्गाशी असलेले आपले नाते आणि आध्यात्मिक साधनेचे मोल अधोरेखित होते. अग्नी, मंत्र आणि श्रद्धा यांचा हा संगम संपूर्ण वातावरणात शांती, पवित्रता आणि दिव्य अनुभूती निर्माण करतो.



## श्री मोरया गोसावी पालखीचे भावपूर्ण स्वागत



श्री मोरया गोसावी हे विनायकी चतुर्थीला मोरगावला दर्शनासाठी जात असत. एकदा मयूरेश्वरांनी त्यांना दृष्टान्त देऊन सांगितले की आता तुझे कष्ट पाहवत नाहीत, म्हणून मीच तुझ्या घरी येईन. त्या दृष्टान्तानुसार चिंचवड येथील गणेश कुंडात प्रति मयूरेश्वर (श्री मंगलमूर्ती) प्राप्त झाली आणि ती मूर्ती श्री मोरया गोसावी यांनी आपल्या वाड्यात स्थापन केली. तेव्हापासून माघ व भाद्रपद महिन्यात ही मूर्ती पालखीतून मोरगावला श्री मयूरेश्वराच्या भेटीस जाते. भाद्रपदातील ही पवित्र पालखी परंपरा परतीच्या प्रवासात दरवर्षी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती उत्सव मंडपात येते आणि हा सोहळा अत्यंत भावपूर्ण व अनुभवण्यासारखा ठरतो.







## गंगा आरती

वाराणसी तसेच गंगेच्या पवित्र घाटांवर दररोज सायंकाळी होणारा गंगा आरतीचा भव्य, दिव्य आणि भावस्पर्शी सोहळा हा केवळ एक धार्मिक विधी नसून, तो आत्मिक शुद्धी, भक्ती आणि परंपरेचा सजीव अनुभव आहे.

मंत्रोच्चार, शंखनाद, दीपांच्या रांगा आणि लयबद्ध हालचालींमुळे संपूर्ण परिसर श्रद्धा व शांततेने भारून जातो. दूरदूरहून येणाऱ्या भाविकांसाठी हा सोहळा एक अविस्मरणीय आध्यात्मिक आकर्षण ठरतो.

या पवित्र परंपरेचे संवाहक असलेले, वाराणसी येथे नियमितपणे गंगा आरती करणारे हिमांशू शुक्ला आणि त्यांचे सहकारी दरवर्षी उत्सवाच्या निमित्ताने मंडपात उपस्थित राहतात.



ते येथे अत्यंत शिस्तबद्ध, भक्तिभावपूर्ण आणि वैदिक परंपरेनुसार गंगा आरती सादर करतात. या आरतीमुळे जणू गंगेचे पावित्र्य आणि वाराणसीचे आध्यात्मिक तेज मंडपात अवतरते. दीपज्योतींचा प्रकाश, मंत्रांचा नाद आणि भक्तांचा भाव यांचा संगम होऊन संपूर्ण वातावरण शांत, पवित्र आणि दिव्य अनुभूतीने भारून जाते.



### मंत्रजागर / सत्यविनायक पूजा

वेदऋचांचे पठण ऐकल्याने देवदेवतांना आनंद मिळतो, त्यामुळे शुभ किंवा मंगल प्रसंगी ब्रह्मवृंदांकडून मंत्रजागर करण्याची प्राचीन परंपरा आहे. उत्सवाच्या काळात मंडपात भक्तिभावपूर्ण मंत्रजागर आयोजित केले जाते.सत्यविनायक पूजन हे गणेशाची उपासना व व्रत मानले जाते. जसे विष्णूंसाठी सत्यनारायण पूजन केले जाते, तसेच गणेशासाठी सत्यविनायक पूजन केले जाते. गणेशभक्तांमध्ये या पूजेला अधिक प्रसार मिळावा यासाठी मंडपात भाविकांसाठी सत्यविनायक पूजनाची सोय करण्यात आलेली आहे.



### महाआरती

उत्सवकाळातील दररोज सायंकाळची महाआरती ही एक अलौकिक आणि आत्मस्पर्शी अनुभूती असते. हजारोंच्या उपस्थितीत सुरू होणारी ही आरती काही क्षणांतच लाखो भाविकांच्या अंतःकरणात मिसळते. रस्ते, चौक आणि गल्ल्या भक्तांनी गजबजलेले दिसतात. “सुखकर्ता दुःखहर्ता” या गजराच्या स्वरांनी डोळे अश्रूंनी ओले होतात - हा क्षण व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडतात; तो फक्त अनुभवायचा आणि अंतःकरणात जतन करायचा क्षण असतो.






श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्व. गणपती ट्रस्ट, पुणे
सुवर्णयुग तरुण मंडळ
सर्व गणेश भक्तांचे सहर्ष स्वागत
जय गणेश
जय गणेश



## श्रद्धा आणि शौर्याचा संगम

'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट' तर्फे दरवर्षी गणेशोत्सवात देशरक्षणासाठी सीमारेषेवर अहोरात्र तैनात असलेल्या जवानांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना दगडूशेठ गणपतीच्या दर्शनासाठी विशेष निमंत्रण दिले जाते. 'Indian Army Southern Command' चे अधिकारी व सैनिक आपल्या परिवारासह मनोभावे उपस्थित राहून या पवित्र सोहळ्यात सहभागी होतात. तेव्हा देशाच्या रक्षणासाठी मनोभावे प्रार्थना करण्यात येते.

या प्रसंगी भक्तिभावपूर्ण वातावरणात सर्वांच्यातर्फे आरती संपन्न होते. देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या जवानांसमवेत आराध्यदैवताची आरती करण्याचा हा क्षण अत्यंत हृदयस्पर्शी ठरतो. देशभक्तीची भावना दृढ करण्यासाठी ट्रस्टचा हा उपक्रम वर्षानुवर्षे सातत्याने राबविला जात असून, यामुळे ट्रस्ट आणि सैन्यदलातील जवानांमधील अतूट नातेसंबंध अधिक दृढ होताना दिसतात.

## भक्ती, सन्मान आणि सुरक्षिततेची प्रार्थना

दरवर्षी गणेशोत्सवात एक दिवस Shreemant Dagdusheth Halwai Ganpati यांच्या दर्शन व आरतीचा मान तृतीयपंथी किन्नरांना सन्मानपूर्वक दिला जातो. समाजात त्यांनाही मानाचे स्थान मिळावे, या भावनेतून ही परंपरा जपली जाते. पुराणांमध्येही यक्ष-किन्नरांच्या पूजेचा उल्लेख आढळतो.विविध अलंकारांनी सजलेले आणि पारंपरिक वेशभूषेत नटलेले किन्नर अत्यंत भक्तिभावाने गणरायाचे दर्शन घेत आरती करतात. त्या वेळी देशातील महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी तसेच समाजातील प्रत्येक स्त्रीला संरक्षण व सन्मान लाभावा, अशी अंतःकरणपूर्वक प्रार्थना बाप्पाच्या चरणी केली जाते.यासोबतच, हा आरतीचा मान भविष्यातही अखंडपणे लाभत राहावा, अशी विनम्र प्रार्थना किन्नर परिवाराकडून गणरायाकडे केली जाते.



## ॥ अनंत चतुर्दशी ॥

हे दहा दिवस कसे सरून जातात, ते कळतही नाही. अनंत चतुर्दशी उजाडते आणि कार्यकर्त्यांच्या मनात एक अनामिक हुरहुर दाटून येते.





विसर्जनासाठी श्रींची मूर्ती विशेष सजवलेल्या रथावर विराजमान होते.





"गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या..." या गजरात आसमंत भरून जातो आणि अत्यंत भावविवश वातावरणात विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ होतो. लाडक्या बाप्पाचे विसर्जनपूर्व दर्शन घेण्यासाठी मार्गाच्या दुतर्फा लाखो भक्त उभे असतात - कोणी गच्चीवर, कोणी छतावर, तर कोणी झाडांवर.







केवळ एका क्षणाचे दर्शन मिळाले तरी जीवन धन्य झाल्याची भावना प्रत्येकाच्या मनात उमटते. भक्तांचे नमस्कार स्वीकारत, त्यांच्या डोळ्यांतले अश्रू पाहत ही मिरवणूक विसर्जनस्थळी पोहोचते आणि अत्यंत भावुक अंतःकरणाने पूजेच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते.



मूर्ती एकदा मंडपाबाहेर गेल्यावर, आतले वातावरण इतके शांत आणि गंभीर होते की ते अक्षरशः निस्तेज वाटू लागते. जिथून बाहेर पडू नये असे वाटत होते, तिथेच एक अनामिक पोकळी निर्माण होते - पण त्याच पोकळीत पुढील वर्षी पुन्हा बाप्पाच्या आगमनाची आशा रुजलेली असते.

या गणेशोत्सवानिमित्त मंडळातर्फे आयोजित करण्यात येणारे सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक उपक्रम हे या उत्सवाचे आत्मस्वरूप आहेत. भक्तीबरोबरच समाजघडण, संस्कार, सेवा आणि एकात्मतेचा संदेश देणारा हा गणेशोत्सव म्हणजे श्रद्धेचा महोत्सव, संस्कृतीचा उत्सव आणि आत्मिक उन्नतीचा मार्ग आहे.

# मातीतून माणुसकीपर्यंत

दुसऱ्यांसाठी सुंदर घरे आणि भव्य इमारती उभारताना जे लोक दिवस-रात्र काबाडकष्ट करून विटा घडवत होते, त्यांच्याच डोक्यावर स्वतःचं छप्पर नव्हतं.

हे अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायक सत्य होतं. वीटभट्टीवरील कामगारांना अत्यंत अपमानास्पद वागणूक मिळत असे. वेळेवर मजुरी दिली जात नसे, पाणी तोडलं जात असे. अन्यायाची ही साखळी रोज त्यांच्या आयुष्यावर कोसळत होती.

हे सर्व प्रत्यक्ष पाहून शंकरराव मडके व आमचे तत्कालीन विश्वस्त अप्पा (मुरलीधर लोंढे) यांच्या मनात या कामगारांचे आयुष्य बदलण्याचा विचार पक्का झाला व दोघेजण त्या दिशेने मार्गस्थ झाले. एक निष्ठावंत गणेशभक्त म्हणून शंकरराव मडके नेहमी दगडूशेठ गणपतीच्या दर्शनासाठी येत असत. या निमित्ताने त्यांची तात्या, आप्पा सूर्यवंशी आणि मामा रासने यांच्याशी घनिष्ट ओळख होती. त्यांनी ही व्यथा थेट त्यांच्या कानावर घालण्याचा निर्णय घेतला.

कामगार ज्या झोपडपट्टीत राहत होते, त्या जागी त्यांना पक्की घरे मिळावीत, यासाठी आपल्या 'सुवर्णयुग बँके'तर्फे कर्जाची योजना करून त्यांना मदत करावी असा प्रस्ताव या ट्रस्टच्या समोर मांडण्यात आला. परंतु सर्वसाधारण विचार करता असं लक्षात आलं की कर्जाची ही रक्कम ते बिचारे कामगार कसे परत करू शकतील? कारण त्या कामगारांचा पगार किती? त्यांच्या हातात किती पैसे येत असतील? ते व्याजासकट कसे कर्ज फेडणार?

तेव्हाच एक अत्यंत उदात्त निर्णय घेण्यात आला. तो असा -

"कर्जाची काळजी करू नका. आम्हीच सगळं उभं करू. तुम्हाला केवळ एवढंच करायचं आहे व ते म्हणजे या गृहसंकुलाचं नाव 'गणपती नगर' ठेवावं" लागेल.

तो क्षण जणू वीटभट्टी कामगारांसाठी देवाचं दार उघडणारा ठरला. तात्या, आप्पा सूर्यवंशी आणि मामा रासने या व्यक्ती त्यांच्यासाठी देवदूतच ठरले, कारण कोणतीही स्वार्थी अपेक्षा नाही, प्रसिद्धीची आकांक्षा नाही - फक्त माणुसकीचा दरवळणारा सुगंध त्या मधे होता.

हे कार्य सोपं नव्हतं. मडकेकाकांनी अपार कष्ट घेत परवानग्या, कागदपत्रे आणि शासकीय प्रक्रिया पूर्ण केल्या. अखेर एका छोट्या स्वप्नाचं भव्य वास्तवात रूपांतर झालं. काही काळातच 'गणपती नगर' नावाचं सुंदर, टुमदार गृहसंकुल आकाराला आलं.



गणपती नगरातील घरांचं हस्तांतर तत्कालीन मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.





आणि त्यानंतर खऱ्या अर्थाने परिवर्तन घडलं. आता त्या वस्तीतील अनेक मुलं उच्च शिक्षण घेत आहेत. कित्येकांनी स्वतःचे व्यवसाय सुरू केले आहेत. कित्येकजण सन्मानाच्या जागांवर नोकरी करत आहेत.

याच 'गणपती नगर'मधील अमर चव्हाण आज स्वतःची जाहिरात कंपनी चालवत असून पाच-सहा लोकांना रोजगार देत आहे. हीच खरी समाजपरिवर्तनाची फलश्रुती आहे.

आज त्या वस्तीतील प्रत्येक हसरा चेहरा हा या कार्याचा खरा पुरस्कार आहे. आणि जेव्हा हे चेहरे पाहिले जातात, तेव्हा छाती अभिमानाने फुलत नाही - तर मन कृतज्ञतेने नतमस्तक होतं.

ही कहाणी केवळ घरांची नाही, ही माणुसकीची आहे. कारण ज्यांच्या हातांनी इतरांचे संसार उभे राहत होते, त्यांच्या आयुष्याला उभारी देणं हेच या कार्याचं खरं यश आहे.





# उत्सव व्यवस्थापन



उत्सव व्यवस्थापनाचा आदर्श म्हणून आज देश-विदेशात ओळखला जाणारा श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणेशोत्सव म्हणजे खऱ्या अर्थाने एक अद्वितीय सोहळा म्हणावा लागेल. या भव्य आणि यशस्वी उत्सवामागे असलेल्या नियोजनबद्ध व्यवस्थापनाच्या काही महत्त्वाच्या पैलूंवर नजर टाकूया.

दरवर्षी ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात साजऱ्या होणाऱ्या या उत्सवाची तयारी कित्येक महिने आधीच सुरू होते. विश्वस्त मंडळ आणि उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या जातात. या बैठकींत विविध विषयांसाठी जबाबदार सदस्यांची नियुक्ती केली जाते. ठरावीक कामांची संपूर्ण जबाबदारी सदस्यांकडे दिल्यामुळे गोंधळाला फारसा वाव राहत नाही.

सुरक्षा व्यवस्था, सजावट, सांस्कृतिक कार्यक्रमांची आखणी, प्रसाद वाटप, वर्गणी व देणग्यांचे नियोजन, दैनंदिन पूजाअर्चा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भक्तांच्या गर्दीचे नियोजन, या सर्व बाबी अत्यंत काटेकोरपणे हाताळल्या जातात.



उत्सव काळातील गर्दीचे व वाहतूक कोंडीचे नियोजन हे सर्वांत आव्हानात्मक काम असते. दहा दिवसांच्या कालावधीत सुमारे दीड ते दोन कोटी भक्त श्रींच्या दर्शनासाठी येतात-म्हणजेच रोज साधारण १५-२० लाख भाविक दर्शन घेतात. इतक्या प्रचंड जनसमुदायाचे नियंत्रण करणे हे अत्यंत कठीण काम असले तरी कार्यकर्ते, पोलीस प्रशासन आणि विविध सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक एकत्रितपणे हे कार्य यशस्वीरीत्या पार पाडतात.

दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भक्तांना कमीतकमी त्रास होईल, लवकर आणि सुलभ दर्शन मिळेल व समाधानाने ते बाहेर पडतील - हा एकमेव ध्यास घेऊन ही कार्यकर्त्यांची फौज सतत कार्यरत असते. हीच मंडळाची बाह्य ओळख असल्याने, कार्यकर्त्यांना भक्तांशी कसे वागावे, कसे बोलावे आणि कशी मदत करावी याचे विशेष प्रशिक्षण दिले जाते. एकदा उत्सव सुरू झाला की अनेक कार्यकर्ते सलग दहा दिवस अहोरात्र सेवेत कार्यरत असतात. ऋषिपंचमीच्या दिवशी होणाऱ्या अथर्वशीर्षाच्या सामूहिक पठणापासून ते प्रत्येक धार्मिक विधीपर्यंत प्रत्येक गोष्ट पूर्वनियोजित असते. या सर्वांसाठी आवश्यक असणाऱ्या विविध परवानग्या- पोलीस प्रशासन, अग्निशमन विभाग, पुणे महानगरपालिका तसेच वीज वापरासाठी लागणाऱ्या विशेष परवानग्या - यांचे संपूर्ण कागदोपत्री नियोजन आधीच केले जाते.

उत्सव काळात कोणतीही आपत्ती किंवा वैद्यकीय आणीबाणी उद्भवू नये, तसेच उद्भवल्यास तात्काळ मदत मिळावी, यासाठी विशेष प्रशिक्षित कार्यकर्त्यांची पथके सज्ज असतात. मंदिर परिसरात अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज असा 'अति दक्षता विभाग' उभारण्यात येतो. व्हेंटिलेटरसह आवश्यक सर्व उपकरणे तसेच डॉक्टर आणि परिचारिका २४ तास उपलब्ध असतात. परिस्थिती गंभीर झाल्यास तात्काळ रुग्णवाहिकांच्या माध्यमातून रुग्णांना रुग्णालयात नेण्याचीही पूर्ण व्यवस्था सज्ज असते. इतक्या मोठ्या उत्सवासाठी अर्थसाहाय्य लागते. त्यामुळे प्रायोजकांशी संवाद, भेटीगाठी आणि बैठकांची प्रक्रिया देखील तयारीच्या टप्प्यातच सुरू होते.

आगमन आणि विसर्जन सोहळ्यासाठी स्वतंत्र समिती कार्यरत असते. मिरवणुकीतील रथाची निर्मिती, ढोल-ताशा पथकांचे नियोजन, झेंडे, कार्यकर्त्यांचा गणवेश व फेटे, विद्युत रोषणाई तसेच वीजनिर्मितीसाठी लागणाऱ्या वाहनांची व्यवस्था या सर्व बाबींचा सखोल विचार करूनच नियोजन केले जाते, जेणेकरून प्रत्येक सोहळा निर्विघ्नपणे पार पडेल.



विश्वस्त आणि कार्यकर्त्यांच्या दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण म्हणजे नारळ वाहतुकीसाठी उभारण्यात आलेली स्वयंचलित कन्व्हेअर बेल्ट व्यवस्था. भक्त मकरंद सावगावकर यांच्या सहकार्याने ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. श्रींच्या चरणी अर्पण केलेला नारळ अवघ्या १० ते १५ सेकंदांत या बेल्टवरून मागील गेटपर्यंत पोहोचतो आणि थेट मालवाहू वाहनात भरला जातो.

पूर्वी नारळांचे ढीग छतापर्यंत साचत असत, त्यामुळे जागेची कमतरता आणि व्यवस्थापनातील अडचणी निर्माण होत होत्या. मात्र या स्वयंचलित यंत्रणेमुळे संपूर्ण प्रक्रिया सुकर, शिस्तबद्ध आणि वेगवान झाली आहे. गणेशोत्सव काळात लाखो नारळ अर्पण होत असतानाही दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना कोणताही त्रास होत नाही, उलट सुव्यवस्थेमुळे त्यांना समाधान व सात्त्विक अनुभूती मिळते.

इतक्या विशाल व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेली सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रीमंत दगडूशेठ गणपतीचा आशीर्वाद. प्रत्येक निर्णयासाठी लागणारी बुद्धी आणि प्रत्येक कार्यासाठी मिळणारी ऊर्जा ही गणरायाच देत आहे, असा दृढ विश्वास आमच्या सर्व कार्यकर्त्यांच्या मनात असतो.

अशा अत्यंत शिस्तबद्ध नियोजनाची, अढळ संघटनशक्तीची आणि निःस्वार्थ भक्तिभावाची सांगड घालून उभा राहिलेला श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता, तो आज मूल्यांवर उभ्या असलेल्या व्यवस्थापनाचा तेजस्वी आदर्श बनला आहे. येथे प्रत्येक निर्णयामागे दूरदृष्टी आहे, प्रत्येक व्यवस्थेमागे अनुभव आहे आणि प्रत्येक कृतीमागे गणरायाच्या चरणी अर्पण केलेली खरी सेवा आहे.

लाखो भक्तांच्या श्रद्धेला सामावून घेताना कुठेही गोंधळ, अस्थिरता किंवा अहंकार दिसत नाही-दिसते ते केवळ शिस्त, समन्वय आणि सेवाभाव. कार्यकर्त्यांसाठी हा उत्सव 'काम' नसून एक व्रत आहे; थकवा जाणवत नाही, कारण प्रत्येक क्षण भक्तांच्या समाधानात आणि गणपती बाप्पांच्या सेवेत वाहून जातो. येथे व्यवस्थापन केवळ यंत्रवत चालत नाही, तर माणुसकी, संवेदनशीलता आणि करुणेच्या बळावर फुलत जाते.

या उत्सवातून एक ठाम संदेश सतत उमटत राहतो-मोठेपणा साधनांमधून नाही, तर विचारांमधून घडतो. नियोजन, शिस्त आणि भक्ती एकत्र आली की कोणतेही कार्य असामान्य उंची गाठू शकते. म्हणूनच श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणेशोत्सव हा केवळ उत्सव पाहण्याचा प्रसंग न राहता, समाजाला दिशा देणारा, पिढ्यांना प्रेरणा देणारा आणि 'सेवा हीच खरी उपासना' हे तत्त्व ठामपणे अधोरेखित करणारा एक प्रेरणादायी अध्याय ठरतो.



# ज्ञानवर्धनाचा तेजोमय दीप

शाळकरी मुलांमधील वाढत्या आत्महत्यांच्या बातम्यांनी महेश सूर्यवंशी अस्वस्थ झाले होते. एक ट्रस्ट म्हणून आपण या गंभीर प्रश्नावर काहीतरी ठोस पाऊल उचलायला हवं, ही भावना त्यांच्या मनात घर करून राहिली होती. समाजासाठी किती ही संवेदनशील विचारसरणी! सखोल विचार आणि निरीक्षणातून त्यांनी ओळखलं की संगोपनातील वातावरण, मानसिक ताण आणि योग्य संस्कारांचा अभाव, ही यामागची प्रमुख कारणं आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, समुपदेशन, आरोग्य आणि व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ मिळालं तर नकारात्मकतेवर मात करता येईल, या विचारातून संस्कार वर्ग आणि "बाप्पास पत्र" ही अभिनव संकल्पना आकाराला आली. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शाळांची निवड सुरू झाली. महेश सूर्यवंशींच्या विचारांना अशोक गोडसे यांची तितकीच संवेदनशील साथ मिळाली. विचारांची ही समरसता "१ + १ = ११" अशा अर्थपूर्ण समीकरणात बदलली आणि त्यानंतर दोघेही ही संकल्पना तात्यांसमोर सादर करण्यास सिद्ध झाले. "ज्या बाप्पाच्या कृपेने ही योजना साकार होणार आहे, त्याच बाप्पाचं नाव या उपक्रमाला द्या," असे सांगत तात्यांनी आशीर्वाद दिला आणि लगेचच कामाला सुरुवात झाली.

सुमारे ३७ शाळांची निवड करून मुख्याध्यापकांच्या भेटी घेण्यात आल्या. या योजनेत शाळांमध्ये पत्रपेटी बसवून विद्यार्थ्यांना आपली मनातली गोष्ट गणपती बाप्पाला लिहिण्याची संधी देण्यात आली. त्या पत्रांमधून विद्यार्थ्यांच्या भावना, अडचणी समजल्या आणि त्यावर प्रत्यक्ष उपाय करता आले. याच विचारातून "जय गणेश ज्ञानवर्धन अभियान" सुरू झालं. पहिल्याच वर्षी ५०० गरीब पण गुणवान विद्यार्थ्यांची निवड करून त्यांच्या शिक्षणापासून दैनंदिन गरजांपर्यंत सर्व जबाबदारी ट्रस्टने उचलली.



### डॉ. अ. ल. देशमुख

शिक्षण तज्ज्ञ डॉ. अ. ल. देशमुख हे या योजनेचे मार्गदर्शक. तळागाळातल्या मुलांना शिक्षणाची संधी आणि योग्य वातावरण मिळावं असा विचार तात्यांच्या मनात कायम असायचा असे ते सांगतात.



### डॉ. भरत देसाई

डॉ. भरत देसाई सांगतात की 'समुपदेशन' हा शब्द आजही अनेकांना अपरिचित आहे. धावत्या जीवनात मोठ्यांनाही दिशा सापडत नाही, मग निरागस वयातील मुलांना आपले प्रश्न ओळखणे तर अधिकच कठीण. ज्ञानवर्धन अभियानातील मुलांच्या या गुंतागुंतीच्या प्रश्नांना योग्य मार्गदर्शन मिळावे, म्हणून समुपदेशनाची जबाबदारी ट्रस्टने डॉ. भरत देसाई यांच्यावर सोपवली.



### डॉ. संजीव डोळे

डॉ. संजीव डोळे हे, 'पुणे होमिओपथी असोसिएशन'चे अध्यक्ष व नारायणगाव येथील 'मोहन ठुसे नेत्र रुग्णालय व संशोधन संस्थे'चे व्यवस्थापकीय विश्वस्त, आपल्या वैद्यकीय व्यवसायासोबत सामाजिक बांधीलकी जपत नेत्रसेवेचे कार्य निष्ठेने करत आहेत. ज्ञानवर्धन अभियानातील वैद्यकीय प्रकल्पाची जबाबदारी त्यांच्याकडे असून, डॉ. विनायक रुपनवर यांच्या माध्यमातून त्यांच्याशी संपर्क साधण्यात आला.



### अरुण भालेराव

विद्यार्थ्यांमध्ये सुप्त गुण विकसित करणं, त्यांचा आत्मविश्वास उंचावणं आणि त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवणे हा या संस्कार वर्गाचा हेतू. अरुण भालेराव यांनी या प्रकारे वर्गाची आखणी केली.





या उपक्रमाचे सकारात्मक परिणाम वर्षभरातच दिसून आले. दहावी-बारावीच्या निकालात उल्लेखनीय यश मिळालं. हे पाहून तात्यांनी मंदिरामागील इमारत या उपक्रमासाठी उपलब्ध करून दिली आणि तिला "गणपती सदन" असं नाव देण्यात आलं. येथे UPSC, MPSC च्या विद्यार्थ्यांसाठीही मोफत शिक्षण दिलं जातं. तिथे ५० हून अधिक संगणक आणि इंटरनेट सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

२०१२ मध्ये बारावीच्या निकालातही या योजनेचं प्रतिबिंब दिसून आलं. त्या वर्षी या अभियानांतर्गत शिकलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल १००% लागला. सात विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक गुण मिळवले, तर उर्वरित विद्यार्थी ५०-६०% च्या आसपास होते. 'गणपती सदना'तील अभ्यासिका स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने वरदान ठरली.

२००४ मध्ये सुरू झालेल्या आयटीआयमध्ये 'इलेक्ट्रिकल', 'फिटर', 'वेल्डिंग' आणि 'टर्नर' असे अभ्यासक्रम आहेत. 'टाटा', 'बजाज', 'एलजी'सारख्या नामवंत कंपन्यांच्या कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे येथे १००% प्लेसमेंट दिलं जातं.

यासोबतच कोंढव्यातील 'जय गणेश व्होकेशनल ज्युनिअर कॉलेज', ई-लर्निंग सुविधा, ग्रामीण भागातील शाळांमध्ये तंत्रज्ञानाधारित शिक्षण, पिण्याच्या शुद्ध पाण्याच्या यंत्रणा - अशा बहुआयामी उपक्रमांमुळे शिक्षणाचा दर्जा, पटसंख्या आणि पालकांचा विश्वास लक्षणीयरीत्या वाढला आहे.



आजपर्यंत 'जय गणेश ज्ञानवर्धन अभियानां'तर्गत पुण्यातील साडेपाचशेहून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक मदत मिळाली असून, सुमारे हजार ते दीड हजार विद्यार्थी उच्चशिक्षित होऊन आत्मनिर्भर झाले आहेत. पारंपरिक अभ्यासक्रमांपासून ते आर्टिफिशियल इंटेलिजन्ससारख्या आधुनिक कोर्सेसपर्यंत, मोफत किंवा अल्प शुल्कात शिक्षण देत हे अभियान सातत्याने विस्तारत आहे. एका संवेदनशील विचाराच्या अंकुरातून उगम पावलेला हा उपक्रम आज असंख्य आयुष्यांना ज्ञानवर्धनाचा प्रकाश देणारा तेजोमय दीप बनला आहे.





## “सात दशकांची भक्ती, स्वरांची अर्चना आणि गणपतीशी जुळलेलं नातं...”

**- भारतरत्न लता मंगेशकर**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती हा इच्छापूर्ती करणारा, मनोकामना पूर्ण करणारा, एका क्षणात मोहित करून जावं असं त्याचं लाडिवाळ रुप. या गणपतीचे दर्शन मी गेल्या सात दशकांहून अधिक काळ घेत आहे. १९४१ मध्ये माझे बाबा पंडित दीनानाथ मंगेशकर यांचा गणपती उत्सवात बाहुलीच्या हौदाजवळ कार्यक्रम होता. यामध्ये माझं सुद्धा गाणं झालं तिथ तात्या गोडसे आणि माझी पहिली ओळख झाली. त्यानंतर पुण्यातल्या कार्यक्रमाच्या निमित्ताने आमची भेट होतच राहिली. त्यांनी गणपती दर्शनाला आरतीला बोलवायचं आणि मी न न चुकता यायचं असा शिरस्तातच झाला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या १९९२ च्या शताब्दी महोत्सवात बिकानेरच्या राजवाड्याचा देखावा करण्यात आला होता त्याच्या समोरच्या कारंजाचे उद्घाटन माझ्या हस्ते झालं होतं. माई आणि आम्ही सर्व मंगेशकर भावंड त्या महोत्सवाला काकांच्या प्रेमापोटी आवर्जून उपस्थित राहिलो होतो. त्या कार्यक्रमात काकांच्या आग्रहानंतर मी एक गाणं सुद्धा गायल्याचे मला आठवतं आहे. द्वारका पिठाचे शंकराचार्य त्या महोत्सवात सर्वांना आशीर्वाद देण्यासाठी आले होते. तो महोत्सव काकांनी न भूतो न भविष्यती असा साजरा केला होता. त्यांनी गणपतीच्या माध्यमातून सहा - सात दशकं भक्तीभावाने जी समाजसेवा केली ती मात्र पुढच्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहणार आहे. तात्यांच्या सहकाऱ्यांनी ह्या समाजसेवेचे व्रत अंगीकारून त्यांचं कार्य पुढे नेण्यात मोठा हातभार लावला आहे.



# स्वरलहरींची सुरेल वाटचाल



श्रमिकांना सन्मान देताना त्यांची सेवा आणि पुनर्वसन हीच अंतिम सीमा नाही, याची जाणीव तात्यांना नेहमीच होती. केवळ भौतिक गरजा नव्हे, तर सर्वांगीण उन्नतीचीही जबाबदारी आपल्यावर आहे, असा विचार ते सातत्याने करत राहिले. १९८०च्या सुमारास 'संगीत महोत्सव' हे लोकांना परवडणाऱ्या दरात होत असत, मात्र तरीही त्यामध्ये आर्थिकदृष्ट्या सहभागी होऊ न शकणारा एक मोठा समाजघटक तात्यांच्या नजरेतून सुटत नव्हता.

याच जाणिवेतून १९८४ साली 'श्रीमंत दगडूशेठ संगीत महोत्सवा'ची सुरुवात झाली. जेणेकरून सर्वसामान्यांना दर्जेदार संगीताचा विनामूल्य आस्वाद घेता यावा.



बुधवार पेठेतील दत्त मंदिरासमोरील पटांगणातून दगडूशेठ हलवाई संगीत महोत्सवाची सुरुवात झाली, आणि भीमसेन जोशींसारख्या जागतिक ख्यातीच्या कलाकारांच्या उपस्थितीने त्याची परंपरा तेव्हापासूनच उजळली.

गुढीपाडव्यापासून रामनवमीपर्यंत हा उत्सव सुरू ठेवण्याचा निर्णय झाला. १९८४ ते २०२५ या दीर्घ कालावधीत संगीतविश्वातील अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे ज्येष्ठ गायक, वादक आणि नर्तक यांनी या व्यासपीठावर आपली कला सादर केली - पं. अल्लारखा व उस्ताद झाकीर हुसेन, लता मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर, पंडित जसराज, पंडित शिवकुमार शर्मा, सुधीर व श्रीधर फडके, आशा खाडिलकर आणि असेच असंख्य नामवंत कलाकार.







सुरुवातीला बुधवार पेठेतील श्री दत्त मंदिरासमोरील रस्त्यावर सुरू झालेला हा कार्यक्रम पुढे शनिवार वाड्याच्या पटांगणात आणि आता अत्याधुनिक सभागृहात सादर केला जातो. स्थळ बदलले तरी रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मात्र तसाच ठाम राहिला. संगीताबद्दल मंडळाची विशाल दृष्टी व त्या मागील निस्सीम प्रेम आणि त्याचबरोबर आजची पिढी हा वारसा किती समर्थपणे पुढे नेत आहे हे पाहून मन अक्षरशः भारावून जातं.

अभिजात, नाट्य आणि भावसंगीताची गोड परंपरा यामुळे पुण्याच्या प्रत्येक घरापर्यंत पोहचली. विशेष उल्लेख करावा लागेल तो १९९२ मध्ये साजऱ्या झालेल्या शताब्दी महोत्सवाचा - पुण्याच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवावा असा हा महोत्सव. सामान्यतः पाच-सहा दिवस चालणारा संगीत महोत्सव त्या वर्षी तब्बल आठ आठवडे रंगला होता आणि संपूर्ण पुणे शहर जणू संगीतमय होऊन गेले होते.

कदाचित ह्या महोत्सवाची तेव्हा 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' मध्ये नोंद होऊ शकली असती. इतका भव्य, धाडसी आणि अभूतपूर्व संगीत महोत्सव ज्याची संगीतजगताने देखील योग्य प्रकारे दखल घेतली आणि हा संगीत महोत्सव "न भूतो न भविष्यति" असा गौरवला गेला.







या संगीत महोत्सवाच्या प्रेरणेने आजच्या तरुण पिढीतल्या अनेक मुला-मुलींमध्ये संगीताविषयीची ओढ निर्माण झाली आहे. तबला, हार्मोनियम, सितार अशा अनेक वाद्यांच्या सुरांमध्ये आजची तरुण पिढी स्वतःला झोकून देत आहे. कित्येक जण शास्त्रीय संगीत आपल्या गुरुंकडून मनोभावे शिकत आहेत. गाणं फक्त ऐकायचं नसतं - ते अनुभवायचं, त्यातल्या सूक्ष्म नादांना अंतर्यामी उतरू द्यायचं - ही जाणही लोकांत रुजत आहे. आणि हाच संस्कार पुढे नेणारे परिपक्व "कानसेन" तयार होत आहेत.

हीच तर श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाच्या विश्वस्तांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची स्वप्नपूर्ती म्हणावी लागेल. संगीताची परंपरा फुलावी, पुढील पिढी सक्षम व्हावी, पुण्याच्या भूमीतून उगवणारे स्वर पुन्हा जगभर घुमावेत या सर्व गोष्टी सत्यात उतरताना आज दिसत आहेत.

संगीतविश्वात पदार्पण करणाऱ्या असंख्य तेजस्वी ताऱ्यांमध्ये या महोत्सवाचा तेजोमय प्रकाश झळकत आहे.

संगीताचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावा, आणि तो आज प्रत्यक्षात उतरलेला दिसतो आहे. पुण्यातून संगीतविश्वात नवनवीन तेजस्वी तारे उदयाला येत आहेत. याचे श्रेय निश्चितच श्रीमंत दगडूशेठ गणपती ट्रस्टला जाते. कारण ज्या समर्पणाने आणि तन्मयतेने ही पिढी संगीत साधनेसाठी प्रयत्नशील आहे, तोच या कार्याचा खरा फलद्रूप परिणाम म्हणावा लागेल.

मंडळाच्या प्रत्येक उपक्रमातून नवीन संधी निर्माण होत आहेत, अनेक व्यावसायिक मार्ग खुलत आहेत, उत्साही नवयुवकांची पिढी जोडली जात आहे. आणि हेच आजच्या मंडळातील कार्यकर्त्यांचे मोठं यश म्हणावे लागेल.







पंडित जसराज

१९९२ च्या शताब्दी महोत्सवात तर भारतामधील कोणीही मोठा कलाकार इथे आला नाही असं झालंच नाही. अद्‌भुत मैफली झाल्या होत्या. पूज्य शंकराचार्यही आले होते. मीही असं मन लावून गायलो की गाणं झाल्यावर तात्यांनी तर मला मिठीच मारली होती. आणि म्हणाले, 'असंच गात रहा!'



हृदयनाथ मंगेशकर

दगडूशेठ हलवाई संगीत महोत्सवाची सांगता गेली ३२ वर्षं मी करतो आहे. तात्या गोडसे मला म्हणायचे की हिंदुस्थानातला कितीही मोठा गायक-वादक या महोत्सवात आला, तरी याची सांगता तुमच्याच कार्यक्रमाने होईल. आणि ३२ वर्षं त्यांनी तो शब्द पाळला.



श्रीधर फडके

१९९२ मध्ये मी या महोत्सवात गायला सुरुवात केली. माझ्या कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी रात्री माझ्या पोटात दुखत होतं. मी गोळ्या घेऊनच मुंबईहून इथे आलो होतो. मला गाण्याची संधी मध्यरात्रीच्या सुमारास मिळाली. परंतु त्या आधीच माझ्या पोटात दुखणं सुरू झालं होतं, ते इतकं की मी अक्षरशः गडाबडा लोळत होतो. रामभाऊंनी काळजीपोटी मला विचारलं की काय झालं? मी सांगितलं पोटात दुखत आहे. ते म्हणाले काही काळजी करू नकोस, देवाची प्रार्थना कर सगळं व्यवस्थित होईल. मी गणपतीची प्रार्थना केली आणि शंभर टक्के सत्य सांगतो की माझं पोट दुखणं तिथंच थांबलं. आणि माझ्या गाण्याचा कार्यक्रम अतिशय सुंदर व निर्विघ्नपणे पार पडला.






दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ म्हणजे माझं माहेरच! ही सगळीच मंडळी म्हणजे माझं माहेरचं कुटुंब असं मी नेहमीच म्हणते. तात्यांनी ट्रस्टमधल्या पुढच्या पिढीवरही इतके उत्तम संस्कार केले आहेत की ही तरुण पिढीही तितक्याच निरपेक्षपणे हे काम करत आहे ही मोठ्या अभिमानाची बाब आहे.




दगडूशेठ हलवाई संगीत महोत्सवात मी १९८७ मध्ये पहिल्यांदा गायले तेव्हापासून आजपर्यंत कधीही खंड न पडता गातच आहे. ही सेवा करण्याची संधी मला देवाच्या कृपेनेच मिळाली आहे.

मला एक मैफल आठवते आहे. पाच तास मी सलग गायले होते. पहाटे तीन वाजेपर्यंत तो कार्यक्रम चालू होता तरी प्रेक्षक काही हलले नाहीत. रसिकांनी इतके वर्षं माझ्यावर केलेल्या अशा प्रेमाविषयी मी कृतज्ञ आहे.

तात्या, मामा, आप्पा व बुवा असताना आम्हा कलाकारांना जे प्रेम मिळायचं तेच प्रेम, तोच आधार आज या ट्रस्टचं काम पाहणारी नवी पिढीही आम्हाला देत आहे. हा महोत्सव देखील त्याच दिमाखात साजरा केला जात आहे. त्यामुळे आमचं आणि या महोत्सवाचं एक अतूट नातं निर्माण झालं आहे.







## गणेश जयंती - उमांगमलज (कार्तिक शुद्ध चतुर्थी)

अंतःकरणातील अहंकार व ममत्वाचा मळ दूर झाल्यावर जे शुद्ध, निर्मळ आणि प्रशांत परमात्मदर्शन घडते, त्यालाच 'उमांगमलज' म्हणतात. पुराणकथेनुसार देवी पार्वतीने अंगावरील मळापासून निर्माण केलेल्या बालकाला पुढे गजमस्तक प्राप्त झाले आणि तो श्री गजानन म्हणून ओळखला गेला. या अवतारात गणेशांचे नाव 'उमांगमलज' आहे. या सर्व कथा अध्यात्माचे निरूपण करण्यासाठीच असतात. आपली बुद्धी हीच पार्वती देवी आहे. तिच्यावर चढलेला अहंकार आणि ममत्वाचा थर हाच मळ आहे. हा अहंकार आणि ममत्व दूर झाले की ज्या मोरयांची प्राप्ती होते त्यांना 'उमांगमलज' असे म्हणतात. मनाचे प्रतीक आहे फूल तर बुद्धीचे प्रतीक आहे नारळ! नारळाला जशा शेंड्या असतात, त्यात करवंटी असते, त्यावर तीन डोळे असतात, तशीच रचना आपल्या डोक्याची आहे. त्या डोक्याचे व त्यात असणाऱ्या बुद्धीचे नारळ हा प्रतीक आहे. भगवंताला मन आणि बुद्धी समर्पित करण्याची प्रतीकं म्हणजे फूल आणि नारळ. बुद्धीवरील मळ झटकून त्या शुद्ध बुद्धीला श्री गजानन चरणी नतमस्तक करण्याचा हा उत्सव आहे.



# ॥ श्री नग्नभैरव जन्मोत्सव ॥ (कार्तिक वद्य अष्टमी)

कार्तिक वद्य अष्टमी हा गाणपत्य परंपरेतील अत्यंत मंगल व आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचा दिवस आहे. याच दिवशी भगवान श्री नग्नभैरवांचा अवतार प्रकट झाला असे मानले जाते. भगवान श्रीगणेशांची कार्यशक्ती आणि मानसपुत्र असलेले श्री नग्नभैरव हे माया-बंधनांपासून पूर्णतः मुक्त असे परमचैतन्य आहेत.

म्हणजेच ज्यांचे मायारूपी वस्त्र गळून पडलेले असते त्यांना नग्न असे म्हणतात. भगवान श्री नग्नभैरव यांचे स्वरूप असेच असल्याने त्यांच्या नावात या शब्दाचा उल्लेख आहे.

'भैरव' हा शब्द 'भय' आणि 'रव' या दोन संकल्पनांतून निर्माण झाला आहे. ज्यांच्या चैतन्यामुळे सृष्टीतील सर्व शक्ती - देव, दानव, मानव - भीतीवश नव्हे तर शिस्तबद्ध नियमांतून आपापली कर्तव्ये पार पाडतात, त्या सर्वव्यापी, प्रचंड सामर्थ्याला 'भैरव' असे संबोधले जाते. श्री नग्नभैरव हे मायेच्या प्रत्येक स्वरूपापलीकडे स्थित असून त्यांच्यावर कोणतेही बंधन कार्य करत नाही.

भगवान श्री मयुरेशांच्या अखंड सेवेमध्ये सदैव तल्लीन असल्यामुळे त्यांना 'मयुरेश्वर' असेही म्हंटले जाते. तसेच धर्मनिष्ठ गणेशभक्तांचे सर्वत्र संरक्षण करणारे, संकटांपासून त्यांचा सांभाळ करणारे म्हणून ते 'धर्मिष्ठांचे सुपालक' मानले जातात.

या पवित्र जन्मोत्सवाच्या दिवशी मंदिरात पहाटेपासूनच श्री नग्नभैरवांची विधिपूर्वक पूजा केली जाते. पंचपक्वान्नांचा



नैवेद्य अर्पण करून भक्तिभावाने आरती केली जाते. या दिवशी हजारो भाविक दर्शनासाठी उपस्थित राहतात. रविवार हा त्यांच्या उपासनेचा विशेष दिवस असून २१ ही त्यांची प्रिय संख्या आहे. गूळ व खोबरे हा त्यांना विशेष प्रिय नैवेद्य मानला जातो.

सांसारिक जीवनातील सुख, समाधान, समृद्धी तसेच आध्यात्मिक उन्नती - या दोन्हींचा लाभ श्री नग्नभैरवांच्या कृपेने प्राप्त होतो. म्हणूनच ते भक्तांना भोग देणारे 'भुक्ती-प्रदाता' आणि मोक्षाचा मार्ग दाखवणारे 'मुक्ती-प्रदाता' म्हणून पूजले जातात. भुक्ती आणि मुक्ती यांचा अद्वितीय संगम म्हणजेच भगवान श्री नग्नभैरव.



# वारसा परंपरेचा

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पा म्हणजे श्रद्धेचा, परंपरेचा आणि सामाजिक जाणिवेचा एक तेजस्वी केंद्रबिंदू. हा गणपती केवळ पूजनीय नाही, तर १३४ वर्षे जपल्या गेलेल्या भक्तीपर परंपरांचा साक्षीदार आहे. दगडूशेठ हलवाई हे असे थोर भक्त होते की त्यांच्या नावाने बाप्पा आज जगभर ओळखला जातो - हीच त्यांच्या भक्तीची खरी फलश्रुती.

बाप्पांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना झालेल्या पवित्र क्षणापासूनच देवळातील आध्यात्मिक परंपरेचा आरंभ झाला आहे. तेव्हापासून अथर्वशीर्ष पठण, गणेशयाग, महाअभिषेक, सत्यविनायक पुजा, सहस्रावर्तने अतिरुद्र महायज्ञ यांसारखे विधी श्रद्धेने सुरू असून, त्यामुळे मंदिरात प्रवेश करताच जाणवणारी सकारात्मक ऊर्जा व आध्यात्मिक कंपन अनुभवास येतात. ज्यामुळे मंदिराचा संपूर्ण परिसर आध्यात्मिक ऊर्जेने आणि दिव्य चेतनेने भारून जातो.

## १८९३ : एका दिव्य परंपरेचा प्रारंभ

सद्गुरू माधवनाथ महाराजांच्या प्रेरणेने १८९३ साली श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांनी गणेशभक्तीची जी परंपरा सुरू केली, ती आज एका विशाल वटवृक्षात परिवर्तित झाली आहे. १३४ वर्षांची परंपरा आज इतकी व्यापक झाली आहे की वर्षभर कोट्यवधी भाविक दगडूशेठ बाप्पांच्या दर्शनाला येत असतात.



## परंपरा लोकमान्यांच्या विचारांची

याच ऐतिहासिक वर्षी लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. स्वातंत्र्य, समाजएकात्मता आणि जनजागृती - या त्रिसूत्रीवर आधारित ही परंपरा आज १७५ देशांमधे पोहोचली आहे.

## समाजप्रबोधनाच्या परंपरेची अखंड ज्योत

'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट'ने लोकमान्यांच्या समाजप्रबोधनाच्या परंपरेला काळानुरूप अधिक व्यापक रूप दिले. चातुर्मास्य प्रवचनमाला, गणेश माहात्म्यावरील स्वानंद पुंड शास्त्रींची प्रवचने, वारी, शिवजयंती व्याख्यानमाला - या सर्व माध्यमांतून गेली १३४ वर्षे समाजमन जागृत ठेवण्याचे कार्य अखंड सुरू आहे.



## विश्वाला जोडणारी उत्सवाची परंपरा

आज गणेशोत्सव ही केवळ पुण्याची किंवा महाराष्ट्राची ओळख राहिलेली नाही. या उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण विश्व गणेशभक्तीच्या एका अदृश्य भावधाग्यात गुंफले जाते. भाषा, देश, संस्कृती यांच्या सीमा इथे आपोआप विरून जातात.

## कलात्मकतेची परंपरा

दगडूशेठ गणेशोत्सवाची एक वैशिष्ट्यपूर्ण ओळख म्हणजे भारतातील विविध मंदिरांच्या भव्य प्रतिकृती. नेत्रदीपक रोषणाई, सूक्ष्म कलाकुसर आणि कल्पकता - यामुळे ही सजावट केवळ दृश्य नसून एक अनुभव ठरते. अबालवृद्ध दरवर्षी या सौंदर्याला अनुभवत असतात आणि ही परंपरा अधिकाधिक समृद्ध होत आहे. या उपक्रमातून भारताच्या सांस्कृतिक वारशाचे जतन होत असून राष्ट्रभावनेला नवे बळ मिळत आहे.



## भक्तीच्या परंपरेचा परमोच्च क्षण

श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा ही दरवर्षी आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्तेच केली जाते, तसेच ऋषिपंचमीच्या दिवशी हजारो महिला एकत्र येऊन सामूहिक अथर्वशीर्ष पठण करतात आणि बाप्पांची महाआरती करतात - हा क्षण भक्तीचा परमोच्च बिंदू ठरतो. आज ही परंपरा महाराष्ट्रातील अनेक गणेश मंडळांनी आत्मसात केली आहे. यातून सामूहिक उपासनेची शक्ती आणि आवश्यकता याचे महत्त्व अधोरेखित होते.



## महाविसर्जन : एक वैभवशाली परंपरा

विसर्जनाचा दिवस म्हणजे भक्ती, सौंदर्य आणि संस्कृती यांचा संगम. रोषणाईने सजवलेल्या भव्य रथातून दगडूशेठ बाप्पांचे आगमन हे मिरवणुकीचे शिखरबिंदू असते. दहा बैलजोड्यांनी ओढला जाणारा हा रथ आपल्या शेतीप्रधान संस्कृतीचे प्रतीक असून, ही परंपरा शंभरहून अधिक वर्षे अखंड जपली गेली आहे. पारंपारीक वाद्यांच्या सहभागाने मिरवणूक समृद्ध होत जाते. कार्यकर्त्यांच्या जयघोषाच्या निनादात गणेशभक्तीचा उत्सव बहरून येतो.



## परंपरा स्वर - तालांची

बंडोपंत सोलापूरकरांचा 'प्रभात बँड', इकबालभाई दरबार यांचा 'दरबार बँड', नगारावाले देवळेकर बंधू, सनईवादक प्रमोदजी गायकवाड - यां सर्वांची तिसरी ते चौथी पिढी आजही विसर्जन मिरवणुकीत सहभागी होत आहे. या वरून गणेशोत्सव हा सर्व जाती-धर्मांचा आहे, हे इथे केवळ सांगितले जात नाही, तर अनुभवले जाते.



## कार्यकर्त्यांची अखंड सेवा

'सुवर्णयुग मंडळा'चे कार्यकर्ते हे या परंपरेचे खरे आधारस्तंभ. तात्यासाहेब गोडसे, मामासाहेब रासने, आप्पासाहेब सूर्यवंशी, आप्पासाहेब रासने - या पिढीपासून आजच्या चौथ्या पिढीपर्यंत ही सेवा अखंड सुरू आहे. समाजातून उभी राहिलेली, समाजासाठी कार्यरत असलेली ही परंपरा देशातील मंदिर व्यवस्थेत अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे.



## भावनिक नातं

नवसपूर्ती झाल्यावर श्रीफळ अर्पण करणे, सोनं अर्पण करणे - या श्रद्धेच्या परंपरा आजही तितक्याच निष्ठेने सुरू आहेत. ही भक्ती केवळ विधी नाही, ते एक भावनिक नातं आहे.



## परंपरा, जी काळालाही मागे टाकते

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पा म्हणजे केवळ इतिहास नाही - तो एक जिवंत वारसा आहे. श्रद्धा भक्ती, विचार, कला आणि सेवा यांचा संगम असलेली ही परंपरा काळाच्या पलीकडे जाऊनही तितकीच तेजस्वी राहणार आहे.

## ॥ ऊर्जेचे दिव्य प्रक्षेपण (अतिरुद्र महायज्ञ) ॥



संपूर्ण विश्वात शांती, सद्भावना आणि समतोल निर्माण व्हावा या पवित्र संकल्पाने 'अतिरुद्र महायज्ञा'चे आयोजन करण्यात येते. अतिरुद्र यज्ञ हा केवळ धार्मिक विधी नसून, वेदशास्त्रानुसार एक अत्यंत प्रभावी आध्यात्मिक ऊर्जा-प्रक्षेपण आहे. या यज्ञामुळे व्यक्ती, कुटुंब आणि समाजाच्या पातळीवर शुद्धता, संतुलन व सकारात्मकता निर्माण होते. जिथे अतिरुद्र यज्ञ संपन्न होतो, तेथे वातावरण शुद्ध होत असून मानवी चेतना जागृत होते, कार्यक्षमता व एकाग्रता वाढते.

वेदपरंपरेनुसार ११ ब्रह्मवृंदांनी ११ वेळा केलेले रुद्रपठण म्हणजे लघुरुद्र; असे ११ लघुरुद्र म्हणजे महारुद्र आणि ११ महारुद्र म्हणजे एक अतिरुद्र. या व्यापक आणि सामर्थ्यशाली यज्ञामुळे वायुमंडलाचे शुद्धीकरण होऊन वातावरणातील नकारात्मकता नष्ट होते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि सर्व सजीवांच्या कल्याणाला चालना मिळते. अतिरुद्र यज्ञ हा सामूहिक आध्यात्मिक जागरणाचा सर्वोच्च सोहळा असून, यामुळे गाव, शहर तसेच राष्ट्रस्तरावर सकारात्मक व दूरगामी परिणाम अनुभवास येतात. पर्यावरणातील असंतुलन दूर होणे, नैसर्गिक आपत्तींची तीव्रता कमी होणे आणि विश्वात शांती व सद्भावना प्रस्थापित होणे, हे या महायज्ञाचे महत्त्वपूर्ण लाभ मानले जातात.




याच उद्देशाने श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात या ११ दिवसांच्या सोहळ्यात रुद्र हवन, गणेश यज्ञ, महालक्ष्मी हवन, श्रीसूक्त पठण यांसारखे अनेक धार्मिक विधी केले जातात. मंदिराच्या सभामंडपात भव्य होमकुंडाची रचना करून वेदमूर्ती नटराज शास्त्री यांच्यासह ६५ ब्रह्मवृंदांच्या सहभागाने हा यज्ञ संपन्न केला जातो.

यज्ञात ३३ कोटी देवतांचे आवाहन, विविध यागकर्म, हवीर्द्रव्य व वनौषधींचा विधिपूर्वक उपयोग करून पूर्णाहुती दिली जाते.

या कालावधीत गंगा, यमुना, इंद्रायणी, पंचगंगा, अष्टविनायक क्षेत्रांतील नद्या तसेच रामेश्वरम येथील ज्योतिर्लिंग नद्यांचे आणि २१ कुंडांचे मंत्रोच्चारित जल वापरण्यात येते. यासोबतच २१ आयुर्वेदिक औषधींचा होम-हवनात समावेश केला जातो. सर्व पवित्र नद्यांच्या एकत्रित जलाने श्री गणेशांचे जलाभिषेक करून जगाच्या कल्याणासाठी व आरोग्यसंपन्न समाजनिर्मितीसाठी प्रार्थना केली जाते. विविध धार्मिक उपक्रमांच्या शिखरस्थानी असलेला हा अतिरुद्र महायज्ञ भक्तांसाठी एक अद्वितीय आध्यात्मिक अनुभूती ठरतो.




# तुळशीविवाह



हा पवित्र विवाह सोहळा 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट'च्या वतीने आयोजित करण्यात येतो. सकाळी दगडूशेठ गणपती मंदिरात श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन झाल्यानंतर पारंपरिक पद्धतीने मिरवणुकीला प्रारंभ होतो. तुळशी वृंदावन आणि श्रीकृष्णाची मूर्ती रथातून वाजतगाजत आणण्यात येते. संपूर्ण मार्ग रांगोळीच्या पायघड्यांनी सुशोभित केला जातो. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरातून निघालेली मिरवणूक मंडईतील साखरे महाराज मठात दाखल होते. रांगोळीच्या पायघड्या, "शुभमंगल सावधान"चे मंगल सूर आणि पारंपरिक वातावरणात येथे तुळशीविवाह सोहळा भक्तिभावाने साजरा केला जातो. भगवान विष्णूंना तुळस अत्यंत प्रिय आहे असे मानले जाते. तुळशीविवाह हे एक महत्त्वाचे व्रत असून, प्रबोधिनी एकादशीपासून तुळशीच्या रोपाचा शालिग्राम, भगवान विष्णू किंवा त्यांचा अवतार श्रीकृष्णाशी विवाह करण्याची ही पारंपरिक पूजोत्सव प्रथा आहे. याच दिवशी कोजागिरी पौर्णिमेपासून मंदिरात सुरू असलेल्या काकड आरतीतील काकड्याची सांगता होते. या विशेष प्रसंगी आरती मंडळातील शेकडो गृहिणी भक्तिभावाने हा मंगल सोहळा साजरा करण्यासाठी उपस्थित असतात.





## अन्नकोट (त्रिपुरारी पौर्णिमा)

कार्तिक महिन्यातील पवित्र पौर्णिमा त्रिपुरारी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते आणि या मंगल दिनाचे औचित्य साधून मंदिरात अन्नकोटाचा भव्य व लोभस सोहळा साजरा केला जातो. या दिवशी गणरायाच्या चरणी तब्बल ५२१ तिखट-गोड, स्वादिष्ट पदार्थांचा महानैवेद्य अर्पण करण्यात येतो. विविध प्रकारच्या अन्नपदार्थांसोबतच रंगीबेरंगी व आकर्षक फळांची नेत्रदीपक आरासही करण्यात येते.

हा नैवेद्य भक्त आपल्या श्रद्धा, भक्ती आणि आनंदाने स्वतःहून अर्पण करतात, ज्यातून त्यांच्या अपार श्रद्धेचे दर्शन घडते.









याच वेळी मंदिरात केलेली दिव्यांची अलौकिक आरास विशेष लक्ष वेधून घेते. कळसापासून गाभाऱ्यापर्यंत सुमारे १ लाख २५ हजार दिव्यांचा लखलखता प्रकाश संपूर्ण परिसर उजळवून टाकतो आणि भक्तांना अक्षरशः मंत्रमुग्ध करतो. पणत्यांच्या उजेडात न्हालेला मंदिर परिसर, सुंदर रांगोळ्या, सुगंधी फुलांच्या माळांनी सजलेले प्रांगण - ह्या सर्व गोष्टींमुळे एक दिव्य दृश्य साकारले जाते. जणू स्वर्गलोकातील एखादा राजमहाल पृथ्वीतलावर अवतरला आहे असा भास होतो. संध्याकाळनंतर या महानैवेद्याचा प्रसाद भक्तांना भक्तिभावाने वितरित केला जातो. श्रद्धा, सौंदर्य, समृद्धी आणि भक्तिभाव यांचे एकत्रित दर्शन घडवणारा हा अन्नकोट सोहळा भक्तांच्या हृदयात चिरंतन आनंद फुलवतो.

## हेमंत रासने (आमदार)

सरचिटणीस - श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट

मी सुवर्णयुग तरुण मंडळाच्या माध्यमातून आधीपासूनच सामाजिक कार्यात सक्रिय होतो. मंदिराच्या स्थापनेनंतर सुमारे वीस वर्षांनी त्याच्या विस्तारीकरणाचा निर्णय घेण्यात आला. हे विस्तारीकरण दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आले. सुरुवातीला मंदिर पूर्वीच्या जागेजवळच, मजूर अड्ड्यातील जागेत उभारण्याचा प्रयत्न झाला; मात्र काही अडथळ्यांमुळे तो प्रस्ताव पुढे सरकू शकला नाही. त्यानंतर फरासखान्यालगत असलेल्या जागेचा पर्याय त्या काळात पुढे आला.

त्या वेळी मी महापालिकेत नगरसेवक म्हणून कार्यरत होतो आणि याच परिसराचे प्रतिनिधित्व करत होतो. त्यामुळे महापालिकेत या जागेसंदर्भातील प्रस्ताव मंजूर करून घेण्याची जबाबदारी तात्यांनी माझ्यावर सोपवली. सभागृहात सर्व सदस्यांच्या सहमतीने मी तो ठराव मंजूर करून घेऊ शकलो, ही सर्व बाप्पांचीच कृपा. या कार्यासाठी बाप्पांनी माझी निवड केली, ही माझ्यासाठी अत्यंत भाग्याची गोष्ट असून त्याबद्दल मी स्वतःला धन्य समजतो.



## राजू शेठ सांकला

अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सिद्धिविनायक समूह

१९७१ मध्ये 'श्री' मासिकात तात्यासाहेब गोडसे यांची मुलाखत आली होती. त्यात त्यांनी श्रीमंत दगडूशेठ गणपती बाबतची समग्र माहिती दिली होती. ती वाचल्यावर मी हळूहळू त्या देवस्थानाशी जोडला गेलो. बांधकाम व्यवसायला सुरुवात केल्यानंतर चिंचवडला बिजली नगरच्या प्रोजेक्ट मधला एकही फ्लॅट विकला जात नव्हता. पैसे जवळ जवळ बुडाल्यात जमा होते. मानहानीची भीती वाटू लागली होती. मग उत्सवात बाप्पाच्या दर्शनासाठी आलो. आणि काही आठवड्यातच एका कंपनीने त्यांच्या कामगारांसाठी शंभर फ्लॅट्सच एकदम बुकिंग केलं. बाकीचे फ्लॅट्स ही विकले, गेले ही फक्त बाप्पाची कृपा आहे. अशी अनेक उदाहरणं मला सांगता येतील. परंतु सर्वात मोठं समाधान मला तेव्हा मिळालं, जेव्हा ट्रस्टतर्फे मंदिराच्या पुनर्बांधणीची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली. आम्ही शेकडो लोकांची घरे बांधून त्यांच्या स्वप्नांना आकार देतो; पण साक्षात श्रीगणेशाच्या कायमच्या वास्तव्यासाठी देऊळ उभारण्याची जबाबदारी जणू स्वतः श्रीगणेशानेच माझ्यावर सोपवली, अशी माझी भावना झाली. जगण्यासाठी लागणारी सकारात्मक ऊर्जा मला इथूनच मिळते आणि मला मोठं देखील केलं ते या श्रीमंत दगडूशेठ गणपती बाप्पानेच.



## देवमंदिरातून मानवसेवेच्या महामंदिराकडे

'श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट'च्यावतीने सामाजिक उपक्रमांद्वारे सुरू असलेल्या वाटचालीचे आपण सर्वजण साक्षीदार आहात. ही वाटचाल मोरयाच्या कृपेने भविष्यात अधिक समृद्ध होईल असा आमचा दृढ विश्वास आहे.

पुढील काळात भक्तांच्या वाढत्या संख्येचा विचार करता भव्य, सुसज्ज अशी दर्शन रांग, पार्किंग, भक्त निवास, बाप्पांच्या सर्व धार्मिक पूजा-सेवा, ऑनलाईन दर्शनसेवा याच बरोबर बाप्पांच्या स्वरूपाची ओळख व्हावी याकरीता भविष्यात पुरंदर तालुक्यातील वारवडी येथे ३६ एकर जागेवर बाप्पांचे आंतरराष्ट्रीय संग्रहालय, स्पिरिच्युअल सेंटर, वेदपाठशाळा, गोशाळा, वृद्धाश्रम, बालसंगोपन व आरोग्य-शिक्षण सुविधा या ठिकाणी 'Under One Roof' उभारण्याचा संकल्प आहे.

'श्रीगणेशा'साठी अनेक वैविध्यपूर्ण कार्य करण्याची संधी आम्हा सर्वांना मिळणे हे आमच्यासाठी गणरायाचे मोठे वरदान आहे, असे आम्ही समजतो. भविष्यात देखील असेच कार्य आमच्याकडून निःस्वार्थीपणे घडत राहावे हीच श्रीगणेशाच्या चरणी प्रार्थना.

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व**
**सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे**

**संस्थापक अध्यक्ष**
**स्वानंदवासी प्रतापराव (तात्यासाहेब) गोडसे**

## विद्यमान विश्वस्त मंडळ

अध्यक्ष : श्री. सुनिलभाऊ रासने

उपाध्यक्ष : श्री. माणिकदादा चव्हाण

उपाध्यक्ष : डॉ. श्री. रामचंद्र परांजपे (एम.डी.)

कोषाध्यक्ष : श्री. महेशभाऊ सूर्यवंशी, बी.ई. (सिव्हिल)

सरचिटणीस : श्री. हेमंतभाऊ रासने, आमदार

सहचिटणीस : श्री. अमोल केदारी

उत्सव प्रमुख : श्री. अक्षय गोडसे

विश्वस्त : श्री. उत्तमराव गावडे

## श्रद्धेचा दरवळणारा सुगंध

१८९३ मध्ये श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून पेरलेल्या श्रद्धा व भक्तिरूपी बिजाचा आज झालेल्या वटवृक्षाचा दरवळणारा सुगंध देशविदेशातील कानाकोपऱ्यांत जाऊन पोहोचला आहे हे पाहून अत्यंत अभिमान वाटतो. हा श्रद्धारूपी दरवळणारा सुगंध मंडळाच्या वैचारिक समृद्धीचा, कलात्मक संवेदनशीलतेचा, सामाजिक बांधीलकीचा आणि आध्यात्मिक साधनेचा एक अविभाज्य भाग बनला आहे. या दरवळणाऱ्या भक्तिरसाचा गाभा अखेरीस श्रीमंत दगडूशेठ गणरायाच्या चरणीच नतमस्तक होतो - हेच चिरंतन सत्य आहे आणि हाच दरवळणारा दिव्य सुगंध आजच्या तसेच येणाऱ्या नव्या पिढ्यांना प्रेरणेचा प्रकाश देत राहील यात मुळीच शंका नाही.

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे**
गणपती भवन, २५०, बुधवार पेठ, पुणे - ४११००२
**गणपती सदन** : +९१ २० २४४९६४६४ / +९१ २० २४४९२०००
contact.dhgt@gmail.com
www.dagdushethganpati.com

सौजन्य

वामन हरी पेठे ज्वेलर्स™
सोनेरी क्षणांचे सोबती!®